<u>प्रकरण ४ थे</u>

# माहितीचे विश्लेषण
# व
# अर्थनिर्वचन

## दृष्टिक्षेपात प्रकरण चौथे

## संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन



## प्रकरण ४

# माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

### ४.१ प्रस्तावना :

या पूर्वीच्या तिसऱ्या प्रकरणामध्ये संशोधिकेने संशोधनाची कार्यपध्दती यामध्ये संशोधनाची पध्दती, साधने, नमुना निवड यांची माहिती नमूद केली आहे.

प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधिकेने संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन केले आहे. हे विश्लेषण ४ विभागात केले आहे. हे पुढील प्रमाणे –

अ) अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तक विश्लेषणासंदर्भातील तज्ञांच्या मतावलीचे विश्लेषण

ब) मतावलीच्या अनुषगांने तज्ञांनी निश्चित केलेल्या मानकांनुसार सन २००६ च्या अभ्यासक्रमाचे व त्यानुसार तयार झालेल्या इयत्ता ५ वीच्या मराठी, हिंदी व इंग्रजी पाठ्यपुस्तकांचे विश्लेषण

क) अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तकाच्या विश्लेषणासंदर्भातील पडताळासूचीचे विश्लेषण.

ड) अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तकांच्या सहसंबंधाचे विश्लेषण.

## ‘अ’ विभाग

२००६च्या भाषांचा अभ्यासक्रम व त्यानुसार तयार झालेली इयत्ता ५वी ची मराठी, हिंदी, इंग्रजीची पाठ्यपुस्तके यांच्या विश्लेषणासंदर्भात तज्ञांच्या मतावलीचे विश्लेषण :

संशोधिकने २००६च्या अभ्यासक्रमाचे व इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकांचे विश्लेषण करण्यासाठी पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळातील ५ तज्ञांना मतावली देऊन मानके निश्चित केली. या मतावलीमधील मुद्द्यांसाठी तज्ञांनी

A - अंशत: असहमत, B- पूर्णत: असहमत

C- अंशत: सहमत, D- पूर्णत: सहमत

अशा स्वरूपात आपली मते दर्शविली. या मतांचे विश्लेषण या विभागात पुढीलप्रमाणे केलेले आहे.

विभाग अ — उद्दिष्ट क्र. १ नुसार

सन २००६चा अभ्यासक्रम व त्यानुसार तयार झालेली इ.५वीची मराठी, हिंदी, इंग्रजीची पाठ्यपुस्तके यांच्या विश्लेषणासंदर्भात तज्ञांसाठीच्या मतावलीचे विश्लेषण

सारणी क्र. ४.१

'अ' अभ्यासक्रम

| अ.क्र. | मुद्दे | मराठी | | | | हिंदी | | | | इंग्रजी | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | I) उद्दिष्टे | A | B | C | D | A | B | C | D | A | B | C | D |
| १. | हा अभ्यासक्रम निर्धारीत उद्दिष्टे साध्य करणारा आहे | — | २०% | — | ८०% | २०% | — | — | ८०% | — | २०% | — | ८०% |
| २. | उद्दिष्टांची निश्चिती सामाजिक गरजांना व बदलांना अनुसरून झालेली आहे. | — | — | — | १००% | — | — | — | १००% | — | — | — | १००% |
| ३. | ही उद्दिष्टे बालकांच्या सर्वांगिण विकासास पूरक आहेत. | — | — | — | १००% | — | — | २०% | ८०% | — | — | — | १००% |
| ४. | ही उद्दिष्टे निश्चित करताना विद्यार्थ्यांच्या मानसिकतेचा विचार केलेला आहे. | — | — | — | १००% | — | — | — | १००% | — | — | २०% | ८०% |
| | II) आशय | — | — | — | | — | — | — | | — | — | — | — |
| ५. | अभ्यासक्रमातील आशय विद्यार्थी विकास स्तरानुसार आहे. | — | — | — | १००% | — | — | — | १००% | — | — | — | १००% |
| ६. | अभ्यासक्रमातील आशयामध्ये विविधता व लवचिकता आहे. | — | — | २०% | ८०% | — | — | — | ८०% | — | — | — | १००% |

|  | II) आशय | A | B | C | D | A | B | C | D | A | B | C | D |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७. | हा अभ्यासक्रम संख्येपेक्षा गुणवत्तेवर भर देणारा आहे. | — | — | — | १००% | — | — | — | १००% | — | — | — | १००% |
| ८. | राष्ट्रीय मूल्येव गाभा घटकांवर आधारीत आशय आहे. | — | — | — | १००% | — | — | — | १००% | — | — | — | १००% |
| ९. | हा अभ्यासक्रम संस्कृतीचे संरक्षण, संवर्धन व सुधारणांना प्रोत्साहन देणारा आहे. | — | — | — | १००% | — | — | — | १००% | — | — | — | १००% |
| १०. | या अभ्यासक्रमात माहितीतंत्रज्ञानावर आधारित आशयचा समावेश आहे. | — | — | — | १००% | — | — | २०% | ८०% | — | — | — | १००% |
| ११. | हा अभ्यासक्रम व्यक्ती, कुटुंब, समाज व राष्ट्र यांना उपयोगी पडणारा आहे. | — | — | — | १००% | — | — | — | १००% | — | — | — | १००% |
|  | III) उपक्रम | — | — | — |  | — | — | — | — | — | — | — | — |
| १२. | या अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला व कृतीशीलतेला वाव देणारे उपक्रम आहेत. | — | — | — | १००% | — | — | २०% | ८०% | — | २०% | — | ८०% |
| १३. | विद्यार्थ्यांच्या स्वयंअध्ययनावर भर देणारे उपक्रम | — | — | — | १००% | — | — | — | १००% | — | — | — | १००% |
| १४. | या अभ्यासक्रमामध्ये आनंददायी व मनोरंजक उपक्रम आहेत. | — | — | — | १००% | — | — | — | १००% | — | — | — | १००% |
| १५. | या अभ्यासक्रमामध्ये भाषिक कौशल्यावर आधारीत उपक्रम आहेत. | — | — | — | १००% | — | — | — | १००% | — | — | — | १००% |
|  | IV) मूल्यमापन | — | — | — |  | — | — | — | — | — | — | — | — |
| १६. | यात मूल्यमापनसंदर्भात योग्य मार्गदर्शन आहे. | — | — | — | १००% | — | — | — | १००% | — | — | — | १००% |
| १७. | निरंतर व सर्वकष मूल्यमापनपध्दतीवर भर आहे | — | — | २०% | ८०% | — | २०% | — | ८०% | — | — | — | १००% |

| ‘ब’ पाठ्यपुस्तके | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अ) पाठ्यपुस्तकाचे बहिरंग | A | B | C | D | A | B | C | D | A | B | C | D |
| १. | आवरण —<br>मुखपृष्ठ व मलपृष्ठ छापताना वयोगटाचा विचार केला आहे. व ती हेतूपूर्ण आहेत. | — | — | — | १०० % | — | — | — | १००% | — | — | — | १००% |
| २. | आकार —<br>पाठ्यपुस्तकाचा आकार हाताळण्यास योग्य आहे. | — | — | २०% | ८०% | — | — | — | १००% | — | — | — | १००% |
| ३. | पाठ्यपुस्तकाचे मुद्रण व कागद —<br>या पाठ्यपुस्तकातील अक्षरांचा आकार सुस्पष्ट व योग्य आहे. तसेच कागद योग्य जाडीचा व शुभ्र आहे. | — | — | — | १०० % | — | — | — | १००% | — | — | — | १००% |
| ४. | बांधणी —<br>या पाठ्यपुस्तकाची बांधणी मजबूत आहे. | — | २०% | — | ८०% | — | — | — | १००% | — | — | — | १००% |
| ५. | किंमत —<br>या पाठ्यपुस्तकांची किंमत सर्वसामान्य विद्यार्थ्यांना परवडेल अशी आहे. | — | — | — | १०० % | — | — | — | १००% | — | — | — | १००% |
| | ब) पाठ्यपुस्तकाचे अंतरंग | — | — | — | | — | — | — | | — | — | — | |
| ६. | ही पाठ्यपुस्तके पाठ्यक्रमानुसार तयार केलेली आहेत | २०% | — | — | ८०% | — | — | — | १००% | २०% | — | — | ८०% |
| ७. | घटकांची मांडणी घटक पध्दतीने व मानसशास्त्रीय पध्दतीने केली आहे. | २०% | — | २०% | ६०% | — | २०% | — | ८०% | २०% | — | २०% | ६०% |

| अ.क्र. | मुद्दे | मराठी | | | | हिंदी | | | | इंग्रजी | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ब) पाठ्यपुस्तकाचे अंतरंग | A | B | C | D | A | B | C | D | A | B | C | D |
| ८. | घटक मांडणीत अध्यापन सूत्रांचा अवलंब केला आहे. | — | — | — | १००% | — | — | — | १००% | — | — | — | १००% |
| ९. | या पाठ्यपुस्तकातील आशयामध्ये अचूकता व सुसंगतता आहे. | — | — | — | १००% | — | २०% | — | ८०% | — | — | — | १००% |
| १०. | दहा गाभाघटक व राष्ट्रीय मूल्ये यांचा समावेश घटकांमध्ये आहे. | — | — | — | १००% | — | — | — | १००% | — | — | — | १००% |
| ११. | प्राथमिकस्तरावरील उद्दिष्टांची पूर्तता या पाठ्यपुस्तकातून होते. | — | २०% | — | ८०% | — | — | — | १००% | — | — | — | १००% |
| १२. | या पाठ्यपुस्तकांमध्ये समवाय तत्वांचा अवलंब केला आहे. | — | — | — | १००% | २०% | — | — | ८०% | — | — | २०% | ८०% |
| १३. | या पाठ्यपुस्तकातील भाषाशैली वयानुसार योग्य आहे. | — | — | — | १००% | — | — | — | १००% | — | — | — | १००% |
| १४. | या पाठ्यपुस्तकांमध्ये विद्यार्थ्यांच्या दैनंदिन जीवनाशी निगडीत उदाहरणांचा समावेश केला आहे. | — | — | २०% | ८०% | — | — | २०% | ८०% | — | — | — | १००% |
| १५. | भाषिक क्षमतांचा विकासासाठी आवश्यक घटक या पाठ्यपुस्तकामध्ये आहेत | — | — | — | १००% | — | — | | १००% | — | — | १००% | १००% |
| १६. | या पाठ्यपुस्तकात माहिती तंत्रज्ञानावर आधारीत घटकांचा समावेश आहे. | २०% | — | २०% | ६०% | — | — | ४०% | ६०% | — | — | — | १००% |
| | | | | | | | | | | | | | |

| | ब) पाठ्यपुस्तकाचे अंतरंग | A | B | C | D | A | B | C | D | A | B | C | D |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १७. | या पाठ्यपुस्तकांमध्ये आशय, साहित्यप्रकार व रूची याबाबतीत विविधता आढळते. | — | — | — | १००% | — | — | — | १००% | — | — | — | १००% |
| १८. | या पाठ्यपुस्तकांतील आशयामधून स्वावलंबी शिक्षण, आरोग्य शिक्षणाचा विचार झालेला दिसून येतो. | २०% | — | ८०% | — | — | २०% | — | ८०% | — | — | — | १००% |
| १९. | या पाठ्यपुस्तकांमध्ये पर्यावरण शिक्षणाचा विचार झालेला आहे. | — | — | — | १००% | — | — | — | १००% | — | — | — | १००% |
| २०. | व्याकरण घटकांचा समावेश वयानुसार झालेला आहे. | — | — | — | १००% | — | — | — | १००% | — | — | २०% | ८०% |
| २१. | सामान्यज्ञान वाढीचे प्रयत्न या पाठ्यपुस्तकातून झालेले आहेत. | — | — | — | १००% | — | — | — | १००% | — | — | — | १००% |
| २२. | या पाठ्यपुस्तकातून अध्ययन–अध्यापन प्रक्रिया आनंददायी व मनोरंजनात्मक बनविण्याचे प्रयत्न दिसून येतात. | — | — | — | १००% | — | — | — | १००% | — | — | — | १००% |
| २३. | उजळणीसाठी, स्वयंअध्ययनासाठी, स्वयंमूल्य मापनासाठी स्वाध्याय दिले आहेत. | — | — | — | १००% | — | — | — | १००% | — | — | — | १००% |
| २४. | या पाठ्यपुस्तकांमध्ये निरंतर व सर्वकष मूल्यमापनावर भर दिलेला आहे. | — | — | २०% | ८०% | — | — | — | १००% | — | — | — | १००% |

सूची : A- अशंत: असहमत B- पूर्णत: असहमत C-अशंत: सहमत D-पूर्णत: सहमत

## विश्लेषण व अर्थनिर्वचन :

वरील सारणी क्र.४.१ नुसार

'अ' अभ्यासक्रम

I) उद्दिष्टे :

१. निर्धारीत उद्दिष्टे साध्य करणारा अभ्यासक्रम :

या मुद्यासाठी मराठी, हिंदी, इंग्रजीसाठी प्रत्येकी ८०% तज्ञांनी पूर्णत: सहमत अशी मते नोंदविली आहेत.

२. सामाजिक गरजांना व बदलांना अनुसरून उद्दिष्टांची निश्चिती :

या मुद्यासाठी मराठी, हिंदी, इंग्रजीसाठी प्रत्येकी १००% तज्ञांनी पूर्णत: सहमत अशी मते नोंदवली.

३. बालकांच्या सर्वांगीण विकासास अनुसरून उद्दिष्ट मांडणी :

मराठीसाठी १००%, हिंदीसाठी ८०%, तर इंग्रजीसाठी १००%, तज्ञ पूर्णत: सहमत आहेत.

४. उद्दिष्टे निश्चित करताना विद्यार्थ्यांच्या मानसिकतेचा विचार :

या मुद्यासाठी मराठीसाठी १००%, हिंदीसाठी १००%, तर इंग्रजीसाठी ८०% तज्ञ पूर्णत: सहमत आहेत.

II) आशय :

५. विद्यार्थी विकास्तरानुसार आशय:

मराठी, हिंदी व इंग्रजीसाठी प्रत्येकी १००% तज्ञांनी पूर्णत: सहमत अशी मते नोंदवली आहेत.

६. आशयातील विविधता व लवचिकता :

या मुद्यासाठी मराठीसाठी ८०%, हिंदीसाठी ८०%, तर इंग्रजीसाठी १००% तज्ञांनी पूर्णत: सहमत अशी मते नोंदवली आहेत.

७. संख्येपेक्षा गुणवत्तेवर भर देणारा आशय :

या मुद्यासाठी मराठी, हिंदी, इंग्रजीसाठी प्रत्येकी १००% तज्ञांनी पूर्णतः सहमत अशी मते नोंदवली आहेत.

८. राष्ट्रीय मूल्ये व घटकांवर आधारीत आशय :

या मुद्यासाठी मराठी, हिंदी, इंग्रजीसाठी प्रत्येकी १००% तज्ञांनी पूर्णतः सहमत अशी मते नोंदवली आहेत.

९. संस्कृतीचे संरक्षण, संवर्धन व सुधारणाना प्रोत्साहन देणारा आशय :

या मुद्यासाठी मराठी, हिंदी, इंग्रजीसाठी १००% प्रत्येकी तज्ञांनी पूर्णतः सहमत अशी मते नोंदवली आहेत.

१०.माहिती तंत्रज्ञानावर आधारित आशय :

या मुद्यासाठी मराठीसाठी १००% , हिंदीसाठी ८०%, तर इंग्रजीसाठी १००% तज्ञांनी पूर्णतः सहमत अशी मते नोंदवली आहेत.

११. व्यक्ती,कुटूंब, समाज व राष्ट्र यांना उपयोगी पडणारा आशय:

या मुद्यासाठी मराठीसाठी १००%, हिंदीसाठी ८०%, तर इंग्रजीसाठी १००% तज्ञांनी पूर्णतः सहमत अशी मते नोंदवली आहेत.

III)उपक्रम :

१२. विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला व कृतीशीलतेला वाव देणारे उपक्रम :

या मुद्यासाठी मराठीसाठी १००%, हिंदीसाठी ८०%, तर इंग्रजीसाठी ८०% तज्ञांनी पूर्णतः सहमत अशी मते नोंदवली आहेत.

१३. विद्यार्थ्यांच्या स्वयंअध्ययनावर भर देणारे उपक्रम :

या मुद्यासाठी मराठी, हिंदी, इंग्रजीसाठी १००% तज्ञांनी पूर्णतः सहमत अशी मते नोंदवली आहेत.

१४. आनंददायी व मनोरंजक उपक्रम :

या मुद्यासाठी मराठी, हिंदी, इंग्रजीसाठी १००% तज्ञांनी पूर्णत: सहमत अशी मते नोंदवली आहेत.

१५. भाषिक कौशल्यावर आधारीत उपक्रम :

या मुद्यासाठी मराठी, हिंदी, इंग्रजीसाठी १००% तज्ञांनी पूर्णत: सहमत अशी मते नोंदवली आहेत.

IV) मूल्यमापन

१६.मूल्यमापन संदर्भात योग्य मार्गदर्शन :

या मुद्यासाठी मराठी, हिंदी, इंग्रजीसाठी १००% तज्ञांनी पूर्णत: सहमत अशी मते नोंदवली आहेत.

१७. निरंतर व सर्वंकष मूल्यमापन :

या मुद्यासाठी मराठी व हिंदीसाठी प्रत्येकी ८०%, इंग्रजीसाठी १००% तज्ञांनी पूर्णत: सहमत अशी मते नोंदवली आहेत.

ब पाठ्यपुस्तके :

I) पाठ्यपुस्तकाचे बहिरंग :

१. आवरण: पाठ्यपुस्तकाचे आवरण या मुद्यासाठी तज्ञांनी मराठी १००% पूर्णत: सहमत, हिंदी १००% पूर्णत: सहमत, इंग्रजी १००% पूर्णत: सहमत अशी मते नोंदविली आहेत.

२. पाठ्यपुस्तकाचा आकार : या मुद्यासाठी तज्ञांनी मराठी ८०% पूर्णत: सहमत, हिंदी १००% पूर्णत: सहमत, इंग्रजी १००% पूर्णत: सहमत अशी मते नोंदविली आहेत.

३. पाठ्यपुस्तकाचे मुद्रण व कागद : या मुद्यासाठी तज्ञांनी मराठी १००% पूर्णत: सहमत, हिंदी १००% पूर्णत: सहमत, इंग्रजी १००% पूर्णत: सहमत अशी मते नोंदविली आहेत.

४. पाठ्यपुस्तकाची बांधणी : या मुद्यासाठी तज्ञांनी मराठी ८०% पूर्णत: सहमत, हिंदी १००% पूर्णत: सहमत, इंग्रजी १००% पूर्णत: सहमत अशी मते नोंदविली आहेत.

५. किंमत : या मुद्यासाठी तज्ञांनी मराठी ८०% पूर्णत: सहमत, हिंदी १००% पूर्णत: सहमत, इंग्रजी १००% पूर्णत: सहमत अशी मते नोंदविली आहेत.

II) पाठ्यपुस्तकाचे अंतरंग :

६. पाठ्यक्रमानुसार पाठ्यपुस्तके : या मुद्यासाठी तज्ञांनी मराठीसाठी ८०% पूर्णत: सहमत, हिंदीसाठी १००% पूर्णत: सहमत, इंग्रजीसाठी १००% पूर्णत: सहमत अशी मते नोंदविली आहेत.

७. घटकांची मांडणी : या मुद्यासाठी तज्ञांनी मराठीसाठी ६०% पूर्णत: सहमत, हिंदीसाठी ८०% पूर्णत: सहमत, इंग्रजीसाठी ६०% पूर्णत: सहमत अशी मते नोंदविली आहेत.

८. घटक मांडणीत अध्यापन सूत्रांचा वापर : या मुद्यासाठी तज्ञांनी मराठीसाठी १००% पूर्णत: सहमत, हिंदीसाठी १००% पूर्णत: सहमत, इंग्रजीसाठी १००% पूर्णत: सहमत अशी मते नोंदविली आहेत.

९. आशयातील अचूकता व सुसंगतता : या मुद्यासाठी तज्ञांनी मराठसाठी १००% पूर्णत: सहमत, हिंदीसाठी ८०% पूर्णत: सहमत, इंग्रजीसाठी १००% पूर्णत: सहमत अशी मते नोंदविली आहेत.

१०. दहा गाभाघटक व राष्ट्रीय मूल्ये : या मुद्यासाठी तज्ञांनी मराठीसाठी १००% पूर्णत: सहमत, हिंदीसाठी १००% पूर्णत: सहमत, इंग्रजीसाठी १००% पूर्णत: सहमत अशी मते नोंदविली आहेत.

११. प्राथमिकस्तरावरील उद्दिष्टांची पूर्तता : या मुद्यासाठी तज्ञांनी मराठीसाठी ८०% पूर्णत: सहमत, हिंदीसाठी १००% पूर्णत: सहमत, इंग्रजीसाठी १००% पूर्णत: सहमत अशी मते नोंदविली आहेत.

१२. समवाय तत्व : या मुद्यासाठी तज्ञांनी मराठीसाठी १००% पूर्णत: सहमत, हिंदीसाठी ८०% पूर्णत: सहमत, इंग्रजीसाठी ८०% पूर्णत: सहमत अशी मते नोंदविली आहेत.

१३. पाठ्यपुस्तकातील भाषाशैली : या मुद्यासाठी तज्ञांनी मराठीसाठी १००% पूर्णत: सहमत, हिंदीसाठी १००% पूर्णत: सहमत, इंग्रजीसाठी १००% पूर्णत: सहमत अशी मते नोंदविली आहेत.

१४. विद्यार्थ्यांच्या जीवनाशी निगडीत आशय : या मुद्यासाठी तज्ञांनी मराठीसाठी ८०% पूर्णत: सहमत, हिंदीसाठी ८०% पूर्णत: सहमत, इंग्रजीसाठी १००% पूर्णत: सहमत अशी मते नोंदविली आहेत.

१५. भाषिक क्षमतांच्या विकासासाठी आवश्यक घटक : या मुद्यासाठी तज्ञांनी मराठीसाठी १००% पूर्णत: सहमत, हिंदीसाठी १००% पूर्णत: सहमत, इंग्रजीसाठी १००% पूर्णत: सहमत अशी मते नोंदविली आहेत.

१६. माहिती तंत्रज्ञान : या मुद्यासाठी तज्ञांनी मराठीसाठी ६०% पूर्णत: सहमत, हिंदीसाठी ६०% पूर्णत: सहमत, इंग्रजीसाठी १००% पूर्णत: सहमत अशी मते नोंदविली आहेत.

१७. आशय, साहित्यप्रकार व रूची : या मुद्यासाठी तज्ञांनी मराठी, हिंदी, व इंग्रजीसाठी प्रत्येकी १००% पूर्णत: सहमत अशी मते नोंदविली आहेत.

१८. स्वावलंबी शिक्षण व आरोग्य शिक्षण : या मुद्यासाठी तज्ञांनी मराठीसाठी ८०% पूर्णत: सहमत, हिंदीसाठी ८०% पूर्णत: सहमत, इंग्रजीसाठी १००% पूर्णत: सहमत अशी मते नोंदविली आहेत.

१९. पर्यावरण शिक्षण : या मुद्यासाठी तज्ञांनी मराठी, हिंदी, व इंग्रजीसाठी प्रत्येकी १००% पूर्णत: सहमत अशी मते नोंदविली आहेत.

२०. वयोगटानुसार व्याकरण : या मुद्यासाठी तज्ञांनी मराठीसाठी १००% पूर्णत: सहमत, हिंदीसाठी १००% पूर्णत: सहमत, इंग्रजीसाठी ८०% पूर्णत: सहमत अशी मते नोंदविली आहेत.

२१. सामान्यज्ञान : या मुद्यासाठी तज्ञांनी मराठी, हिंदी, इंग्रजीसाठी प्रत्येकी १००% पूर्णत: सहमत अशी मते नोंदविली आहेत.

२२. अध्ययन–अध्यापन प्रक्रिया आनंददायी व मनोरंजक : या मुद्यासाठी तज्ञांनी मराठी, हिंदी, इंग्रजीसाठी प्रत्येकी १००% पूर्णत: सहमत अशी मते नोंदविली आहेत.

२३. स्वयंअध्ययनासाठी, स्वयंमूल्यमापनासाठी स्वाध्याय : या मुद्यासाठी तज्ञांनी मराठी, हिंदी, इंग्रजीसाठी प्रत्येकी १००% पूर्णत: सहमत अशी मते नोंदविली आहेत.

२४. निरंतर सर्वंकष मूल्यमापन : या मुद्यासाठी तज्ञांनी मराठीसाठी ८०% पूर्णत: सहमत, हिंदीसाठी १००% पूर्णत: सहमत, इंग्रजीसाठी १००% पूर्णत: सहमत अशी मते नोंदविली आहेत.

## विभाग 'ब'

मतावलीच्या अनुषंगाने तज्ञांनी निश्चित केलेल्या मानकांनुसार सन २००६ च्या अभ्यासक्रमाचे व त्यानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, व इंग्रजींच्या पाठ्यपुस्तकांचे विश्लेषण –

या विभागात संशोधिकेने 'अ' विभागात निश्चित झालेल्या मुद्द्यांच्या अनुषंगाने इ.५ वी च्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या अभ्यासक्रमाचे व त्यानुसार तयार झालेल्या पाठ्यपुस्तकांचे विश्लेषण केले. हे विश्लेषण पुढीलप्रमाणे मांडले आहे.

I – सन २००६च्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या अभ्यासक्रमाचे विश्लेषण.

II – पाठ्यपुस्तकाचे विश्लेषण – या विभाग 'अ'मध्ये निश्चित केलेल्या सर्व मुद्द्यांच्या अनुषंगाने मराठी, हिंदी, इंग्रजी पाठ्यपुस्तकांचे विश्लेषण न करता प्रत्येक पाठ्यपुस्तकांशी निगडीत मुद्द्यांच्या अनुषंगाने विश्लेषण केलेले आहे.

## अभ्याक्रमाचे विश्लेषण

### ४.२ उद्दिष्ट क्र.१,२,३,४ नुसार :— सन २००६च्या प्राथमिक स्तरावरील भाषांच्या अभ्यासक्रमाचे विश्लेषण

### सन २००६ च्या इ.५वी च्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या पाठ्यक्रमातील उद्दिष्टे

| क्षेत्रे | उद्दिष्टे | | |
|---|---|---|---|
| | मराठी | हिंदी | इंग्रजी |
| १) श्रवण | १) एकाग्रतेने भाषण—संभाषण संवाद इ. ऐकता येणे<br>२) समजपूर्वक ऐकता येणे.<br>३) पाठ्यमजकूर समजपूर्वक ऐकता येणे. | १) रूचि एवं आनंदपूर्वक सुनना<br>२) समझपूर्वक सुनना<br>३) स्वर और व्यंजन के उच्चारण को ध्यानपूर्वक सुनना<br>४) विशेष ध्वनिके शुध्द उच्चारण को समझकर सुनना<br>५) आशय समझते हुए परिचित एवं अपरिचित पाठ्यांश सुनना | To enable to student to<br>1) Enjoy the rhythm & understainding the list of songs & poems.<br>2) Enjoy & understand stories.<br>3) Show on awareness of stress patterns<br>4) Listen and Write words.<br>5) Distringuish between simple intonation patterns.<br>6) Understad simple statements questions, requests & commands act accordingly<br>7) Understand conversation connected with familiar topics.<br>8) Lilsten with concentration of 5-7 minutes.<br>9) Understand simple English spoken by various persons.<br>10) Enjoy skits/plays & notice sequences of incidents. |

| क्षेत्रे | उद्दिष्टे | | |
|---|---|---|---|
| | मराठी | हिंदी | इंग्रजी |
| २) भाषण– संभाषण | १) कविता, समूहगीते/स्फूर्तिगीते म्हणता येणे.<br>२) ऐकलेली, वाचलेली माहिती सांगता येणे.<br>३) ऐकलल्या वाचलेल्या मजकुरातील सर्वसाधारण आशय सांगता येणे.<br>४) न अडखळता, सहजपणे, आत्मविश्वासपूर्वक व मुद्देसूद बोलता येणे.<br>५) विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देणे.<br>६) स्वत:हून प्रश्न विचारणे.<br>७) लहान–मोठ्या वडिलधारी व्यक्तींशी बोलताना उचित शब्दांचा वापर करणे. | १) गीत, कविता गाना और कंठस्थ करना।<br>२) सुनी हुई पाठ्यसामग्री पुन: कहना।<br>३) जानकारी हेतू प्रश्न पूछना।<br>४) पाठ्यांशपर मौखिक उत्तर देना।<br>५) छोटे, समवयस्क, आदरणीय व्यक्तियों के साथ उचित भाषामें बोलना।<br>६) अपने साथियों तथा अध्यापकोंसे सही ढंग से बातचित करना। | To enable the student to<br>1) learn to speak with proper pronouciation<br>2) Understand and reproduce contrustive sounds.<br>3) Recite with enjoyment poems/songs with proper rhythm.<br>4) Learn to interact appropriately according to the roles.<br>5) learns to give short/long responses in various contexts.<br>6) Discribe objects, pictures, processes.<br>7) Attempt to narrate stories/ events/incidents.<br>8) Learn to open a conversation.<br>9) Learn to use appropriate experession- |

| क्षेत्रे | उद्दिष्टे | | |
|---|---|---|---|
| | मराठी | हिंदी | इंग्रजी |
| ३) वाचन | १) परिसरातील मजकूर समजपूर्वक वाचता येणे.<br>२) छापील हस्तलिखित मजकुराचे प्रकट—वाचन प्रभावीपणे करता येणे.<br>३) नवीन शब्दांचा अर्थ समजून वाचन करता येणे.<br>४) समजपूर्वक व एकाग्रतेने मूकवाचन करता येणे. | १) लिखित छपे हुए शब्द पढना।<br>२) एकही दृष्टीक्षेपमे अधिक से अधिक शब्दों का पढना।<br>३) समझपूर्वक मुखवाचन करना।<br>४) वाचनमे रूचि निर्माण करना। | To enable the student to<br>1) Identify commonly used work at sight.<br>2) Make intelligent guesses about the pronounciations of new words.<br>3) Read aloud from the textbook, the blackboard & other sources.<br>4) Show an understating of punctuation makrs in his/her reading.<br>5) Read and act accordingly<br>6) Read aloud talking proper pauses.<br>7) Read poems in rhythm.<br>8) Read with concentration & interest.<br>9) Read maps, charts, numbers, etc.<br>10) Use dictionaries, directories etc. |
| ४) लेखन | १) अचूक अनुलेखन करता येणे.<br>२) शब्द व वाक्ये यांचे श्रुतलेखन करता येणे.<br>३) ऐकून/वाचून प्रश्नांची उत्तरे लिहिता येणे.<br>४) शब्द, वाक्य, वाक्प्रचार, म्हणी, कविता आठवून लिहिता येणे.<br>५) स्वत:हून लेखन करता येणे. | १) अनुलेखन करना।<br>२) श्रुतलेखन करना।<br>३) स्वयंप्रेरणा से लेखन करना।<br>४) पाठ्यांशपर आधारित लेखन करना।<br>५) निंबध लेखन। | To enable the student to<br>1) Develop the habit of writing neatly & legibly.<br>2) Write on one line-<br>3) Copy the letters, words & sentences.<br>4) Complete sentences.<br>5) Enrich vocabulary by taking part in language games.<br>6) Write words on a given topic.<br>7) Write numbers in figures as well as in words.<br>8) Write compositions using provided guidance |

| क्षेत्रे | उद्दिष्टे | | |
|---|---|---|---|
| | मराठी | हिंदी | इंग्रजी |
| ५) कार्यात्मक व्याकरण | १) शब्दांच्या जाती ओळखता येणे.<br>२) एका जातीच्या शब्दांपासून इतर जातीचे शब्द बनविणे.<br>३) वाक्याचा काळ ओळखता येणे.<br>४) लेखनविषयक नियमानुसार लिहिता येणे. | १) वर्ण परिचय<br>२) शब्द परिचय<br>३) विरामचिन्ह<br>४) ध्यान देने योग्य आवश्यक बाते | |

## विश्लेषण व अर्थनिर्वचन :

वरील सारणी क्र. ४.२ नुसार २००६ च्या इ.५वी मराठी, हिंदी अभ्याक्रमातून एकूण ५ क्षेत्रे आहेत तर इंग्रजीच्या अभ्यासक्रमात ४ क्षेत्रे आहेत. ही क्षेत्रे म्हणजे श्रवण, भाषण–संभाषण, वाचन, लेखन ही कौशल्ये व कार्यात्मक व्याकरण अशी आहेत.

प्रत्येक क्षेत्रानुसार वेगळी उद्‌दिष्ट्ये दिलेली आहेत. केवळ बौध्दिकतेवर भर न देता भविष्यकाळातील गरजा लक्षात घेऊन भाषण–संभाषण कौशल्याचा विकास व्हावा, त्याबरोबरच इतर भाषिक कौशल्यांचा विकास व्हावा, यादृष्टीने ही उद्‌दिष्टे मांडलेली आहेत.

**निष्कर्ष** : यावरून असे दिसून येते की –

१) सन २००६चा अभ्यासक्रम हा निधारित उद्‌दिष्टे साध्य करणारा आहे.

२) या उद्‌दिष्टांची निश्चिती सामाजिक गरजांना व बदलांना अनुसरून झाली आहे.

३) नजीकच्या भविष्यकाळाचा विचार करून ही उद्‌दिष्टे मांडली आहेत.

४) विद्यार्थ्याच्या मानसिकतेचा विचार करून ही उद्‌दिष्टे मांडली आहेत.

५) ही उद्‌दिष्टे भाषिक कौशल्यांवर आधारीत आहेत.

६) विद्यार्थ्याच्या सर्वांगिण विकासास पूरक अशी उद्‌दिष्टे आहेत.

## सारणी क्र.४.३

## सन २००६च्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या अभ्यासक्रमातील आशयाची वैशिष्टे

| मराठी | हिंदी | इंग्रजी |
|---|---|---|
| १) गद्य–पद्य पाठांचा पाठपरिचय, विविध पाठ व उतारे यांचा आशय निवडताना दैनंदिन जीवनाशी निगडीत अशी वैविध्यपूर्ण अद्ययावत माहिती दिली आहे. | १) विद्यार्थी रूचिपूर्वक, आनंदपूर्वक व समजपूर्वक अध्ययन करावा यासाठी हिंदी कविता, हिंदी गद्यखंड, छोट्या कथा, विनोद इ. दिलेले आहेत. | १) श्रवण, भाषण,वाचन, लेखन या कौशल्यावर आधारीत विविध कथा, कवितांचा. समावेश आहे. विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला, त्यांच्या भावविश्वाला आकर्षित करतील, विद्यार्थ्यांचे मनोरंजन करतील, नीतीमूल्ये देतील अशा कथांचा समावेश केलेला आहे. |
| २) शब्दसमृध्दी व भाषा समृध्दीसाठी वाक्प्रचार, म्हणी यांचा समावेश आहे. | २) विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान जागृत करण्यासाठी शब्द चित्र आहेत. | २) जगविख्यात नामांकित कवींच्या कवितांचा समावेश |
| ३) सामूहिक व वैयक्तिक तालासुरात गाण्यासारखी, म्हणण्यासारखी पद्य रचना केली आहे. | ३) उच्चारण मधील फरक समजण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारचे शब्द दिलेले आहेत. | ३) विद्यार्थ्यांचे सामान्यज्ञान वाढविण्यासाठी विज्ञान, भूगोल विषयातील विविध उतारांचा समावेश |
| ४) श्रवण, भाषण–संभाषण, वाचन, लेखन ही कौशल्ये विकसित होण्यासाठी स्वतंत्रपणे नमुना मजकूर दिले आहेत. | ४) हवा, पाणी, ऋतू, नववर्ष यावर आधारीत कविता यांच्या सहाय्याने मौनवाचन सामूहिक वाचनवर भर | ४) अध्ययन–अध्यापन प्रक्रिया आनंददायी व मनोरंजक बनविण्यासाठी विविध भाषिक खेळांचा समावेश |
| ५) अवांतर वाचनावर आधारीत आशय. | ५)विद्यार्थ्यांच्या वयोगटानुसार त्यांना समजतील अशा छोट्या कहानींमधून सावधगिरी, दुसऱ्यांची काळजी घेण, नैतिक जबाबदारी, मित्रभाव इ. मूल्यांचा विकास करण्याचा प्रयत्न. | ५) माहिती तंत्रज्ञानावर आधारीत वृत्तपत्रातील कात्रणे, जाहिरातीसंदर्भात वेगवेगळे उपक्रम |

| मराठी | हिंदी | इंग्रजी |
|---|---|---|
| ६) पर्यावरण, तंत्रज्ञान, शेती, पत्रे, जाहिराती, सूचना, विज्ञान इ. वर आधारीत आशय. | ६) चित्रकथांच्या सहाय्याने संभाषणावर भर, गाव, शहर, डाकघर बँक इ. पाठातून व्यवहारज्ञानावर भर देणे. | ६) भाषण–संभाषण कला आत्मसात करण्यासाठी मुलाखतीच्या वेगवेगळ्या पध्दती. |
| ७) सरावासाठी कार्यात्मक व्याकरण | ७) घर,शाळा, समाज व देश यांना जोडणाऱ्या आशयावर आधारीत संभाषण | ७) विद्यार्थ्यांच्या स्वयंअध्ययनसाठी स्वयंमूल्य–मापनासाठी विविध प्रकल्पांचा समावेश |
| ८) कौशल्यांच्या विकासासाठी विविध आशयावर आधारीत चित्रांचा समावेश | ८) चित्रांच्या सहाय्याने विद्यार्थ्यांना दैनंदिन व्यवहारात उपयोगी ज्ञान देणे. | ८) विद्यार्थ्यांना विचारप्रवृत्त व कृतीशील बनविण्यासाठी विविध प्रकारच्या स्वाध्यायांचा समावेश केलेला आहे. |
| ९) स्वयंलेखन, वाचन व कल्पनाशक्तीला वाव देणारे स्वाध्याय व उपक्रम | ९) विद्यार्थ्यांच्या शब्दज्ञानवाढीसाठी उपयुक्त आशय | ९) योग्य तेथे मातृभाषेचा वापर. |
| १०) सराव चाचण्यांसाठी नमुनाप्रश्न | १०) मनोरंजनात्मक आशयांचा समावेश | १०) व्याकरणाचा अप्रत्यक्ष अंतर्भाव |
| ११) पाठ व कवितांचा आशय समजण्यासाठी आकर्षक चित्राकृती | ११) श्रवण–वाचनासाठी खेळ, पशुपक्षी, देशप्रेम इ. वर आधारीत पद्य | ११) विद्यार्थ्यांच्या शब्दसंपत्तीचा विकास व्हावा यासाठी उपयुक्त आशयांचा समावेश |
| १२) कृतिशीलता, कल्पकता, सर्जनशीलतेवर आधारीत आशय | १२) वाचन कौशल्यासाठी रोचक, आकलनीय गोष्टी, दैनंदिनी, निबंध इ. | १२) एकंदरीत श्रवण, भाषण, वाचन व लेखन कौशल्यावंर आधारीत विविध आशय व उपक्रमांचा व स्वाध्यायांचा समावेश |
| १३) नवीन घडामोडी, बोलीभाषा संत साहित्य, थोर समाजसेवक, शास्त्रज्ञ, नेते यांच्या कार्यावर आधारीत आशय. | १३) कृतियुक्त स्वाध्याय व आशय | १३) विविध मूल्ये व गाभाघटकांवर आधारित आशय |
| १४) शिक्षकांना अध्यापनासाठी आवश्यक त्या सूचना व मार्गदर्शन | १४) शिक्षकांना अध्यापनासाठी सूचना व मार्गदर्शन | १४) शिक्षकांना अध्यापनासाठी सूचना व मार्गदर्शन |

## विश्लेषण व अर्थनिर्वचन :

वरील सारणी क्र.४.३ नुसार सन २००६ च्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या अभ्यासक्रमातील आशयामध्ये विविधता व लवचिकता आढळते. विविध कौशल्यावर आधारीत विविध प्रकारच्या आशयांचा समावेश केलेला आहे. या अभ्यासक्रमात उद्‌दिष्टे पूर्ण करणारा आशय–अध्ययन, अनुभव व उपक्रम दिलेले आहेत.

**निष्कर्ष** : यावरून असे दिसून येते की –

१) सन २००६च्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या अभ्यासक्रमातील आशय हा विद्यार्थ्यांच्या विकासस्तरानुसार आहे.

२) या अभ्यासक्रमातील आशयमध्ये विविधता व लवचिकता आहे.

३) संख्येपेक्षा गुणवत्तेवर आधारीत आशय आहे.

४) या अभ्यासक्रमामध्ये विविध राष्ट्रीय मूल्ये व गाभाघटकांचा परिपोष केलेला आहे.

५) क्रमबध्दतेचा विचार दिसून येतो.

६) संस्कृतीचे संरक्षण व संवर्धनासाठी प्रयत्न झालेले आहेत.

७) या अभ्यासक्रमात जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरणावर भर आहे.

८) माहिती तंत्रज्ञानाचा विचार केलेला आहे.

९) एकंदरीत व्यक्ती, कुटुंब, समाज व राष्ट्र यांना उपयोगी पडणारा आशय या अभ्यासक्रमात दिलेला आहे.

## सारणी क्र.४.४

## सन २००६च्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या अभ्यासक्रमातील उपक्रमांची वैशिष्टे

| क्षेत्रे | मराठी | हिंदी | इंग्रजी |
|---|---|---|---|
| १) श्रवण | १) आवडीच्या विषयावरील भाषण संभाषण गोष्टी, माहिती, गाणी सोप्या शब्दात ऐकविणे. | १)छोट्या बालकविता, अभिनयगीते, कविता, कहाण्या, विनोद, छोटे संवाद, इ. ऐकविणे | १) ऐका व म्हणा, वर्णन ऐकूण योग्य चित्र ओळखा, लक्षपूर्वक ऐका व दिलेले वाचून पाठ्यपुस्तकातील गोष्टी ओळखा इ. पूरक कृती करून शिक्षक विद्यार्थ्यांना जास्तीतजास्त श्रवणाची संधी उपलब्ध करू शकतात |
| | २) विविध कार्यक्रमातील भाषणे, ध्वनिफिती, नाट्यप्रवेश इ. ऐकविणे. | २) वेगवेगळ्या कार्यक्रमांच्या वेळेस व्याख्याने, ध्वनिफिते, आकाशवाणी, दूरदर्शन, सीडी इ. वर विद्यार्थ्यांना विशेष कार्यक्रम ऐकविणे | २) Keeping quite मध्ये विद्यार्थी एकामागून एक प्रश्न विचारतो व त्याचा जोडीदार न बोलता केवळ हावभाव, हास्य किंवा खाणाखुणा याव्दारे प्रश्नांची उत्तरे देतो. हा खेळ जोडीने किंवा गटात खेळावा अशी अपेक्षा आहे. |
| | ३) गद्य–पद्य उतारे, आकाशवाणी, दूरदर्शन यावरील बातम्या, माहिती, संवाद–संभाषण, चर्चा व विचार प्रवर्तक छोटी भाषणे इ. वर्ग कार्यात व विविध उपक्रमांतून ऐकवावेत. | ३) देशभक्तिपर गीते, समूहगीते, राष्ट्रगीते ऐकविणे | ३) Ditto- ऐका व जसेच्या तसे आठवून लिहा असे या उपक्रमाचे स्वरूप आहे. |

| क्षेत्रे | मराठी | हिंदी | इंग्रजी |
|---|---|---|---|
| १) श्रवण | ४) ऐकलेल्या भागावर सोपे प्रश्न विचारून चर्चा घडवून आणणे. | ४) आज्ञा, आदेश, विनंती, सूचना इ. वर्गात उपयोग करणे. | ४) लक्षपूर्वक ऐका, वाचा आणि वाक्य व चित्रांच्या जोड्या जुळवा ही कृती श्रवण—वाचन या कौशल्यांच्या विकासासाठी आहे. |
| | ५) पाठ्यमजकुरातील आशय स्पष्ट करण्यासाठी कथन, स्पष्टीकरण व चर्चा करणे. | ५) भाषिक खेळ | ५) वेगवेगळ्या कथा ५ ते ७ मिनिटांपर्यंत लक्षपूर्वक ऐकल्या जाव्यात अशी अपेक्षा आहे. शिक्षकांनी या कथांचे प्रकटपणे वाचन करून श्रवणाची संधी विद्यार्थ्यांना द्यावी. |
| | ६) विविध उपक्रम व भाषिक खेळ घेणे | ६) दिन, महिने, रंगाची नावे, फूल, फळे, भाज्या, खाद्यान्ने स्वच्छता व आरोग्य इ. संबंधी माहिती ऐकविणे | ६) Science Magazine सारख्या उपक्रमांमधून वैज्ञानिक जीवनाशी निगडीत गोष्टी ऐकण्याची सवय लावणे. |
| | ७) शिकवून झालेल्या भागावर प्रश्न विचारणे | ७) स्वर व व्यंजन यामधील फरक हिंदीतील विशेष स्वर व व्यंजन यांचे उच्चारण, पाठ्यांश व इतर मजकूर भावपूर्ण गीत, छोट्यानाटीका, एकांकीका ऐकविणे | |
| | ८) पाठ्यांशांचा निवडक भाग वाचून दाखवावा व त्यावर प्रश्न विचारणे | ८) दूरदर्शन, आकशवाणीवर प्रसारीत होणारे मनोरंजक विनोद, उखाणे, कोडे, बातम्या, बालकार्यक्रम इ. ऐकविणे. | |
| | ९) बालसभेतील कार्यक्रमात भाषणे ऐकविणे. | ९) पाठ्यसामग्रीवर दिलेले प्रश्न व त्यांची उत्तरे यांच्यावरील चर्चा ऐकविणे. | |

| क्षेत्रे | मराठी | हिंदी | इंग्रजी |
|---|---|---|---|
| २) भाषण संभाषण | १) कविता, समूहगीते, स्फूर्तिगीते इ. तालासुरात म्हणवूण घेणे | १)तालासुरात, साभिनय, चढ–उतारात विविध गीते, समूहगीते म्हणवून घेणे | १) गीत,कविता, समूहगीते यांचे तालासुरात चढ–उतारामध्ये गायन |
| | २) निरोप, सूचना मजकूर इ. चे पुनर्कथन करवून घेणे. | २) गीत, गोष्टी, कोडे, हास्य नकला, दैनिक जीवनाशी संबंधित गोष्टी इ. चे वर्णन करण्यास सांगणे. | २) दैनंदिन जीवनातील शाळा, कुटुंब, सहकारी यांचेविषयी संवाद साधणे |
| | ३) मजकुरातील महत्वाचे मुद्दे कल्पना, भावना, मुख्यविचार, मध्यवर्ती कल्पना, कार्यकारणभाव, घटनाक्रम, मजकुरावर आधारीत अनुमान काढणे, मत सांगणे इ. साठी मुलांना प्रवृत्त करणे. | ३) आकाशवाणी, दूरदर्शन कार्यक्रमांचे वर्णन करण्यास सांगणे | ३) विविध कथांमधून भूमिका सादरीकरण |
| | ४)परिचितप्रसंग/घटनांचे वर्णन अनुभवलेल्या घटना, प्रसंग, कथन करण्यास सांगणे | ४) प्रश्नोत्तराचे खेळ खेळणे | ४) Lets Talk या कृतीव्दारे शिक्षक व विद्यार्थी यांच्यामध्ये प्रश्नोत्तरांच्या सहाय्याने विद्यार्थ्यांना बोलण्यास प्रवृत्त करणे. |
| | ५) दिलेल्या विषयावर भाषणासंबंधी सर्व नियमांचे पालन करून भाषण करण्यास सांगणे | ५) हिंदी विषयावर छोटी–छोटी भाषणे आयोजित करणे. | ५) राहण्याचे ठिकाण, पालकांचा व्यवसाय यावर प्रश्न विचारणे |

| क्षेत्रे | मराठी | हिंदी | इंग्रजी |
|---|---|---|---|
| २) भाषण संभाषण | ६) भाषण स्पर्धा आयोजित करणे | ६) दैनिक व्यवहार, घटना, वर्गातील विविध विषयांवर चर्चा घडवून आणणे | ६) Say faster and faster हा उपक्रम राबविणे |
| | ७) प्रश्नमंजुषा उपक्रमांचे आयोजन | ७) व्याकरण विषयक विविध घटकांवर चर्चा करणे. | ७) मुलाखत (interview) हा उपक्रम घेणे |
| | ८) परिपाठात प्रश्न विचारणे | ८) पाठ्य मजकुरावरील प्रश्न विचारणे | ८) चित्रांचे वर्णन कथांचा सारांश इ. उपक्रम |
| | ९) विविध मजकूर, पाठ्यविषयावर चर्चा घडवून आणणे. | | |
| | १०) वर्गकार्य, गटकार्य, क्षेत्रभेटी इ. उपक्रमांचे आयोजन | | |
| ३) वाचन | १) शालेय परिसरातील मजकूर (भित्तीपत्रके, फलक, सूचना इ.) चे वाचन | १) विविध स्वर, व्यंजने, फलकांवरील मजकूर, सूचना, शब्दकार्ड, वाक्यपट्टी, इ. वाचन | १) शब्दा–शब्दाने कम होणारी वाक्ये/वाढत जाणारी वाक्ये यांचे वाचन |
| | २) सार्वजनिक ठिकाणी लिहिलेल्या सूचना, माहिती (पोस्ट, बॅंक, उद्याने, बसस्थानक, स्थानिक स्वराज्य संस्था इ.) | २) पाठ्यपुस्तकातील व पाठ्यपुस्तका बाहेरील मजकूराचे प्रकटवाचन | २) शब्दांच्या जोड्या लावणे |
| | ३) परिसरातील मजकुरांचे वाचन | ३) १ ते १०० संख्यांचे वाचन | ३) A Garden of Words मधील शब्दांचे वाचन |
| | ४) पाठ्यपुस्तकासोबत छापील व हस्तलिखित मजकुराचे नमुने यांचे वाचन | ४) पाठ्यांशाचे मौनवाचन | ४) संभाषणाचे वाचन |
| | ५) वैयक्तिक व सामूहिकप्रकट वाचन | ५) भाषिक खेळ | ५) वर्तमानपत्रातील जाहिरातींचे वाचन |
| | ६) वाचन स्पर्धांचे आयोजन | ६)पाठ्येतर साहित्य:बीरबलच्या गोष्टी, महापुरूष,वैज्ञानिक यांचे जीवनचरित्रे, इ. | ६) तालिकांपासून तयार होणाऱ्या वाक्यांचे वाचन |

| क्षेत्रे | मराठी | हिंदी | इंग्रजी |
|---|---|---|---|
| ३) वाचन | ७) राष्ट्रीय गीते, स्फूर्तीगीते, नाट्य–संवाद कविता, गाणी इ. चे वाचन | ७) पाठ्येतर बालसाहित्याचे वाचन | ७) कथांचे व इतर मजकुरांचे वाचन |
| | ८) पाठ्यपुस्तकातील मजकूर/कविता, कथा, बालसाहित्य इ. चे वाचन, त्यातील नवे शब्द, शब्दसंग्रह यांचे वाचन, अर्थासंबंधी चर्चा, शब्दकोशांचे वाचन | | ८) Science Magazine मधील उताऱ्यांचे वाचन |
| | ९) पाठ्यपुस्तकातील, पाठ्यपुस्तका बाहेरील निवडक मजकुरांचे वाचन | | |
| ४) लेखन | १) छापील हस्तलिखित मजकूराचे अनुलेखन | १) वर्णमालांचे लेखन | १) शब्द पट्ट्या (Word cards) तयार करणे |
| | २) आवडलेल्या मजकुराचे अनुलेखन | २) फलकावरील व पाठ्यपुस्तकातील शब्द/वाक्ये यांचे लेखन | २) दिलेल्या शब्दांच्या/शब्दसमूहांच्या संदर्भात वाचलेली/अश्वासलेली कथा पूर्ण करणे |
| | ३) नवीन शब्द, विरामचिन्ह युक्त वाक्ये, छोटे परिच्छेद श्रुतलेखन | ३) १ ते १०० अंकाचे अनुलेखन | ३) आवडत्या वस्तू /प्राणी व्यक्ती इ. बद्दल माहिती लेखन |
| | ४) पाठ्यांशावरील प्रश्नांची उत्तरे लिहिणे | ४) छोट्या–छोट्या वाक्यांचे श्रुतलेखन | ४) तालिकेच्या सहाय्याने अर्थपूर्ण वाक्ये तयार करून लिहिणे |
| | ५) एखादा शब्द घेऊन त्याच्याशी संबंधित अधिक शब्द, वाक्ये यांचे लेखन | ५) विरामचिन्हयुक्त वाक्यांचे श्रुतलेखन | ५)परिसरातील घडामोडीसंदर्भात बातमीवजा मजकूर लिहिणे |

| क्षेत्रे | मराठी | हिंदी | इंग्रजी |
|---|---|---|---|
| ४) लेखन | ६) अवयवांची नावासंदर्भात वाक्प्रचार, म्हणी लिहिणे | ६) मित्र, नातेवाईक, घरचा पत्ता, विषय, रंग, दिन, महिने इ.ची नावे समानार्थी, विरूध्दार्थी शब्द, पर्यावरण, घर, बसस्थानक, बगीचा, धार्मिक स्थल इ.चे लेखन. | ६) चित्रांचे वर्णन करणे व लिहिणे |
| | ७) पाठ्यपुस्तकातील कवितांचे लेखन | ७) पाठ्यांशावर आधारीत प्रश्नांची उत्तरे, म्हणी, वाक्प्रचार, इ. चे अर्थ व वाक्ये लिहिणे | ७) मित्र, नातेवाईकांना पत्रलेखन |
| | ८) दैनंदिनी लेखन | ८) निबंध लेखन, मुद्द्यांवर आधारीत निंबंध लेखन | ८) विविध विषयांच्या संदर्भात घोषवाक्ये लिहिणे |
| | ९) फलकावर दिलेल्या मुद्द्याचे आधारे सलग लेखन | | ९) दिलेल्या विषयावर स्वतंत्रपणे लेखन करणे इ. |
| | १०) नातेवाईक/मित्रांना पत्रलेखन | | |
| | ११) अनुपस्थिती संबंधी अर्जाचे लेखन | | |

विश्लेषण व अर्थनिर्वचन :

वरील सारणी क्र.४.४ नुसार सन २००६ च्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या अभ्यासक्रमातील उपक्रम हे विविध भाषिक कौशल्यांनुसार वेगवेगळे आहेत. हा अभ्यासक्रम कौशल्याधिष्ठित असल्याने भाषिक कौशल्यांच्या विकासावर आधारीत उपक्रमांवर भर दिलेला आहे. मराठी, हिंदी, व इंग्रजीसाठी श्रवण, भाषण, वाचन व लेखनासाठी विविध उपक्रम या अभ्याक्रमात दिलेले आहेत. हे उपक्रम विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला वाव देणारे आहेत. तसेच या उपक्रमांमधून अध्ययन–अध्यापन प्रक्रिया आनंददायी बनविण्याचा प्रयत्न केलेला आहे.

निष्कर्ष : यावरून असे दिसून येते की,

१) सन २००६ च्या इ. ५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या अभ्यासक्रमातील उपक्रम विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला व कृतीशीलतेला वाव देणारे आहे.

२) हे उपक्रम विद्यार्थ्यांच्या स्वयंअध्ययनावर भर देणारे आहेत.

३) या अभ्यासक्रमातील उपक्रम आनंददायी व मनोरंजक आहेत.

४) हे उपक्रम विद्यार्थ्यांच्या भाषिक कौशल्यांच्या विकासावर भर देणारे आहेत.

५) बदलत्या समाजाच्या गरजांचा विचार करून स्तरानुसार उपक्रमांचा समावेश या अभ्यासक्रमात आहे.

## सारणी क्र.४.५

## सन २००६च्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या अभ्यासक्रमातील मूल्यमापन पध्दती

| अ.क्र. | विषय | प्रथम सत्र (अ) | | | | व्दितीय सत्र (अ) | | | | वर्षभरातील काम (क) घटक चाचण्या | | | | विवरण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रात्यक्षिक | तोंडी | लेखी | एकूण | प्रात्यक्षिक | तोंडी | लेखी | एकूण | संख्या | गुण | एकूण गुण | गृहपाठ | १) चाचणीसाठी वार्षिक नियोजनानुसार अभ्यासक्रम विचारात घ्यावा व चाचणीचे स्वरूप ठरवावे.<br>२) प्रत्येक विषयात पर्यावरण व मूल्यशिक्षण अंतर्भूत केले असल्यामुळे त्यासाठी वेगळे मूल्यमापन सुचविलेले नाही.<br>३) प्रकल्पासाठी विद्यार्थ्यांस मिळालेल्या गुणांच्यावरून श्रेणी द्यावी.<br>४) इ.५वीसाठी हिंदी, आणि इंग्रजी या विषयांसाठी वर्षभरातील कामामध्ये निबंध /निबंधवजा लेखन घेण्यात यावे |
| १ | मराठी | — | २० | ८० | १०० | — | २० | ८० | १०० | ४ | २० | ८० | निबंधवजा लेखन १० | |
| २ | हिंदी | — | २० | ८० | १०० | — | २० | ८० | १०० | ४ | २० | ८० | गृहपाठ १०निंबध / निबंध वजा लेखन १० | |
| ३ | इंग्रजी | — | २० | ८० | १०० | — | २० | ८० | १०० | ४ | २० | ८० | गृहपाठ १०निंबध/निबंध वजा लेखन १० | |
| ४ | प्रकल्प | प्रत्येक विद्यार्थ्याने प्रत्येक सत्रात एक प्रकल्प याप्रमाणे वर्षभरात दोन प्रकल्प पूर्ण करावेत. प्रथमसत्रातील प्रकल्प विद्यार्थ्यांनी गटामध्ये पूर्ण करावा. व्दितीय सत्रातील प्रकल्प विद्यार्थ्याने वैयक्तिरित्या पूर्ण करावा. | | | | | | | | | | | १०० गुण | |

विश्लेषण व अर्थनिर्वचन :

वरील सारणी क्र.४.५ नुसार सन २००६च्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या अभ्यासक्रमाचे निरंतर व सर्वकष मूल्यमापनावर भर दिलेला आहे. मराठी, हिंदी व इंग्रजीसाठी प्रथम व व्दितीय सत्रासाठी प्रत्येकी १०० गुण मूल्यमापनसाठी दिलेले आहेत, त्यात २० गुण हे तोंडी व ८० गुण हे लेखी परीक्षेसाठी दिलेले आहेत. या व्यतिरिक्त वर्षभरामध्ये ४ चाचण्या २० गुणांसाठी एक याप्रमाणे एकूण ८० गुणांच्या चाचण्या व प्रत्येक विषयासाठी १० निबंध लेखन गृहपाठ म्हणून दिलेले आहेत. याबरोबरच ५०–५० गुणांचे दोन प्रकल्प १) प्रथम सत्रात गटामध्ये २) व्दितीय सत्रातील प्रकल्प वैयक्तिरित्या पूर्ण करणे अपेक्षित आहे.

निष्कर्ष : यावरून असे दिसून येते की,

१) सन २००६ च्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजी या विषयांच्या मूल्यमापनासंदर्भात योग्य मार्गदर्शन आहे.

२) निरंतर व सर्वकष मूल्यमापन पध्दतीवर भर आहे.

३) विद्यार्थ्यांना वैयक्तिक व सामूहिकरित्या करता येण्यासारखे प्रकल्प आहेत. पण हे प्रकल्प कोणत्या विषयासाठी व कसे घ्यावेत याचे पूर्ण मागदर्शन केलेले नाही.

४) प्रकल्पासाठी मूल्यमापनामध्ये १०० गुणांची तरतूद योग्य आहे. पण कोणत्या विषयाच्या प्रकल्पासाठी किती गुण याचा खुलासा नाही.

## सारणी क्र. ४.६

### सन २००६च्या इ.५वीच्या अभ्यासक्रमातील श्रेणी पध्दती

| गुणांचे वर्गांतर | श्रेणी | श्रेणीचे वर्णन |
|---|---|---|
| ७५% पेक्षा जास्त | अ | उत्कृष्ट |
| ६०% ते ७४% | ब | उत्तम |
| ५०% ते ५९% | क | चांगला |
| ३५% ते ४९% | ड | साधारण |
| ०% ते ३४% | ठ | असमाधानकारक |

**विश्लेषण व अर्थनिर्वचन :**

वरील चाचणी क्र ४.६ नुसार प्रशिक्षण परिषद, नवी दिल्लीने सुचविल्याप्रमाणे मूल्यमापन पध्दतीमध्ये श्रेणी पध्दतीचा स्वीकार करण्यात यावा.

विद्यार्थ्यांमध्ये वाढलेली अनैसर्गिक स्पर्धा कमी व्हावी यासाठी श्रेणीपध्दती उपयुक्त आहे. या श्रेणीपध्दतीचा परिचय व सवय विद्यार्थ्यांना होण्यासाठी विद्यार्थ्यांची संपादणूक त्यांना मिळालेले गुण व त्यावरून निश्चित केलेली श्रेणी या दोन्ही स्वरूपात देण्यात यावी. विद्यार्थ्यांना मिळालेल्या गुणांसाठी ५ बिंदूश्रेणीचा उपयोग करण्यात यावा, गुणांचे वर्गांतर, श्रेणीचे वर्णन पुढीलप्रमाणे दिलेले आहे.

**निष्कर्ष** : यावरून असे दिसून येते की, सन २००६च्या अभ्यासक्रमामध्ये श्रेणीपध्दतीचा स्विकार केलेला आहे.

## सारणी क्र. ४.७

### सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या मराठी पाठ्यपुस्तकाचे विश्लेषण

| मुद्दे | आवरण | आकार | मुद्रण | बांधणी | किंमत | चित्रे |
|---|---|---|---|---|---|---|
| विश्लेषण | पाठ्यपुस्तकाचे मुखपृष्ठ व मलपृष्ठ दोन्ही आकर्षक आहेत इ.५वीच्या वयोगटास अनुसरून चित्रे दिलेली आहेत. | या पाठ्यपुस्तकाचा आकार फार मोठा किंवा फार छोटा नाही. तो विद्यार्थ्यांच्या वयोगटास अनुसरून दप्तरमध्ये बसण्यायोग्य आहे | पाठ्यपुस्तकातील अक्षरांचा आकार वयोगटास अनुसरून सुस्पष्ट व योग्य आहे. | पाठ्यपुस्तकासाठी वापरलेला कागद योग्य जाडीचा व शुभ्र आहे. | या पाठ्यपुस्तकाची किंमत रू.१६.०० इतकी आहे. ही किंमत अतिशय सामान्य विद्यार्थ्यांना परवडेलच अशी नाही. म्हणून या पाठ्यपुस्तकाची किंमत सर्वसामान्यांना परवडेल अशी असावी. | इ. ५वीच्या मराठी बालभारती या पाठ्यपुस्तकातील चित्रांची संख्या वयोटानुसार योग्य आहे. ही चित्रे आकर्षक, सुस्पष्ट व विषयास अनुसरून आहेत. आशय, संबोध, कल्पना स्पष्ट होण्याच्यादृष्टीने ही चित्रे खुप उपयुक्त आहेत. |

## विश्लेषण व अर्थनिर्वचन :

वरील सारणी क्र.४.७ नुसार सन २००६च्या इ.५वीचे मराठी बालभारती हे पाठ्यपुस्तक आवरण, आकार, मुद्रण, चित्रे, या दृष्टीने वयोगटानुसार उपयुक्त आहे. मात्र बांधणी व किंमतीच्या दृष्टीने बदल करणे अपेक्षित आहे.

## निष्कर्ष :

१) इ.५वीच्या मराठी बालभारती या पाठ्यपुस्तकाचे आवरण आकर्षक व वयोगटास अनुसरून आहे.

२) इ.५वीच्या मराठी बालभारती या पाठ्यपुस्तकाचा आकार हाताळण्यास योग्य आहे.

३) इ.५वीच्या मराठी बालभारती या पाठ्यपुस्तकातील मुद्रण वयोगटास योग्य आहे.

४) इ.५वीच्या मराठी बालभारती या पाठ्यपुस्तकासाठी वापरलेला कागद योग्य जाडीचा व शुभ्र आहे.

५) इ.५वीच्या मराठी बालभारती या पाठ्यपुस्तकाची किंमत सर्वसामान्य विद्यार्थ्यांना परवडणारे नाही.

६) इ.५वीच्या मराठी बालभारती या पाठ्यपुस्तकाची बांधणी मजबूत असावी.

७) इ.५वीच्या मराठी बालभारती या पाठ्यपुस्तकातील चित्रे आकर्षक, सुस्पष्ट, विषयाशी सुसंगत आहेत.

## सारणी क्र. ४.८

### सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या मराठी बालभारती या पाठ्यपुस्तकाचे साहित्यप्रकारानुसार विश्लेषण

साहित्यप्रकार

| गद्यपाठ | पद्यपाठ | व्याकरण | लेखन |
|---|---|---|---|
| १) निंबध | १) कविता | १) नाम | १) पक्षी निरीक्षण पुस्तिकेचे |
| i) नाट्यछटा (लघुनिबंध)काखेत कळसा नि गावाला वळसा | १. राष्ट्रभक्तीपर | २) लिंग | लेखन |
| ii) ग्रंथप्रेम | i) माय मराठी | ३) वचन | २) चित्रांचे निरीक्षण करून |
| iii) पक्की मैत्री | ii) नव्या युगाची गाणी | ४) सर्वनाम | कहानी लेखन |
| iv) लोकनृत्ये | २) निसर्गकविता | ५) विशेषण | ३) चित्रांचे निरीक्षण करून |
| २) आत्मचरित्र | i) वाट | ६) क्रियापद | निबंध लेखन |
| i) शाळेतलेदिवस | ii) पीक खुशीत डोलतया | ७) काळ | ४) पत्रलेखन, अर्जलेखन |
| ३) व्यक्ति चरित्रात्मक | iii) सुंदर सकाळ | ८) क्रियाविशेषण | ५) दिलेल्या परिच्छेदाचे |
| i) जगदिशचंद्र बोस | iv) ऋतू | ९) अव्यये | अनुलेखन, श्रुतलेखन |
| ii) 'बा' कस्तुरबा | ३) चरित्रात्मक | | |
| iii) संत बसवेश्वर आणि चोर | i) नंदीबैल | | |
| ४) कथा | ii) बाप | | |
| i) शाळेतले दिवस बोधकथा/वैचारिक | ४) संत काव्य | | |
| ii) अक्रोडचे झाड–बोधकथा | i) विचारधन | | |
| iii) संत बसवेश्वर आणि चोर –बोधकथा | | | |
| iv) फुले आणि दगड | | | |

निरीक्षण :

वरील सारणी क्र. ४.८ नुसार इ.५वीच्या मराठी पाठ्यपुस्तकात विविध साहित्य प्रकारांचा समावेश केलेला आहे. यामध्ये गद्य, पद्य, व्याकरण, लेखन इ. चा समावेश केलेला आहे.

अर्थनिर्वचन :

वरील सारणी क्र. ४.८ मध्ये इ.५वीच्या मराठीच्या पाठ्यपुस्तकातील एकणू गद्यपाठांपैकी ३३% पाठ हे निबंधावर आहेत. ८% पाठ हे आत्मचरित्रावर, २५% पाठ हे व्यक्ति चरित्रात्मक तर ३३% पाठ हे कथेवर आधारित आहेत. पद्यपाठांपैकी २२% पद्यपाठ राष्ट्रभक्तीपर, ४४% पद्यपाठ निसर्गकवितेवर, २२% पद्यपाठ चरित्रात्मक तर ४% पद्यपाठ हे संतकाव्यावर आधारित आहेत. एकूण व्याकरण व लेखनपैकी ६४% भाग व्याकरणाचा तर ३६% भाग हा लेखनावर आधारित आहे.

निष्कर्ष :

यावरून असे दिसून येते की, सन २००६ च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या मराठीच्या पुस्तकात साहित्यप्रकारानुसार विविधता आढळते.

## सारणी क्र.४.९

## इयत्ता ५वीच्या 'मराठी बालभारती' या पाठ्यपुस्तकाचे आशयानुसार विश्लेषण

| अ.क्र. | घटकाचे नाव | आशय |
|---|---|---|
| १ | माय मराठी (पद्य) | वर्णनात्मक, देशभक्तीपर |
| २ | नव्या युगाची गाणी (पद्य) | मानवतावादी, एकात्मता |
| ३ | नाट्यछटा | मनोरंजनात्मक, बोधात्मक |
| ४ | वाट (पद्य) | निसर्गपर, निसर्गसौंदर्य |
| ५ | शाळेतले दिवस | मानवतावादी, सामाजिक |
| ६ | नंदीबैल (पद्य) | वर्णनात्मक, सांस्कृतिक |
| ७ | फुले आणि दगड | बोधात्मक, |
| ८ | जगदीशचंद्र बोस | पर्यावरणात्मक, वैज्ञानिक |
| ९ | पीक खुशीत डोलतया (पद्य) | निसर्गपर, नैसर्गिक |
| १० | पक्की मैत्री | आधुनिक, माहिती तंत्रज्ञानात्मक |
| ११ | 'बा' कस्तुरबा | राष्ट्रभक्ती, सामाजिक |
| १२ | सुंदर सकाळ (पद्य) | नैसर्गिक, निसर्गसौंदर्य |
| १३ | अक्रोडचे झाड | सामाजिक, पर्यावरणात्मक, बोधात्मक |
| १४ | ग्रंथप्रेम | बोधात्मक, वर्णनात्मक |
| १५ | बाप | वर्णनात्मक, सामाजिक (शेती) |
| १६ | लोकनृत्ये | सांस्कृतिक, सामाजिक |
| १७ | संत बसवेश्वर आणि चोर | बोधात्मक, मानवतावादी, सामाजिक |
| १८ | ऋतू (पद्य) | निसर्गवर्णन |
| १९ | विचारधन (पद्य) | बोधात्मक, पर्यावरणात्मक |



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

निरीक्षण :

वरील सारणी क्र.४.९ च्या निरीक्षणानुसार इ.५वीच्या मराठी बालभारती या पाठ्यपुस्तकात देशभक्तीपर, मानवतावादी, बोधपर, मनोरंजनात्मक, निसर्गसौंदर्य, सांस्कृतिक, पर्यावरणात्मक, माहितीतंत्रज्ञान, सामाजिक, वर्णनात्मक, वैज्ञानिक अशा विविध आशयांचे पाठ समाविष्ठ आहेत. एकापेक्षा जास्त आशयाचे पाठ देखील या पाठ्यपुस्तकात आहेत.

अर्थनिर्वचन :

वरील सारणी क्र.४.९नुसार २१% पाठ हे निसर्गसौंदर्य वर्णनानुसार आधारीत आहेत. १५% पाठातून मानवतावादी आशय व्यक्त होतो. १०% पाठ हे राष्ट्रभक्तीपर, १०% पाठ सांस्कृतिक, २१% पाठ हे सामाजिक, १५% पाठ मानवतावादी, १५% पाठ पर्यावरणावर आधारीत आहेत. तर १५% पाठ वर्णनात्मक व तर ३१% पाठ हे बोधात्मक आशयाचे आहेत.

निष्कर्ष :

यावरून असे दिसून येते की इ.५वीच्या मराठी बालभारती पाठ्यपुस्तकामध्ये आशनुसार विविधता आढळते.

## सारणी क्र. ४.१०

## इ.५वीच्या मराठी बालभारती या पाठ्यपुस्तकाचे व्याकरणघटकानुसार विश्लेषण

| अ.क्र. | घटकाचे नाव | समाविष्ट व्याकरण घटक |
|---|---|---|
| १ | माय मराठी | — |
| २ | नव्या युगाची गाणी | — |
| ३ | नाट्यछटा | — |
| ४ | वाट | — |
| ५ | शाळेतले दिवस | नाम |
| ६ | नंदीबैल | — |
| ७ | फुले आणि दगड | लिंग |
| ८ | जगदीशचंद्र बोस | वचन |
| ९ | पीक खुशीत डोलतंया | — |
| १० | पक्की मैत्री | सर्वनाम |
| ११ | बा कस्तुरबा | विशेषण |
| १२ | सुंदर सकाळ | — |
| १३ | अक्रोडचे झाड | क्रियापद |
| १४ | ग्रंथ प्रेम | काळ |
| १५ | बाप | — |
| १६ | लोकनृत्ये | क्रियाविशेषण |
| १७ | संत बसवेश्वर आणि चोर | अव्यये—शब्दयोगी, उभयान्वयी, केवलप्रयोगी |
| १८ | ऋतू | — |
| १९ | विचारधन | — |

निरीक्षण :

वरील सारणीवरून असे दिसून येते की, इ.५वीच्या मराठी बालभारती या पाठ्यपुस्तकातील एकूण १९ पाठांपैकी ९ गद्यपाठाखाली व्याकरण घटकांचा समावेश केलेला आहे. २००६च्या अभ्यासक्रमानुसार नमूद केल्याप्रमाणे नाम, लिंग, वचन, सर्वनाम, विशेषण, क्रियापद, काळ, क्रियाविशेषण, अव्यये–शब्दयोगी, उभयान्वयी, केवलप्रयोगी, इ. व्याकरण घटक समाविष्ट आहेत. हे व्याकरण देताना पाठ्यपुस्तकातील उदाहरणांचा वापर केलेला आहे. तसेच दैनंदिन जीवनात घडणाऱ्या घटना प्रसंगातील उदाहरणांचाही उपयोग केलेला आहे.

अर्थनिर्वचन :

वरील सारणी क्र.४.१० नुसार इ.५वीच्या मराठी बालभारती या पाठ्यपुस्तकामध्ये ४३% पाठांमध्ये व्याकरण घटकांचा समावेश केलेला आहे. तर ५७% पाठांमध्ये व्याकरण घटकांचा समावेश केलेला नाही.

## सारणी क्र. ४.१९

## इ.५वीच्या मराठी बालभारती या पाठ्यपुस्तकाचे गाभाघटकानुसार विश्लेषण

| अ.क्र. | घटकाचे नाव | समाविष्ट व्याकरण घटक |
|---|---|---|
| १ | माय मराठी | १) राष्ट्रीय अस्मिता जोपासण्यास आवश्यक आशय<br>२) भारताचा सामाईक व सांस्कृतिक वारसा |
| २ | नव्या युगाची गाणी | १) समानतावाद |
| ३ | नाट्यछटा | — |
| ४ | वाट | पर्यावरणाचे सरंक्षण |
| ५ | शाळेतले दिवस | १) समानता वाद<br>२) सामाजिक अडसरांचे निर्मूलन |
| ६ | नंदीबैल | १) भारताचा सामाईक सांस्कृतिक वारसा |
| ७ | फुले आणि दगड | १) सामाजिक अडसरांचे निर्मूलन |
| ८ | जगदीशचंद्र बोस | १) पर्यावरणाचे संरक्षण<br>२) वै.दृष्टीकोनाचा परिपोष |
| ९ | पीक खुशीत डोलतंया | १) भारताचा सामाईक सांस्कृतिक वारसा |
| १० | पक्की मैत्री | वै.दृष्टिकोनाचा परिपोष |
| ११ | बा कस्तुरबा | १) भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास<br>२) राष्ट्रीय अस्मिता जोपासण्यास आवश्यक आशय |
| १२ | सुंदर सकाळ | १) पर्यावरण संरक्षण |
| १३ | अक्रोडाचे झाड | १) पर्यावरणाचे सरंक्षण |

| | | |
|---|---|---|
| १४ | ग्रंथ प्रेम | १) भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास<br>२) सामाजिक अडसरांचे निर्मूलन |
| १५ | बाप | १) भारताचा सामाईक सांस्कृतिक वारसा<br>२) समानतावाद |
| १६ | लोकनृत्ये | भारताचा सामाईक सांस्कृतिक वारसा |
| १७ | संत बसवेश्वर आणि चोर | १) भारताचा सामाईक सांस्कृतिक वारसा<br>२) सामाजिक अडसरांचे निर्मूलन |
| १८ | ॠतू | पर्यावरण संरक्षण |
| १९ | विचारधन | १) राष्ट्रीय अस्मिता जोपसण्यास आवश्यक आशय<br>२) पर्यावरण संरक्षण<br>३) सामाजिक अडसरांचे निर्मूलन |

निरीक्षण :

वरील सारणी क्र.४.११ वरून असे दिसून येते की, इ.५वीच्या मराठी बालभारती या पाठ्यपुस्तकात विविध गाभाघटकांवर आधारीत घटकांचा समावेश केलेला आहे. काही घटकांमधून एकापेक्षा जास्त गाभाघटक विकसित करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

अर्थनिर्वचन :

यावरून असे दिसून येते की ३२% पाठांमधून 'भारताचा सामाईक सांस्कृतिक वारसा' हे गाभाघटक साध्य होते. ३२% पाठांमधून 'पर्यावरण संरक्षण' हे गाभाघटक साध्य होते. २६% पाठांमध्ये 'सामाजिक अडसरांचे निर्मूलन' या गाभाघटकाची पूर्तता होते. १६% पाठांमध्ये राष्ट्रीय अस्मिता

जोपासण्यास आवश्यक आशयाचा समावेश केलेला आहे. १०% पाठांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोनाचा परिपोष या गाभाघटकाचा समावेश केलेला आहे. १६% पाठांमध्ये समानतावाद या गाभाघटकाचा समावेश केलेला आहे.

निष्कर्ष :

यावरून असे दिसून येते की, इ.५वीच्या मराठी बालभारती या पाठ्यपुस्तकामध्ये विविध गाभाघटकांवर आधारित पाठांचा समावेश केलेला आहे.

सारणी क्र.४.१२

दैनंदिन जीवनाशी निगडीत उदाहरणानुसार इ.५वीच्या मराठी बालभारती पाठ्यपुस्तकाचे विश्लेषण

| घटक क्र. | पृष्ठ क्र. | दैनंदिन जीवनाशी निगडीत उदाहरणे/आशय |
|---|---|---|
| १ | ३ | १) रोजच्या जीवनातील ध्वनिप्रदूषणास कारणीभूत ठरणाऱ्या विविध वस्तूंचा वापर कसा करावा यासंबंधी मार्गदर्शनपर सूचना |
| ३ | ६ | १) रस्त्यावरून चालत असताना अपघात प्रसंगी कसे वागावे, याचे मार्गदर्शन |
| | ७ | २) आपल्या वस्तू कशा ठेवाव्यात याचे मार्गदर्शन |
| | ८ | ३) |
| ४ | ९ | १) दैनंदिन जीवनाशी निगडीत रस्त्यांच्या विविध प्रकारांची माहिती 'वाट' या कवितेमध्ये दिलेली आहे. |
| ५ | १४ | १) विद्यार्थ्यांच्या शालेय जीवनातील एका प्रसंगाचे वर्णन करणारी व बोधपूर्ण कथा दिलेली आहे. |
| ६ | २५ | १) नंदीबैल या कवितेमध्ये नंदीबैलाचे वास्तव चित्रण केलेले आहे. |

| | | |
|---|---|---|
| ७ | २९ | १) फुले आणि दगड यांच्या उदाहरणावरून इतरांशी कसे वागावे याचा बोध होतो. |
| ९ | ४६ | १) पीक खुशीत डोलतया या कवितेत शेतकऱ्यांच्या जीवनातील आनंदाचे वर्णन केलेले आहे. |
| १० | ५० | १) 'पक्की मैत्री' या पाठात आधुनिक जीवनातील प्रगत माहि तंत्रज्ञानाची माहिती आहे. |
| १२ | ७१ | सूर्योदयापूर्वी निसर्गामध्ये होणाऱ्या बदलाचे मनोहारी वर्णन |
| १३ | ७५ | 'अक्रोडाचे झाड' या पाठात झाडांचे दैनंदिन जीवनातील महत स्पष्ट होते. |
| १४ | ८४ | १) 'ग्रंथप्रेम' या पाठात ग्रंथाचे, पुस्तकांचे महत्व स्पष्ट केले आहे. |
| | ८९ | २) 'भारतरत्न' या पुस्तकाची माहिती दिलेली आहे. |
| १५ | ९४ | १) शेतकऱ्यांच्या कष्टमय जीवनाचे वर्णन |
| १६ | ९८ | १) विविध प्रांतातील लोकनृत्ये, वेशभूषा, वाद्यांचे प्रकार आदींची माहिती ही दैनंदिन जीवनाशी निगडीत आहे. |
| १७ | १०९ | २) आपल्यापेक्षा गरीबांशी कसे वागावे, आपल्या गरजा कमी करून इतरांच्या गरजा भागविण्यास मदत करणे इ. विचार दैनंदिन जीवनात उपयोगी पडतात. |
| १८ | ११८ | वास्तव जीवनामध्ये निसर्गातील बदलांमूळे मानवी जीवनावर, पशुपक्ष्यांवर होणारे परिणामांचे वर्णन ऋतू या कवितेत आहे. |
| १९ | १२३ | मानवाच्या रोजच्या जीवनात पर्यावरणाला विशेष महत्वाचे स्थान आहे. झाडे व पर्यावरण रक्षण संदर्भात महाराष्ट्रातील संतांचे विचार 'विचारधन' मध्ये आहेत. |

निरीक्षण :

वरील सारणी क्र.४.१२ नुसार इ.५वीच्या मराठी बालभारती या पाठ्यपुस्तकात ध्वनीप्रदूषण, नीटनेटकेपणा, रस्त्यावरून चालतानाचे नियम, वनस्पतीचे महत्व, पुस्तकांचे, ग्रंथाचे महत्व, पर्यावरणाचे महत्व, भारतरत्न पुरस्कार, लोकनृत्ये, वेशभूषा, वाद्यांचे प्रकार इ. दैनंदिन जीवनाशी निगडीत उदाहरणांचा समावेश केलेला आहे.

अर्थनिर्वचन :

वरील सारणी क्र.४.१२ नुसार इ.५वीच्या मराठी बालभारती पाठ्यपुस्तकातील १००: पाठांमध्ये दैनंदिन जीवनाशी निगडीत उदाहरणांचा समावेश केलेला आहे.

निष्कर्ष :

यावरून असे दिसून येते की, इ.५वीच्या 'मराठी बालभारती' या पाठ्यपुस्तकात दैनंदिन जीवनाशी निगडीत उदाहरणांचा समावेश केलेला आहे.

## सारणी क्र.४.१३

## इ.५वीच्या मराठी बालभारती या पाठ्यपुस्तकाचे मूल्यांनुसार विश्लेषण

| अ.क्र. | घटक/उपघटक | विकसित होणारी मूल्ये |
|---|---|---|
| १ | माय मराठी | राष्ट्रभक्ती, मराठीचा महिमा |
| २ | नव्या युगाची गाणी | समानता, एकात्मता, मानवता |
| ३ | नाट्यछटा | नीटनीटकेपणा |
| ४ | वाट | निसर्गसौंदर्य, पर्यावरण संरक्षण |
| ५ | शाळेतले दिवस | खेड्यांचे महत्व, समानता, मानवता |
| ६ | नंदीबैल | ग्रामीण लोकसंस्कृतीचे दर्शन, परंपरा, संस्कृतीचे महत्व, पशुप्रेम |
| ७ | फुले आणि दगड | दुसऱ्यांविषयी प्रेमाची, आदरांची भावना, समानता, सौजन्यशीलता |
| ८ | जगदीशचंद्र बोस | पर्यावरणाचे संरक्षण, वनस्पतीचे महत्व |
| ९ | पीक खुशीत डोलतंया | श्रमप्रतिष्ठा, शेतकऱ्यांचा आनंद |
| १० | पक्की मैत्री | प्रगत तंत्रज्ञानाचे महत्व |
| ११ | बा कस्तुरबा | त्यागाची भावना, देशप्रेम, श्रमप्रतिष्ठा |
| १२ | सुंदर सकाळ | निसर्गप्रेम |
| १३ | अक्रोडचे झाड | झाडांचे /वृक्षांचे महत्व श्रमप्रतिष्ठा, सामूहिक हित |
| १४ | ग्रंथ प्रेम | परिश्रम, जिद्द, ग्रंथप्रेम |
| १५ | बाप | श्रमप्रतिष्ठा, शेतकऱ्यांबद्दल प्रेम |
| १६ | लोकनृत्ये | सांस्कृतिक परंपरेचे सवंर्धन |
| १७ | संत बसवेश्वर आणि चोर | श्रमप्रतिष्ठा, गरीबांना मदत करणे |
| १८ | ॠतू | निसर्गप्रेम, निसर्गसौंदर्य |
| १९ | विचारधन | वृक्षांचेमहत्व, पर्यावरण संरक्षण |

## निरीक्षण :

वरील सारणी क्र. ४.१३ नुसार इ.५वीच्या मराठी बालभारती या पाठ्यपुस्तकात दिलेल्या पाठांमधून विविध मूल्यांचा विकास होण्याच्या दृष्टीने प्रयत्न केलेले आहेत. या पाठांमधून राष्ट्रभक्ती, समानता, मानवता, पर्यावरण संरक्षण, सौजन्यशीलता, ग्रंथप्रेम श्रमप्रतिष्ठा, वै.दृष्टीकोन, सौजन्यशीलता इ. मूल्ये रूजविण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## अर्थनिर्वचन :

वरील क्र.३.१३ नुसार इ.५वीच्या मराठी बालभारती या पाठ्यपुस्तकात १५% पाठांमध्ये पर्यावरण संरक्षण, ३१% पाठांमध्ये श्रमप्रतिष्ठा, १५% पाठांमध्ये समानता १५% पाठांमध्ये निसर्गप्रेम १०% पाठांमध्ये भारतीय संस्कृतीचे महत्व १०% पाठांमध्ये देशप्रेम/राष्ट्रभक्ती ५% पाठामध्ये नीटनेटकेपणा ही मूल्ये दिसून येतात.

## निष्कर्ष :

यावरून असे दिसून येते की, इ.५वीच्या मराठी बालभारती या पाठ्यपुस्तकात विविध मूल्यांवर आधारीत आशयाचा समावेश केलेला आहे.

## सारणी क्र.४.१४

## इ.५वीच्या मराठी बालभारती या पाठ्यपुस्तकाचे भाषिक कौशल्यांनुसार विश्लेषण

| अ.क्र. | घटकाचे नाव | विकसित होणारी भाषिक कौशल्ये | आशय | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १ | माय मराठी | १) श्रवण<br>२) वाचन | पद्य (वर्णनात्मक)<br>पर्यावरण/ध्वनीप्रदूषण | दिलेल्या मजकूराचे समजपूर्वक वाचन |
| २ | नव्या युगाची गाणी | १) श्रवण | पद्य—संदेशातमक, बोधात्मक | दिलेले गाणे चालीवर ऐकविणे |
| | | २) भाषण — संभाषण | अपघास्तग्रस्त घटना | दिलेल्या घटनेवर भाषण—संभाषण |
| ३ | नाट्यछटा | १)श्रवण— वाचन | म्हणी व वाकृप्रचार यांनी युक्त नाट्यछटा (मनोरंजनात्मक) | दिलेली नाट्यछटा ऐकविणे व मुलां कडून वाचून घेणे |
| | | २)लेखन | पर्यावरणात्मक (बगळ्याचे महत्व) | 'पक्षी निरीक्षण पुस्तिकेचे' लेखन |
| ४ | वाट | १) प्रकटवाचन | बालसाहित्य जत्रा | दिलेल्या मजकूराचे प्रकटवाचन व इतर छापील हस्त लिखित मजकूराचे प्रकटवाचन |
| ५ | शाळेतले दिवस | | | |
| ६ | नंदीबैल | लेखन—वाचन | पर्यावरणात्मक | दिलेल्या चित्रांच्या निरीक्षणावरून, क्रम बदलून गोष्ट तयार करणे व वाचन करणे |

| अ.क्र. | घटकाचे नाव | विकसित होणारी भाषिक कौशल्ये | आशय | माध्यम |
|---|---|---|---|---|
| ७ | फुले आणि दगड | स्वयंलेखन | पर्यावरण (वृक्षदिंडी) | दिलेल्या चित्रांचे निरीक्षण करून निंबधलेखन |
| ८ | जगदीशचंद्रबोस | — | — | — |
| ९ | पीकखुशीत डोलतया | लेखन | शुभेच्छापत्र | दिलेल्या पत्राचे वाचनकरून पत्रलेखन, अर्जलेखन कसे करावे, याचे मार्गदर्शन करणे |
| १० | पक्की मैत्री | लेखन स्वत:हून | चित्रात्मक (ए.पी.जे. अब्दुलकलाम) | दिलेल्या चित्रातील व्यक्ती ओळखून त्यांच्या संदर्भातील माहितीचे निंबधलेखन करणे |
| ११ | बा कस्तुरबा | — | — | — |
| १२ | सुंदर सकाळ | लेखन:अनुलेखन, श्रुतलेखन | पं.ज.नेहरू यांच्यावर आधारित उतारा | दिलेल्या परिच्छेदाचे अनुलेखन,श्रुतलेखन |
| १३ | अक्रोडाचे झाड | वाचन(समजपूर्वक) | पुस्तकाचे आत्मवृत्त | समजपूर्वक वाचन |
| १४ | ग्रंथप्रेम | — | — | — |
| १५ | बाप | लेखन (स्वत:हून) | विविध वाद्यांची चित्रे | दिलेल्या चित्रांचे निरीक्षण करून प्रत्येक वाद्याबद्दल ५/६ वाक्ये लहिणे. |
| १६ | लोकनृत्ये | वाचन—मूकवाचन (समजपूर्वक) | रेल्वे स्थानकावरील दृश्याचे वर्णन | दिलेल्या मजकुराचे मूकवाचन करणे व तो मजकूर समजला आहे किंवा नाही या साठी मजकूरावर आधारीत प्रश्न विचारणे |

| अ.क्र. | घटकाचे नाव | विकसित होणारी भाषिक कौशल्ये | आशय | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १७. | संत बसवेश्वर आणि चोर | — | — | — |
| १८ | .ऋतू | — | — | — |
| १९ | विचारधन | — | — | — |

**निरीक्षण :** वरील सारणी क्र. ४.१४ नुसार असे दिसून येते की उपक्रमांच्या विभागणीवरून असे दिसून येते की, श्रवण कौशल्यासाठी २ उपक्रम, वाचन कौशल्यासाठी ४ उपक्रम, लेखन कौशल्यासाठी, ६ उपक्रम, भाषण—संभाषण कौशल्यासाठी, १ उपक्रम, श्रवण—वाचनासाठी १ व लेखन—वाचनासाठी १ असे एकूण १५ उपक्रम आहेत. वरील कौशल्यांची विभागणी ही समान नाही. भाषण, संभाषण कौशल्यासाठी एकच उपक्रम दिलेला आहे. तसेच श्रवणासाठी २ ते ३ उपक्रम दिलेले आहेत. २००६ च्या अभ्यासक्रमानुसार 'विद्यार्थ्यांच्या भाषिक कौशल्यांचा विकास करणे हे भाषेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. म्हणून पाठ्यपुस्तकामध्ये या कौशल्यावर आधारीत अधिकाधिक उपक्रमांचा समावेश करणे आवश्यक आहे.

**अर्थनिर्वचन :** वरील सारणी क्र.४.१४ नुसार इ.५वीच्या मराठी बालभारती या पाठ्यपुस्तकातील एकूण उपक्रमांपैकी २०% उपक्रम हे श्रवण कौशल्यावर आधारित आहेत. ७% उपक्रम हे भाषण संभाषण कौशल्यावर आधारित आहेत. ४०% उपक्रम हे वाचन कौशल्यावर आधारित आहेत तर ४७% उपक्रम हे लेखन कौशल्यावर आधारीत आहेत.

**निष्कर्ष :** यावरून असे दिसून येते की सन २००६च्या अभ्यासक्रमाप्रमाणे तयार झालेल्या इ.५वीच्या मराठी बालभारती या पाठ्यपुस्तकामध्ये विद्यार्थ्यांच्या विविध भाषिक कौशल्यांच्या विकासासाठी वेगवेगळे उपक्रम दिलेले आहेत.

## सारणी क्र. ४.१५

## इ.५वीच्या मराठी बालभारती या पाठ्यपुस्तकातील स्वाध्याय व प्रकल्प

| अ. क्र. | घटक/उपघटक | स्वाध्याय | | | प्रकल्प | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | वस्तुनिष्ठ प्रश्न | लघुत्तरी प्रश्न | दीर्घोत्तरी प्रश्न | वैयक्तिक | सामूहिक |
| १ | माय मराठी | – | – | – | – | – |
| २ | नव्या युगाची गाणी | – | – | – | – | – |
| ३ | नाट्यछटा | – | – | – | – | – |
| ४ | वाट | √ | √ | | √ | √ |
| ५ | शाळेतले दिवस | √ | √ | √ | √ | √ |
| ६ | नंदीबैल | √ | √ | √ | – | – |
| ७ | फुले आणि दगड | √ | √ | – | √ | – |
| ८ | जगदीशचंद्र बोस | √ | √ | √ | √ | – |
| ९ | पीक खुशीत डोलतंया | √ | √ | √ | √ | – |
| १० | पक्की मैत्री | √ | √ | √ | – | – |
| ११ | बा कस्तुरबा | √ | √ | – | √ | – |
| १२ | सुंदर सकाळ | √ | √ | √ | √ | – |
| १३ | अक्रोडचे झाड | √ | √ | √ | √ | – |
| १४ | ग्रंथ प्रेम | √ | √ | √ | √ | – |
| १५ | बाप | √ | √ | – | √ | – |
| १६ | लोकनृत्ये | √ | √ | √ | – | √ |
| १७ | संत बसवेश्वर आणि चोर | √ | √ | √ | √ | – |
| १८ | ऋतू | √ | √ | √ | √ | – |
| १९ | विचारधन | – | – | – | – | – |

निरीक्षण :

वरील सारणी क्र. ४.१५ नुसार पाठ क्र. १ ते ३ व पाठ क्र.१९ वगळता बाकी सर्व पाठांमध्ये स्वाध्यायांतर्गत वस्तुनिष्ठ व लघुत्तरी प्रश्नांचा समावेश आहे. तसेच पाठ क्र. ५, ६, ८, ९, १०, १२, १३, १४, १६, १७, १८मध्ये स्वायायामध्ये दीर्घोत्तरी प्रश्नांचा समावेश केलेला आहे. पाठ क्र. ४, ५, ७ ते ९, ११ ते १५, १७, १८, मध्ये वैयक्तिक प्रकल्प दिलेले आहेत. तर पाठ क्र.४, ५, १६मध्ये सामूहिकरित्या करता येण्यासारखे प्रकल्प दिलेले आहेत.

अर्थनिर्वचन :

वरील सारणीनुसार ७८% पाठांमध्ये स्वाध्यायांतर्गत वस्तुनिष्ठ व लघुत्तरी प्रश्नांचा समावेश केलेला आहे, तर २२% पाठांमध्ये वस्तुनिष्ठ व लघुत्तरी प्रश्नांचा समावेश केलेला नाही. तसेच ५७% पाठांमध्ये दीर्घोत्तरी प्रश्नांचा समावेश केला आहे. तर ४३% पाठांमध्ये दीर्घोत्तरी प्रश्नांचा समावेश केलेला नाही. तसेच ६१% पाठांमध्ये वैयक्तिक स्वरूपाचे प्रकल्प तर १५% पाठांमध्ये सामूहिक स्वरूपाचे प्रकल्प दिलेले आहेत.

निष्कर्ष :

यावरून असे दिसून येते की, इ.५वीच्या मराठी बालभारती या पाठ्यपुस्तकांमध्ये पाठाखाली स्वाध्याय व प्रकल्पांचा समावेश केलेला आहे.

## सारणी क्र.१६

## अवांतर वाचनाला प्रोत्साहन देणाऱ्या सामान्यज्ञान वाढीसाठी दिलेल्या उपक्रमानुसार इ.५वीच्या मराठी बालभारती या पाठ्यपुस्तकाचे विश्लेषण

| घटक क्र.१ | पृष्ठ क्र.२ | अवांतर वाचनासाठी दिलेल्या उपक्रमांचा आशय |
|---|---|---|
| १ | ३ | १) ध्वनी प्रदूषण कमी करण्यासाठी दिलेल्या सूचनांचे वाचन |
| २ | ६ | १) अपघातप्रसंगी कशी मदत करावी यासंदर्भात परिच्छेद |
| ३ | ८ | १) विविध दुर्मिळ पक्ष्यांची माहिती मिळावी यादृष्टीने 'रात्रिंचर बगळा' या पक्ष्याची माहिती |
| ४ | १२ | १) रस्त्यावरून चालतानाचे नियम—परिच्छेद |
| | १३ | २) बालसाहित्य जत्रा याविषयी जाहिरात— प्रकटवाचनासाठी |
| ५ | — | — |
| ६ | — | — |
| ७ | — | — |
| ८ | — | — |
| ९ | ४९ | पत्रलेखन कसे करावे यासंदर्भात एक नमुना |
| १० | ५७ | रोबोची माहिती देणारा परिच्छेद |
| ११ | ६५ | म. गांधीजींच्या जीवनावरील एक घटना |
| १२ | ७४ | प.जवाहरलाल नेहरू यांचे विचार व्यक्त करणारा एक परिच्छेद |
| १३ | ८३ | पुस्तकांचे आत्मकथनाचे वर्णन करणारा एक परिच्छेद |
| १४ | ८९ | 'भारतरत्न' पुरस्काराबद्दल माहिती देणारा परिच्छेद |
| १५ | — | — |
| १६ | १०५ | १) नृत्यकलेसंदर्भात माहिती देणारे परिच्छेद |
| | १०८ | २) रेल्वेस्थानका संदर्भात माहिती देणारे परिच्छेद |
| १७ | — | — |
| १८ | १२२ | ऋतूचक्रांची माहिती देणारी आकृती |
| १९ | — | — |

निरीक्षण :

वरील सारणी क्र.४.१६ च्या निरीक्षणावरून असे दिसून येते की, इ.५वीच्या सामान्यज्ञान वाढीसाठी मराठी बालभारती या पाठ्यपुस्तकामध्ये ध्वनीप्रदूषणा संबंधीचे उपाय, दुर्मिळ पक्ष्यांची माहिती, चालण्याचे नियम, पत्रलेखन, म. गांधी व पं.जवाहरलाल नेहरू यांच्या जीवनावर आधारीत प्रसंग भारतरत्न पुरस्कार नृत्यकला, रेल्वेस्थानक, ऋतूचक्र इ. संबंधी माहिती दर्शविण्याऱ्या उपक्रमांचा समावेश केलेला आहे.

अर्थनिर्वचन :

वरील सारणीनुसार ६१% पाठांमध्ये विद्यार्थ्यांच्या सामान्यज्ञान वाढीसाठी उपक्रम दिलेले आहेत. तर ३९% पाठांमध्ये असे उपक्रम दिलेले नाहीत.

निष्कर्ष :

यावरून असे दिसून येते की, इ.५वीच्या मराठी बालभारती या पाठ्यपुस्तकामध्ये विद्यार्थ्यांच्या सामान्यज्ञानवाढीचे पुरेसे प्रयत्न झालेले आहेत.

## सारणी क्र. ४.१७

## समवाय तत्वानुसार इ.५वीच्या मराठी बालभारती या पाठ्यपुस्तकाचे विश्लेषण

| अ.क्र. | पाठाचे नाव | इतर विषयाशी समवाय |
|---|---|---|
| १ | माय मराठी | इतिहास, पर्यावरण शिक्षण, आरोग्य शिक्षण |
| २ | नव्या युगाची गाणी | संगीत |
| ३ | नाट्यछटा | पर्यावरण शिक्षण |
| ४ | वाट | भूगोल |
| ५ | शाळेतले दिवस | शारिरिक शिक्षण |
| ६ | नंदीबैल | पर्यावरण शिक्षण |
| ७ | फुले आणि दगड | भूगोल, व्याकरण, पर्यावरण शिक्षण |
| ८ | जगदीशचंद्र बोस | विज्ञान, पर्यावरण शिक्षण |
| ९ | पीक खुशीत डोलतंया | भूगोल |
| १० | पक्की मैत्री | महिती तंत्रज्ञान, व्याकरण |
| ११ | बा कस्तुरबा | इतिहास |
| १२ | सुंदर सकाळ | भूगोल, इतिहास |
| १३ | अक्रोडाचे झाड | पर्यावरण शिक्षण, इतिहास, व्याकरण |
| १४ | ग्रंथ प्रेम | इतिहास |
| १५ | बाप | भूगोल, संगीत |
| १६ | लोकनृत्ये | संगीत, नृत्यकला, भूगोल, व्याकरण |
| १७ | संत बसवेश्वर आणि चोर | इतिहास |
| १८ | ऋतू | भूगोल |
| १९ | विचारधन | इतिहास |

निरीक्षण :

वरील सारणी क्र. ४.१७ नुसार मराठी बालभारती या पाठ्यपुस्तकाचे समवाय तत्वानुसार विश्लेषण केल्यास असे दिसून येते की, पाठ क्र. १ पासून पाठ. क्र. १९ पर्यंत मराठीचा इतिहास, भूगोल, पर्यावरण, आरोग्यशिक्षण, संगीत, विज्ञान, नृत्यकला, शारीरिक शिक्षण, माहिती तंत्रज्ञान इ. विषयांशी समवाय साधलेला आहे.

तसेच या पाठ्यपुस्तकात गद्य, पद्य, व्याकरण, लेखन इ. घटकांचा समावेश केलेला आहे. म्हणजेच या ठिकाणी मराठीचा अंतर्गत समवाय साधलेला साधलेला दिसून येतो.

अर्थनिर्वचन :

इ.५वीच्या मराठी बालभारती या पाठ्यपुस्तकामध्ये २६% पाठांमध्ये इतिहास विषयाशी समवाय साधलेला आहे. ३६% पाठांमध्ये भूगोल विषयाशी समवाय साधलेला आहे. ३१% पाठांमध्ये पर्यावरण शिक्षणाशी समवाय साधलेला आहे. ५% पाठांमध्ये माहिती तंत्रज्ञान ५% पाठांमध्ये शारिरिक शिक्षण, ५% पाठांमध्ये विज्ञान तर १०% पाठांमध्ये संगीत विषयाशी समवाय साधलेला आहे.

तसेच या पाठ्यपुस्तकात गद्य, पद्य, व्याकरण, लेखन या वाङमय प्रकारांचा समावेश आहे. म्हणजेच मराठीचा विषयांतर्गत समवाय १००% आहे.

निष्कर्ष :

यावरून असे दिसून येते की, सन २००६ च्या इ. ५वीच्या मराठी च्या पाठ्यपुस्तकात समवाय तत्वाचा अवलंब केलेला आहे.

## सारणी क्र. ४.१८

**इ.५वीच्या मराठी बालभारती या पाठ्यपुस्तकाचे माहिती तंत्रज्ञान, आरोग्य शिक्षण, लोकसंख्या शिक्षण, स्वावलंबी, शिक्षण या विषयानुसार विश्लेषण**

| अ. क्र. | पाठाचे नाव | माहिती तंत्रज्ञान | आरोग्य शिक्षण | लोकसंख्या शिक्षण | स्वावलंबी शिक्षण |
|---|---|---|---|---|---|
| १ | माय मराठी | — | √ | — | √ |
| २ | नव्या युगाची गाणी | — | √ | — | √ |
| ३ | नाट्यछटा | — | — | — | √ |
| ४ | वाट | — | — | — | — |
| ५ | शाळेतले दिवस | — | — | — | √ |
| ६ | नंदीबैल | — | — | — | — |
| ७ | फुले आणि दगड | — | — | — | — |
| ८ | जगदीशचंद्र बोस | — | — | — | — |
| ९ | पीक खुशीत डोलतंया | — | — | — | √ |
| १० | पक्की मैत्री | √ | — | — | — |
| ११ | बा कस्तुरबा | — | — | — | √ |
| १२ | सुंदर सकाळ | — | — | — | √ |
| १३ | अक्रोडचे झाड | — | — | — | √ |
| १४ | ग्रंथ प्रेम | — | — | — | √ |
| १५ | बाप | — | — | — | √ |
| १६ | लोकनृत्ये | — | — | — | — |
| १७ | संत बसवेश्वर आणि चोर | — | — | — | √ |
| १८ | ऋतू | — | — | — | — |
| १९ | विचारधन | — | — | — | √ |

निरीक्षण :

वरील सारणी क्र. ४.१८ नुसार इ. ५वीच्या मराठी बालभारती या पाठ्यपुस्तकाचे माहितीतंत्रज्ञान, आरोग्य शिक्षण, लोकसंख्या शिक्षण, स्वावलंबी शिक्षण इ. नुसार विश्लेषण केल्यास असे आढळते की, फक्त पक्की मैत्री या पाठामध्ये माहिती तंत्रज्ञानावर आधारित आशय आहे. इतर कोणत्याही पाठामध्ये माहिती तंत्रज्ञानावर आधारित आशय दिसून येत नाही.

माय मराठी, नव्या युगाची गाणी या पद्यपाठांमध्ये अप्रत्यक्षरित्या आरोग्य शिक्षणाबाबत संदर्भ आलेला आहे. इतर कोणत्याही पाठामध्ये आरोग्य शिक्षणाचे प्रत्यक्ष प्रतिबिंब पडलेले नाही.

लोकसंख्या शिक्षणावर आधारित एकही पाठ या पाठ्यपुस्तकामध्ये समाविष्ठ केलेला नाही.

तसेच मायमराठी, नव्या युगाची गाणी, शाळेतले दिवस, पीक खुशीत डोलतयां, बा कस्तुरबा, सुंदरसकाळ, अक्रोडाचे झाड, ग्रंथप्रेम, बाप इ. पाठांमध्ये स्वावलंबी शिक्षणाचे विचार प्रत्यक्ष—अप्रत्यक्षरित्या प्रकट झालेले आहेत.

अर्थनिर्वचन :

एकूण पाठांपैकी ५% पाठांमध्ये माहिती तंत्रज्ञान, १०% पाठांमध्ये आरोग्यशिक्षण ५७% पाठांमध्ये स्वावलंबी शिक्षणावर आधारित आशयाचा समावेश केलेला आहे.

निष्कर्ष :

सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ. ५वीच्या मराठी बालभारती या पाठ्यपुस्तकात स्वावलंबी शिक्षणाचे पाठ समाधानकारक आहेत, माहिती तंत्रज्ञानाचा एकच पाठ आहे, आरोग्य शिक्षणाशी निगडीत पाठांची संख्याही अगदी कमी आहे, तर लोकसंख्या शिक्षणाचा विचार केलेला दिसून येत नाही.

## सारणी क्र. ४.१९

## इ. ५वीच्या मराठी बालभारती या पाठ्यपुस्तकाचे आवश्यक तेथे तळटिपा, पाठ परिचय, व इतर माहितीनुसार विश्लेषण

| अ. क्र. | पाठाचे नाव | पाठ परिचय | तळटिपा | इतर माहिती |
|---|---|---|---|---|
| १ | माय मराठी | – | – | – |
| २ | नव्या युगाची गाणी | – | – | – |
| ३ | नाट्यछटा | – | – | – |
| ४ | वाट | √ | – | √ |
| ५ | शाळेतले दिवस | √ | √ | – |
| ६ | नंदीबैल | √ | – | – |
| ७ | फुले आणि दगड | √ | – | – |
| ८ | जगदीशचंद्र बोस | √ | – | – |
| ९ | पीक खुशीत डोलतंया | √ | – | – |
| १० | पक्की मैत्री | √ | – | √ |
| ११ | बा कस्तुरबा | √ | – | √ |
| १२ | सुंदर सकाळ | √ | – | – |
| १३ | अक्रोडचे झाड | √ | – | – |
| १४ | ग्रंथ प्रेम | √ | √ | – |
| १५ | बाप | √ | – | – |
| १६ | लोकनृत्ये | √ | √ | √ |
| १७ | संत बसवेश्वर आणि चोर | √ | √ | – |
| १८ | ऋतू | √ | – | – |
| १९ | विचारधन | √ | – | – |

## निरीक्षण :

वरील सारणी क्र. ४.१९ नुसार इ.५वीच्या मराठी बालभारती या पाठ्यपुस्तकात पहिले ३ पाठ वगळता सर्व पाठांमध्ये सुरूवातीला पाठपरिचय दिलेला आहे. ४ पाठांमध्ये तळटिपा व ४ पाठांमध्ये इतर माहितीचा समावेश केलेला आहे.

## अर्थनिर्वचन :

वरील सारणी क्र. ४.१९ नुसार इ.५वीच्या मराठी बालभारती या पाठ्यपुस्तकात ८४% पाठांमध्ये पाठपरिचय, २१% पाठांमध्ये तळटिपा, २१% पाठांमध्ये इतर माहितीचा समावेश केलेला आहे.

## निष्कर्ष :

इ.५वीच्या मराठी बालभारती या पाठ्यपुस्तकात पाठपरिचय आवश्यक तेथे तळटिपा व इतर माहितीचा समावेश केलेला आहे.

## सारणी क्र. ४.२०

## इ. ५वीच्या मराठी बालभारती या पाठ्यपुस्तकातून भाषासमृध्दीसाठी झालेले प्रयत्न

| अ.क्र. | घटक/उपघटक | समाविष्ट नवीन शब्द | वाक्प्रचार | म्हणी |
|---|---|---|---|---|
| १ | माय मराठी | अवीट, छंद, मोहविणे, चोखडी, मुजरा, कोवळीक, अवनत, ओवी | — | — |
| २ | नव्या युगाची गाणी | सरगम, निर्धार, निर्मळता, उषा | पर्वा करणे | — |
| ३ | नाट्यछटा | चक्क | १) डोळ्यात तेल घालून जपणे<br>२) आकाश कोसळणे<br>३) हजेरी होणे<br>४) पाठ थोपटणे<br>५) थक्क होणे<br>६) जीव भांड्यात पडणे | 'काखेत कळसा नि गावाला वळसा' |
| ४ | वाट | थंडी, नागमोडी, सरघसणीची, पायफसणीची, लवण, पानबसणिची, भुलवणीची, हुलकावणारी, घाटमाथ्याची, क्षितिज इ. | — | — |

| अ.क्र. | घटक/उपघटक | समाविष्ट नवीन शब्द | वाक्‌प्रचार | म्हणी |
|---|---|---|---|---|
| ५ | शाळेतले दिवस | ऐपत, न्यूनगंड, दाम, अभिप्राय, हस्तलिखित, अथपासून इतिपर्यंत हबकणे, प्रत्युत्तर देणे, महात | प्रसंग बेतणे, दिवस रेटणे | — |
| ६ | नंदीबैल | झूल, भाळ, भिंग, गोणी, सूप | भूल पडणे | — |
| ७ | फुले आणि दगड | डोह, पाथरवट, कारागीर, गोंडस | — | — |
| ८ | जगदीशचंद्र बोस | काबाडकष्ट, लौकिक, लक्ष्य, आंदोलन | — | — |
| ९ | पीक खुशीत डोलतया | पाचू, सजणे, ताप, खुशीत, समदया, शिवार, न्यारी, भुई, दौलत | देहभाग हरपणे, घाम गाळणे, भुलून जाणे | — |
| १० | पक्की मैत्री | पक्की, खेडूत, सांकेतिक | — | — |
| ११ | 'बा' कस्तुरबा | सक्रिय सहभाग, आश्रम, सत्याग्रह, प्रासाद, पूज्य | देह झिजवणे, विचारपूस करणे, देखरेख करणे, पर्वा करणे, सक्रिय सहभाग घेणे | — |
| १२ | सुंदर सकाळ | केशसरडे, मंजुळ, किर्ती, भाट, मनोहर, थाट | — | — |
| १३ | अक्रोडचे झाड | खडानखडा, कृतघ्न, मोलाचे मशागत | खडान्‌खडा माहिती असणे, सढळ हाताने मदत करणे, मशागत करणे, वेष पालटून फिरणे. | — |

| अ.क्र. | घटक/उपघटक | समाविष्ट नवीन शब्द | वाक्प्रचार | म्हणी |
|---|---|---|---|---|
| १४ | ग्रंथप्रेम | धनुर्विद्या, वांझ, निष्ठा, | शब्द देणे, अंतर देणे | — |
| १५ | बाप | खोप, झाप, लेतो, पाचट, पायी, पाप, पोशिंदा, पिठामागल्या घामाची चव | — | — |
| १६ | लोकनृत्ये | फावलावेळ, ईर्षा, अचंबा वाटणे, शिडे, सोंगा | अचंबा वाटणे, साय देणे, तहानभूक हरवणे, एकजीव होणे, भीतीने थरथरणे, गयावया करणे, | — |
| १७ | संत बसवेश्वर आणि चोर | अट्टल, लोभ, आंबिल | सुतासारखे सरळ करणे, जीवावर येणे, डोळा चुकविणे, जीवदान देणे, मुक्त करणे, पोटाला चिमटा देणे, | — |
| १८ | ॠतू | लवणे, पालवी, मोहरणे, पातणे, केविलवाणा, तुडुंब, पाचोळा | तुडुंब भरणे, हुडहुडी भरणे, हवेहवेसे वाटणे | — |
| १९ | विचारधन | खांडावया, वंचतार्यु, काष्टासी, झल्लाळ | — | — |

निरीक्षण :

वरील सारणी क्र. ४.२० नुसार इ. ५वीच्या मराठी बालभारती या पाठ्यपुस्तकामध्ये विद्यार्थ्यांचे शब्दज्ञान वाढावे यासाठी नवीन शब्द, म्हणी व वाक्प्रचारांचा समावेश केलेला आहे.

अर्थनिर्वचन :

वरील सारणी क्र. ४.२० नुसा इ.५वीच्या मराठी बालभारती या पाठ्यपुस्तकामध्ये १००% नवीन शब्दांचा समावेश केलेला आहे. हे शब्द व त्यांचे अर्थ पाठाखाली दिले आहेत, ५७% पाठांमध्ये वाक्प्रचारांचा समावेश केलेला आहे, तर ५% पाठांमध्ये म्हणींचा वापर केलेला आहे.

निष्कर्ष :

यावरून असे दिसून येते की, इ. ५वीच्या मराठी बालभारती या पाठ्यपुस्तकात विद्यार्थ्यांचे शब्दज्ञान, शब्दसंग्रह वाढावा यासाठी नवीन शब्द, वाक्प्रचार व म्हणी यांचा समावेश वयोगटानुसार केलेला आहे.

## सारणी क्र ४.२१ इ.५वीच्या हिंदी 'सुलभ भारती' पाठ्यपुस्तकाचे विश्लेषण

### अ) इ.५वीच्या हिंदी 'सुलभीभारती' पाठ्यपुस्तकाचे बहिरंगाचे विश्लेषण

| मुद्दे | आवरण (मुखपृष्ठ एवं मलपृष्ठ) | बांधणी | मुद्रण | आकार | कागद | चित्रे | किंमत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| विश्लेषण | इ.५वीच्या हिंदी सुलभभारती पाठ्यपुस्तकाचे मुखपृष्ठ व मलपृष्ठ दोन्ही आकर्षक आहेत. मुखपृष्ठावर इ. ५वीच्या वयोगटाची मुले व मुली, वाचन लेखन व वाचन करीत आहेत असे दाखविले आहे. मलपृष्ठावर निसर्गचित्र दिलेले आहे यात लहान मले व मुली नैसर्गिक वातावरणात हसत—खेळत आहेत, असे दिसते. एका मुलगीच्या हातात कुत्र्याचे पिल्लू आहे, तसेच चित्रात ससा पळत आहे. पक्षी विहार करत आहेत, मुले प्रसन्न दिसत आहेत. दोन्ही पृष्ठांच्या माध्यमातून स्त्री—पुरूष समानता, निसर्ग व प्राण्यांवबद्दल प्रेम, वैज्ञानिक दृष्टीकोन इ. गाभा घटकाचे महत्व समाविष्ट केलेले आहे. | पाठ्यपुस्तकाची बांधणी साधी आहे विद्यार्थी वयोगटासअनुसरून ही बांधणी आणखी मजबूत असणे आवश्यक आहे. | पाठ्यपुस्तकातील अक्षरांचा आकार विद्यार्थी वयोगटानुसार सुस्पष्ट व व्यवस्थित आहे. | या पाठ्यपुस्तकाचा आकार फारसा मोठा किंवा फार छोटा नाही. तो विद्यार्थ्यांच्या वयोगटास अनुसरून हाताळण्यास योग्य असा आहे. | पुस्तकासाठी वापरलेला कागद चांगल्या दर्जाचा, टिकाऊ व शुभ्र आहे. | या पाठ्यपुस्तकात दिलेली चित्रे योग्य प्रमाणात आहेत. ही चित्रे आकर्षक, सुस्पष्ट व विषयास अनुसरून आहेत. आशय, संबोध, कल्पना स्पष्ट होण्याच्या दृष्टीने ही चित्रे खूप उपयुक्त आहेत. | या पाठ्यपुस्तकाची किंमत रू.१२.०० इतकी आहे. सर्वसामान्य विद्यार्थ्यांना परवडेल अशी ही किंमत आहे. |

अर्थनिर्वचन :

वरील सारणी क्र. ४.२१ नुसार इ.५वीच्या 'हिंदी सुलभभारती' या पाठ्यपुस्तकाचे आवरण, आकार, मुद्रण, कागद, किंमत, चित्रे, याबाबतीत वयोगटानुसार हे पुस्तक उपयुक्त आहे. मात्र बांधणी मजबूत हवी.

निष्कर्ष :

१) इ.५वीच्या 'हिंदी सुलभभारती' या पाठ्यपुस्तकाचे आवरण आकर्षक व वयोगटास अनुसरून आहे.

२) इ.५वीच्या 'हिंदी सुलभभारती' या पाठ्यपुस्तकाचा आकार हाताळण्यास योग्य आहे.

३) इ.५वीच्या 'हिंदी सुलभभारती' या पाठ्यपुस्तकातील मुद्रण वयोगटास योग्य आहे.

४) इ.५वीच्या 'हिंदी सुलभभारती' या पाठ्यपुस्तकासाठी वापरलेला कागद योग्य जाडीचा व शुभ्र आहे.

५) इ.५वीच्या 'हिंदी सुलभभारती' या पाठ्यपुस्तकातील चित्रे आकर्षक, सुस्पष्ट, विषयाशी सुसंगत व पुरेशा प्रमाणात आहेत.

६) इ.५वीच्या 'हिंदी सुलभभारती' या पाठ्यपुस्तकाची किंमत सर्वसामान्य विद्यार्थ्यांना परवडेल अशी आहे.

७) इ.५वीच्या 'हिंदी सुलभभारती' या पाठ्यपुस्तकाची बांधणी मजबूत असावी.

ब) इ.५वीच्या हिंदी 'सुलभ भारती' पाठ्यपुस्तकाचे अंतरंगाचे आशयानुसार विश्लेषण

सारणी क्र. ४.२२ शब्दज्ञानानुसार इ.५वीच्या हिंदी 'सुलभीभारती' पाठ्यपुस्तकाचे विश्लेषण

| पहली इकाई | दुसरी इकाई | तिसरी इकाई | चौथी इकाई |
|---|---|---|---|
| पाठ क्र.१ शब्द मेरे अपने | पाठ क्र.१ शब्द बने हमारे | पाठ क्र.१ शब्द वाटिका | पाठ क्र.१ शब्द संसार |
| पाठ क्र.२ न्यारे—न्यारे शब्द | पाठ क्र.२ बोल बोल मे अंतर | पाठ क्र.२ सोच—सोचकर बोल | |
| पाठ क्र.९ वह है कौन? | पाठ क्र.१० जुडे हम—भाग २ | पाठ क्र.९ हमारे अपने | |
| पाठ क्र.१२ हमारा मैदान | | | |
| पाठ क्र.१३ सपना | | | |

निरीक्षण :

वरील सारणी क्र. ४.२२ नुसार इ.५वीच्या हिंदी सुलभभारती या पाठ्यपुस्तकात पहिल्या चाचणीत शब्द मेरे अपने, न्यारे–न्यारे शब्द, वह है कौन? हमारा मैदान, सपना; दुसऱ्या चाचणीत शब्द बने हमारे, बोल–बोल मे अंतर, जुडे हम भाग २; तिसऱ्या चाचणीसाठी शब्दवाटिका, सोच–सोचकर बोल, हमारे अपने; चौथ्या चाचणीसाठी शब्द, संसार इ. पाठांमध्ये विविध वस्तू, व्यवसाय, प्राणी, पक्षी, खेळ, फळे ची नावे देऊन विद्यार्थ्यांचे शब्दज्ञान वाढविण्याचा प्रयत्न केलेला आहे.

अर्थनिर्वचन :

इ.५वीच्या 'हिंदी सुलभभारती' पाठ्यपुस्तकात विद्यार्थ्यांच्या शब्दज्ञान वाढीसाठी पाठांचा समावेश केलेला आहे.

निष्कर्ष :

इ.५वीच्या 'हिंदी सुलभभारती' पाठ्यपुस्तकात विद्यार्थ्यांच्या शब्दज्ञान वाढीचे भरघोस प्रयत्न झालेले आहेत.

## ४.२३ वर्णमालानुसार इ.५वीच्या 'हिंदी सुलभभारती' पाठ्यपुस्तकाचे विश्लेषण

| पहली इकाई | दूसरी इकाई | तीसरी इकाई | चौथी इकाई |
|---|---|---|---|
| पाठ क्र.८ पहचान हमारी भाग १ | पाठ क्र. ८ जुडे हमे भाग १ | — | — |
| पाठ क्र. १० पहचान हमारी भाग २ | पाठ क्र. १० जुडे हम भाग २ | | |

निरीक्षण :

वरील सारणी क्र.४.२३ नुसार इ.५वी च्या 'हिंदी सुलभभारती' या पाठ्यपुस्तकात पहिल्या चाचणीसाठी पाठ क्र.८ पहचान हमारी भाग १, पाठ क्र.१० पहचान हमारी भाग २

दूसऱ्या चाचणीसाठी पाठ क्र.८ जुडे हम भाग १, पाठ क्र.१० जुडे हम भाग २ या पाठांमध्ये 'वर्णमाला' आशयांतर्गत स्वर, व्यंजन, मात्रा, संयुक्त वर्ण यांचा परिचय करून दिलेला आहे.

अर्थनिर्वचन :

वरील सारणी क्र. ४.२३ नुसार इ.५वी च्या 'हिंदी सुलभभारती' या पाठ्यपुस्तकात ७% पाठांमध्ये वर्णमाला आशयाचा समावेश केलेला आहे.

निष्कर्ष :

यावरून असे दिसून येते की, सन २००६ च्या अभ्यासक्रमानुसार इ. ५वी च्या 'हिंदी सुलभभारती' या पाठ्यपुस्तकात स्वर, व्यंजन, मात्रा, संयुक्ताक्षर यांची माहिती/परिचय होण्यासाठी वर्णमालेचा समावेश केलेला आहे.

## सारणी क्र. ४.२४

## संख्याज्ञानानुसार इ.५वी च्या 'हिंदी सुलभभारती' या पाठ्यपुस्तकाचे विश्लेषण

| पहली इकाई | दूसरी इकाई | तीसरी इकाई | चौथी इकाई |
|---|---|---|---|
| | | पाठ क्र. ८<br>अंको का व्यवहार | पाठ क्र.७<br>गिनती |

**निरीक्षण :**

वरील सारणी क्र. ४.२४ नुसार इ.५वी च्या 'हिंदी सुलभभारती' या पाठ्यपुस्तकामध्ये दिलेल्या तिसऱ्या व चौथ्या चाचणीमध्ये अनुक्रमे पाठ क्र.८ अंकोका व्यवहार व पाठ क्र.७ गिनती यांचा समावेश केलेला आहे.

**अर्थनिर्वचन :**

वरील सारणी क्र. ४.२४ नुसार इ.५वी च्या 'हिंदी सुलभभारती' या पाठ्यपुस्तकात ४% पाठांमध्ये संख्याज्ञानावर भर देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**निष्कर्ष :**

यावरून असे दिसून येते की सन २००६ च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वी च्या 'हिंदी सुलभभारती' या पाठ्यपुस्तकात शब्द व अंकामध्ये संख्याज्ञान देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## सारणी क्र. ४.२५

## कृतीशीलतेसाठी दिलेल्या आशयानुसार इ.५वी च्या 'हिंदी सुलभभारती' या पाठ्यपुस्तकाचे विश्लेषण

| पहली इकाई | दूसरी इकाई | तीसरी इकाई | चौथी इकाई |
|---|---|---|---|
| पाठ क्र. १४<br>पुष्पगुच्छ | पाठ क्र.१४<br>किला | पाठ क्र. १४<br>रंगोली | पाठ क्र.१४<br>हलुआ |

**निरीक्षण :**

वरील सारणी क्र. ४.२५ नुसार इ.५वी च्या 'हिंदी सुलभभारती' या पाठ्यपुस्तकामध्ये दिलेल्या पहिल्या चाचणीमध्ये पाठ क्र.१४ पुष्पगुच्छ, दूसऱ्या चाचणीमध्ये पाठ क्र. १४ किला, तिसऱ्या चाचणीमध्ये पाठ क्र. १४ रंगोली, चौथ्या चाचणीमध्ये पाठ क्र. १४ हलुआ इ. पाठांमध्ये कृतीवर आधारीत आशयाचा समावेश केलेला आहे.

**अर्थनिर्वचन :**

वरील सारणी क्र. ४.२५ नुसार इ.५वी च्या 'हिंदी सुलभभारती' या पाठ्यपुस्तकामध्ये ७% पाठांमध्ये कृतीवर आधारित आशयाचा समावेश केलेला आहे.

**निष्कर्ष :**

यावरून असे दिसून येते की, इ.५वी च्या 'हिंदी सुलभभारती' या पाठ्यपुस्तकामध्ये विद्यार्थ्यांच्या कृतीशीलतेला वाव देण्यासाठी कृतीवर आधारीत आशयाचा समावेश केलेला आहे.

## सारणी क्र. ४.२६

## मनोरंजन, स्वास्थ लाभ व एकतावर आधारित आशयानुसार इ.५वी च्या 'हिंदी सुलभभारती' या पाठ्यपुस्तकाचे विश्लेषण

| पहली इकाई | दूसरी इकाई | तीसरी इकाई | चौथी इकाई |
|---|---|---|---|
| पाठ क्र. ११<br>पेटूराम | पाठ क्र.९<br>बूझो तो जाने | पाठ क्र. ७<br>क्या कम है? | पाठ क्र.१३<br>सैर |

**निरीक्षण :**

वरील सारणी क्र. ४.२५ नुसार इ.५वी च्या 'हिंदी सुलभभारती' या पाठ्यपुस्तकामध्ये दिलेल्या पहिल्या चाचणीमध्ये पाठ क्र.११ पेटूराम, दूसऱ्या चाचणीसाठी पाठ क्र. ९ बुझो तो जाने, तिसऱ्या चाचणीमध्ये पाठ क्र. ७ क्या कम है? चौथ्या चाचणीसाठी पाठ क्र.१३ सैर इ. पाठांचा समावेश केला आहे.

**अर्थनिर्वचन :**

वरील सारणी क्र. ४.२५ नुसार इ.५वी च्या 'हिंदी सुलभभारती' या पाठ्यपुस्तकामध्ये ७% पाठांमध्ये विद्यार्थ्यामध्ये मनोरंजन, स्वास्थलाभ, एकतेवर आधारित आशयाचा समावेश केलेला आहे.

**निष्कर्ष :**

यावरून असे दिसून येते की, इ.५वी च्या 'हिंदी सुलभभारती' या पाठ्यपुस्तकामध्ये विद्यार्थ्याचे मनोरंजन, स्वास्थलाभ, एकतेवर आधारित आशयाचा समावेश केलेला आहे.

## सारणी क्र. ४.२७

## दैनंदिन जीवनावर आधारित आशयानुसार इ.५वी च्या 'हिंदी सुलभभारती' या पाठ्यपुस्तकाचे विश्लेषण

| पहली इकाई | दूसरी इकाई | तीसरी इकाई | चौथी इकाई |
|---|---|---|---|
| पाठ क्र. ३<br>हवा | पाठ क्र.५<br>शहर | पाठ क्र. १३<br>दिनचर्या | पाठ क्र.४<br>मित्रता |
| पाठ क्र. ५<br>गाँव | पाठ क्र. ३<br>कद्दू और बेलफल | – | पाठ क्र. ३<br>सुखी परिवार |

**निरीक्षण :**

वरील सारणी क्र. ४.२७ नुसार इ.५वी च्या 'हिंदी सुलभभारती' या पाठ्यपुस्तकामध्ये दिलेल्या पहिल्या चाचणीमध्ये पाठ क्र.३ हवा, पाठ क्र. ८ गॉव, दूसऱ्या चाचणीसाठी पाठ क्र. ५ शहर, पाठ क्र. ६ कद्दू और बेलफल, तिसऱ्या चाचणीमध्ये पाठ क्र. १३ दिनचर्या, चौथ्या चाचणीसाठी पाठ क्र. ४ मित्रता, पाठ क्र.१० सुखी परिवार यामध्ये दैनंदिन जीवनावर आधारित आशयाचा समवेश केलेला आहे.

**अर्थनिर्वचन :**

वरील सारणी क्र. ४.२७ नुसार इ.५वी च्या 'हिंदी सुलभभारती' या पाठ्यपुस्तकामध्ये १२% पाठ हे दैनंदिन जीवनावर आधारित आहेत.

**निष्कर्ष :**

यावरून असे दिसून येते की, सन २००४ अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वी च्या 'हिंदी सुलभभारती' या पाठ्यपुस्तकामध्ये दैनंदिन जीवनाशी निगडीत आशयाचा समावेश केलेला आहे.

## सारणी क्र. ४.२८

## मनोरंजन आणि तार्किक शक्तींचा विकास होण्यासाठी आवश्यक आशयानुसार इ.५वी च्या 'हिंदी सुलभभारती' या पाठ्यपुस्तकाचे विश्लेषण

| पहली इकाई | दूसरी इकाई | तीसरी इकाई | चौथी इकाई |
|---|---|---|---|
| पाठ क्र. ११ पेटूराम | पाठ क्र.९ बूझो तो जाने | — | पाठ क्र. ९ छुटकू और बडकू |
| — | पाठ क्र. ११ हसना मना है | — | — |

**निरीक्षण :**

वरील सारणी क्र. ४.२८ नुसार इ.५वी च्या 'हिंदी सुलभभारती' या पाठ्यपुस्तकात विद्यार्थ्यांच्या मनोरंजनाबरोबरच तर्कशक्तीचा विकास व्हावा यासाठी पहिल्या चाचणीसाठी पाठ क्र. ११ पेटूराम, दूसरी चाचणीसाठी पाठ क्र. ९ बूझो तो जाने, पाठ क्र. ११ हसना मना है, चौथ्या चाचणीसाठी पाठ क्र.९ छुटकू और बडकू इ. पाठांचा समावेश केलेला आहे.

**अर्थनिर्वचन :**

वरील सारणी क्र. ४.२८ नुसार इ.५वी च्या 'हिंदी सुलभभारती' या पाठ्यपुस्तकामध्ये विद्यार्थ्यांच्या मनोरंजनाबरोबरच तर्कशक्तीचा विकास होण्यासाठी ३% पाठांचा समावेश केलेला आहे.

**निष्कर्ष :**

यावरून असे दिसून येते की, इ.५वी च्या 'हिंदी सुलभभारती' या पाठ्यपुस्तकामध्ये विद्यार्थ्यांच्या तर्कशक्तीचा विकास व्हावा यादृष्टीने प्रयत्न झालेले आहेत.

## सारणी क्र. ४.२९

## सामान्यज्ञान पर आधारित आशय के अनुसार कक्षा पॉचवी के पाठ्यपुस्तक का विश्लेषण

| पहली इकाई | दूसरी इकाई | तीसरी इकाई | चौथी इकाई |
| --- | --- | --- | --- |
| पाठ क्र. ७ उपयोग हमारा | पाठ क्र.१२ अपनी–अपनी बोली | पाठ क्र. १० देखे कितना जानते हो? | पाठ क्र. ११ संदेश |
| — | | पाठ क्र. ५ डाकघर | पाठ क्र. ५ बैंक |

**निरीक्षण :**

वरील सारणी क्र. ४.२९ नुसार इ.५वी च्या 'हिंदी सुलभभारती' या पाठ्यपुस्तकामध्ये पहिल्या चाचणीसाठी पाठ क्र. ७ उपयोग हमारा, दुसऱ्या चाचणीसाठी पाठ क्र. १२ अपनी–अपनी बोली, तिसऱ्या चाचणीसाठी पाठ क्र. १० देखे कितना जानते हो? चौथ्या चाचणीसाठी पाठ क्र. ११ संदेश इ. पाठांवर सामान्य ज्ञानावर आधारित आशयाचा समावेश केला आहे.

**अर्थनिर्वचन :**

वरील सारणी क्र. ४.२९ नुसार इ.५वी च्या 'हिंदी सुलभभारती' या पाठ्यपुस्तकामध्ये ११% पाठांमध्ये साामान्यज्ञानावर आधारित आशयाचा समावेश केलेला आहे.

**निष्कर्ष :**

यावरून असे दिसून येते की, इ.५वी च्या 'हिंदी सुलभभारती' या पाठ्यपुस्तकामध्ये विद्यार्थ्यांच्या सामान्यज्ञानावर आधारित आशयाचा समावेश केलेला आहे.

## सारणी क्र. ४.३०

## बोध सुवचनावर आधारित आशयानुसार इ.५वीच्या हिंदी पाठ्यपुस्तकाचे विश्लेषण

| पहली इकाई | दूसरी इकाई | तीसरी इकाई | चौथी इकाई |
|---|---|---|---|
| पाठ क्र. ४<br>पतंग | पाठ क्र.४<br>मधुमक्खी का छत्ता | पाठ क्र. ४<br>खुशहाली? | पाठ क्र. २<br>सुवचनो का मोल |
| पाठ क्र. ६<br>शेरू | पाठ क्र. ७<br>नही करेंगे, नही करेंगे | पाठ क्र. ६<br>प्रकाश की ओर | पाठ क्र. ४<br>मित्रता |
| | पाठ क्र. १३<br>कद्दू और बेलफल | पाठ क्र. १२<br>बिल्लियाँ और बंदर | पाठ क्र. ६<br>विज्ञान दिवस |
| | | | पाठ क्र. १०<br>सुखी परिवार |

**निरीक्षण :** वरील सारणी क्र. ४.३० नुसार इ.५वी च्या 'हिंदी सुलभभारती' या पाठ्यपुस्तकामध्ये पहिल्या चाचणीसाठी पाठ क्र. ४ पतंग, पाठ क्र. ६ शेरू, दुसऱ्या चाचणीसाठी पाठ क्र. ४ मधुमक्खी का छत्ता, पाठ क्र. ७ नही करेंगे नही करेंगे, पाठ क्र. १३ कद्दू और बेलफल, तिसऱ्या चाचणीसाठी पाठ क्र. ४ खुशहाली, पाठ क्र. ६ प्रकाश की ओर, चौथ्या चाचणीसाठी पाठ क्र. १२ बिल्लियाँ और बंदर, पाठ क्र.४ मित्रता, पाठ क्र.६ विज्ञान दिवस, पाठ क्र. १० सुखी परिवार इ. बोध/सुवचन यावर आधारित पाठांचा समावेश केलेला आहे.

**अर्थनिर्वचन :** वरील सारणी क्र. ४.३० नुसार इ.५वी च्या 'हिंदी सुलभभारती' या पाठ्यपुस्तकामध्ये २१% पाठ बोध/सुवचन इ.वर आधारित आशयाचे आहेत.

**निष्कर्ष :** यावरून असे दिसून येते की, इ.५वी च्या 'हिंदी सुलभभारती' या पाठ्यपुस्तकामध्ये बोध/सुवचन इ.वर आधारित आशयाचे पाठ समाविष्ट केलेले आहेत.

## सारणी क्र. ४.३१

## साहित्यप्रकारानुसार इ.५वीच्या 'हिंदी सुलभभारती या पाठ्यपुस्तकाचे विश्लेषण

| अ. क्र. | साहित्यिक विधा/प्रकार | त्यानुसार समाविष्ठ पाठ |
|---|---|---|
| १ | वर्ण परिचय | पहचान हमारी जुडे हम। |
| २ | शब्द–सूची | शब्द मेरे अपने, न्यारे–न्यारे शब्द, शब्द बने हमारे, बोल–बोल मे अंतर, शब्दवाटिका, सोच–सोचकर बोल, शब्द संसार, गिनती। |
| ३ | चित्रवर्णन | गाँव उपयोग हमारा, शहर, नही करेंगे, डाकघर, क्या कम है, हमारे अपने, बैंक। |
| ४ | कृतियाँ | पुष्पगुच्छ, किला, रंगोली, हलुआ। |
| ५ | चुटकुले | पेटूराम, छुटकू और बडकू। |
| ६ | समस्या पूर्ति | सुखी परिवार। |
| ७ | कहानी | पंतग, सपना, मधुमक्खीका छत्ता, हँसना मना है, कद्दू और बेलफल, खुशहाली, मित्रता। |
| ८ | कविता | हवा, वह कौन है? हमारा मैदान, बूँदे, बुझे तो जाने, अपनी अपनी बोली, सर्दी, अंको का व्यवहार, बिल्लियाँ और बंदर, नया साल, माँ बच्चे, हिंदुस्तानी। |
| ९ | संवाद | शेरू, पढाई, प्रकाश की ओर, विज्ञान दिवस। |
| १० | निंबध | स्वादिष्ट व्यंजन, सैर। |
| ११ | आत्मकथन | दिनचर्या। |
| १२ | सुवचन संग्रह | सुवचनो का मोल। |
| १३ | पत्र | संदेश। |

निरीक्षण :

वरील सारणी क्र. ४.३१ नुसार इ.५वी च्या 'हिंदी सुलभभारती' या पाठ्यपुस्तकामध्ये वर्णपरिचय, शब्दसूची, चित्रवर्णन, कृतियॉं, चुटकुले समस्यापूर्ती, कहानी, कविता, संवाद, निबंध, आत्मकथन, सुवचनसंग्रह, पत्र इ. साहित्य प्रकारानुसार पाठांचा समावेश आहे.

अर्थनिर्वचन :

वरील सारणी क्र. ४.३१ नुसार इ.५वी च्या 'हिंदी सुलभभारती' या पाठ्यपुस्तकामध्ये ४% पाठांमध्ये वर्णपरिचय तर २८% पाठांमध्ये शब्दसूचीवर आधारित आशय आहे. २८% पाठ चित्रवर्णनावर, ७% पाठ कृतीवर, ४% पाठ चुटकुले (विनोद) वर, २% पाठ समस्यापूर्तिवर, १३% पाठ आत्मकथनावर, ४% पाठ सुवचन संग्रहाचे तर ४% पाठ हे पत्रावर आधारित आहेत.

निष्कर्ष :

यावरून असे दिसून येते की, इ.५वी च्या 'हिंदी सुलभभारती' या पाठ्यपुस्तकामध्ये साहित्यप्रकार व रूची यानुसार विविधता आढळते.

## सारणी क्र. ४.३२

## शब्दासंग्रहानुसार इ.५वी च्या 'हिंदी सुलभभारती' या पाठ्यपुस्तकाचे विश्लेषण

| पहली इकाई | दूसरी इकाई | तीसरी इकाई | चौथी इकाई |
|---|---|---|---|
| पाठ क्र. १<br>शब्द मेरे | पाठ क्र.१<br>शब्द बने हमारे | पाठ क्र. १ शब्द<br>वाटिका | पाठ क्र. १०<br>शब्दसंसार |
| पाठ क्र. २<br>न्यारे—न्यारे शब्द | पाठ क्र. २<br>बोल—बोल मे अंतर | पाठ क्र. २<br>सोच —सोचकर बोल | पाठ क्र. १<br>गिनती |

**निरीक्षण :**

वरील सारणी क्र. ४.३२ नुसार इ.५वी च्या 'हिंदी सुलभभारती' या पाठ्यपुस्तकात पहिल्या चाचणीसाठी शब्द बने हमारे, न्यारे—न्यारे बोल, दुसऱ्या चाचणीसाठी शब्द बने हमारे, बोल—बोल मे अंतर, तिसऱ्या चाचणीसाठी शब्दवाटिका, सोचसंसार गिनती इ. पाठ हे शब्दसंग्रह वाढविण्यासाठी समाविष्ट केलेले आहेत.

**अर्थनिर्वचन :**

वरील सारणी क्र. ४.३३ नुसार इ.५वी च्या 'हिंदी सुलभभारती' या पाठ्यपुस्तकामध्ये १४% पाठ हे शब्दसंग्रहावर आधारित स्वतंत्र पाठ आहेत.

**निष्कर्ष :**

यावरून असे दिसून येते की, इ.५वी च्या 'हिंदी सुलभभारती' या पाठ्यपुस्तकामध्ये शब्दसंग्रह वाढविण्यासाठी स्वतंत्र पाठांची योजना केलेली आहे.

## सारणी क्र. ४.३३

## भाषाकौशल्यानुसार इ.५वी च्या 'हिंदी सुलभभारती' या पाठ्यपुस्तकाचे विश्लेषण

| इकाई | श्रवण | भाषण—संभाषण | वाचन (पठन) | लेखन |
|---|---|---|---|---|
| पहली | न्यारे—न्यारे शब्द, हवा, पतंग, शेरू, पहचान हमारी, वह है कौन? हमारा मैदान, सपना, पुष्पगुच्छ | शब्द मेरे अपने, गाँव | पेटूराम | — |
| दूसरी | बोल—बोल मे अंतर, बूँदें, मधुमक्खी का छत्ता, पढाई, जुडे हम बूझो तो जाने, अपनी—अपनी बोली, किला | बोल—बोल मे अंतर, बूँदें, मधुमक्खीका छत्ता, शहर, पढाई | शब्द बने हमारे, जुडे हम, हँसना मना है, कद्दू और बेलफल, किला | मधुमक्खी का छत्ता, जुडे हम |
| तीसरी | सोच—सोचकर, बोल, सर्दी, खुशहाली, स्वादिष्ट, व्यंजन, दिनचर्या | सोच—सोचकर बोल, सर्दी, क्या कम है? | शब्द वाटिका, प्रकाश की ओर, अंको का व्यवहार, हमारे अपने, बिल्लियाँ और बंदर, दिनचर्या, रंगोली | डाकघर, हमारे अपने, स्वादिष्ट, व्यंजन, बिल्लियाँ और बंदर |
| चौथी | सुवचनोंका मोल, नया साल, मित्रता, बच्चे हिंदुस्तानी | सुवचनों का मोल, नयासाल, बैंक, विज्ञान दिवस | शब्द—संसार, विज्ञान दिवस, गिनती, माँ, छुटकू और बडकू, संदेश, बच्चे हिंदुस्तानी, सैर, हलुआ | गिनती, सदेंश, सैर |

## निरीक्षण :

वरील चाचणी क्र. ४.३३ नुसार इ.५वीच्या विद्यार्थ्यांच्या भाषिक कौशल्याच्या विकासासाठी प्रयत्न झालेले आहेत. श्रवण, भाषण–संभाषण, वाचन व लेखन या चारही कौशल्यांचा संतुलित विकास व्हावा यासाठी इ. ५वीच्या हिंदी सुलभभारती या पाठ्यपुस्तकात विशेष लक्ष दिलेले आहे. प्रस्तुत पुस्तकामध्ये ४ ही चाचण्यांमध्ये श्रवण, भाषण–संभाषण, वाचन व लेखनासाठी, स्वतंत्र पाठ दिलेले आहेत. काही पाठांमध्ये दोन पेक्षा अधिक कौशल्यावर भर आहे.

## अर्थनिर्वचन :

वरील सारणी क्र.४.३३ नुसार इ.५वीच्या पाठ्यपुस्तकांमध्ये श्रवण कौशल्याच्या विकासासाठी ४६% पाठांचा समावेश केलेला आहे. २५% पाठ हे भाषण–संभाषण कौशल्यावर आधारित आहेत, तर ३९% पाठ हे वाचन कौशल्यावर आधारित आहेत, तर १६% पाठ हे लेखन कौशल्यावर आधारित आहेत.

## निष्कर्ष :

इ.५वीच्या 'हिंदी सुलभभारती' या पाठ्यपुस्तकामध्ये विद्यार्थ्यांच्या श्रवण, भाषण–संभाषण, वाचन, लेखन या चार कौशल्यांचा विकास करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## सारणी क्र. ४.३४

## इ.५वीच्या हिंदी पाठ्यपुस्तकाचे निरंतर मूल्यमापनासाठी दिलेल्या स्वाध्यायानुसार विश्लेषण

| भाषणपर आधारित प्रश्न | वाचनपर आधारित प्रश्न | लेखनपर आधारित प्रश्न | वाचन और भाषणपर आधारित प्रश्न | श्रवण और लेखनपर आधारित प्रश्न | वाचन और लेखनपर आधारित प्रश्न | व्याकरणपर आधारित प्रश्न |
|---|---|---|---|---|---|---|
| १) देखो और बोलो। २) चित्र देखकर उत्तर दो। ३) चित्र के संबंध मे पाँच वाक्य बोलो। ४) सोचो और बताओ। ५) प्रत्येक पाठ्यविषय मे से एक मनपसंत पाठ्यांश को चुनो और उसका कारण बताओ। ६) पालतू जानवरो के बारेमे दो वाक्य बोलो। | १) कविता का मुखर करो। २) शब्दों और वाक्योंको लय के साथ पढो। ३) पढो और समझो। | १) जोडिया मिलाओ। २) चित्र देखकर रिक्त स्थानोकी पूर्ति करो। ३) एक वाक्य मे उत्तर लिखो। ४) कविता की पंक्तियाँ देखकर लिखो। ५) सही वाक्य चुनकर चौखट मे उसका क्रमांक लिखो। ६) प्रश्नो के उत्तर लिखो। ७) शीर्षक देकर कहानी अपने शब्दो मे लिखो। ८) शब्दों का प्रयोग करो। ९) देखो और लिखो। १०) चित्र देखकर पाँच पाँच वाक्य लिखो। ११) प्रश्नो के उत्तर लिखो। १२) डाकघर का महत्व लिखो। १३) स्वस्थ रहने के लिए | १) पाठ्यांश पढकर अपने शब्दोंमे बताओ। | १) सुनो और लिखो। २) पूरी कविता सुनो और लिखो। | १) मौन वाचन करके प्रश्नों के उत्तर लिखो। २) पढो और इसी प्रकार के दस शब्द लिखो। | १) विरामचिन्होंका प्रयोग – जुडे हम(१) और भाग(२) मे अनुलेखन करते समय उचित विरामचिन्हों का प्रयोग करना है।, २) समानार्थी और विरूध्दार्थी शब्द– समानार्थी और विरूध्दार्थी शब्दो पर इसप्रकार के प्रश्न दिए गए है–समानार्थी शब्द लिखो। विरूध्दार्थी शब्दो की जोडिया |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | दस आवश्यक बाते लिखो। १४) किसने किससे कहा? १५) संक्षेप मे उत्तर लिखो। १६) बताओ कि निम्नलिखीत कथन सत्य है या असत्य । १७) निम्नलिखित शब्दो के अर्थ लिखो। १८) रोबोट का चित्र बनाकर दस वाक्य लिखो। १९) राही वाक्य बनाओ। २०) निम्नलिखित मुद्दो के आधार पर कहानी लिखकर शिर्षक दो। | | | | मिलाओ।<br>३) वचन – एकवचन और बहुवचन की पहचान करना।<br>४) लिंग – स्त्रीवाचक, पुरूषवाचक शब्दोंकी जोडियाँ बनाना।<br>५)अनुस्वार और चंद्रबिदु के उचित प्रयोग का निरीक्षण करना। |

निरीक्षण :

वरील सारणी क्र. ४.३४ नुसार इ.५वीच्या हिंदी सुलभभारती पाठ्यपुस्तकात स्वाध्यायासाठी वेगवेगळ्या प्रकारचे प्रश्न दिलेले आहेत. प्रश्नांचे वर्गीकरण कौशल्यांवर आधारित केल्यास असे आढळते की लेखन कौशल्यावर आधारित प्रश्नांची संख्या जास्त आहे. इतर कौशल्यांवर आधारित प्रश्नाची संख्या कमी आहे.

अर्थनिर्वचन :

वरील सारणी क्र. ४.३४ नुसार इ.५वीच्या हिंदी सुलभभारती या पाठ्यपुस्तकात स्वाध्यायांतर्गत दिलेल्या विविध प्रश्नापैकी १५% प्रश्न भाषण कौशल्यावर आधारित आहेत, ७% प्रश्न वाचन कौशल्यावर आधारित, ५२% प्रश्न लेखन कौशल्यावर आधारित, २% प्रश्न वाचन व भाषण कौशल्यावर तर ५% प्रश्न लेखन कौशल्यावर आधारित, २% प्रश्न व भाषण कौशल्यावर तर ५% प्रश्न श्रवण व लेखन या दोन्ही कौशल्यावर आधारित आहेत, तसेच ५% प्रश्न वाचन–लेखन कौशल्यावर, तर १२% प्रश्न हे व्याकरणावर आधारित आहेत.

निष्कर्ष :

यावरून असे दिसून येते की, इ.५वीच्या हिंदी सुलभभारती या पाठ्यपुस्तकात स्वाध्यायांतर्गत दिलेल्या प्रश्नांमध्ये कौशल्यानुसार विविधता आढळते. म्हणजेच इ.५वीच्या हिंदी पाठ्यपुस्तकांमध्ये निरंतर मूल्यांकनावर भर दिलेला आढळून येतो.

## सारणी क्र. ४.३५

## सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकाचे विश्लेषण

### अ) पाठ्यपुस्तकाचे बहिरंग

| मुद्दे | आवरण | आकार | मुद्रण | कागद | बांधणी | किंमत | चित्रे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| विश्लेषण | पाठ्यपुस्तकाचे मुखपृष्ठ व मलपृष्ठ दोन्ही आकर्षक आहेत. इ. ५वीच्या वयोगटास अनुसरून चित्रे आहेत. | या पाठ्यपुस्तकाचा आकार फार मोठा किंवा फार छोटा नाही. तो विद्यार्थ्यांच्या वयोगटास अनुसरून दफ्तरमध्ये बसण्यायोग्य आहे. | पाठ्यपुस्तकातील अक्षरांचा आकार विद्यार्थी वयोगटानुसार सुस्पष्ट व व्यवस्थित आहे. | पाठ्यपुस्तकासाठी वापरलेला कागद चांगल्या दर्जाचा, टिकाऊ व शुभ्र आहे. | पाठ्यपुस्तकाची बांधणी साधी असल्याने ती फारशी मजबूत नाही. ही बांधणी आणखी मजबूत असणे आवश्यक आहे. | या पाठ्यपुस्तकाची किंमत सर्वसामान्य विद्यार्थ्यांना परवडेल अशी नाही | या पाठ्यपुस्तकातील चित्रांची संख्या योग्य आहे. ही चित्रे आकर्षक, सुस्पष्ट व विषयास अनुसरून आहेत. आशय, सबोध कल्पना स्पष्ट होण्याचा दृष्टीने ही चित्रे खूपच उपयुक्त आहेत. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

वरीलसारणी क्र. ४.३५ नुसार इ. ५वीच्या इंग्रजीचे पाठ्यपुस्तक आवरण, आकार, चित्रे यादृष्टीने वयोगटास अनुसरून उपयुक्त आहे.

निष्कर्ष :

१) इ. ५वीच्या इंग्रजी पाठ्यपुस्तकाचे आवरण आकर्षक व वयोगटास अनुसरून आहे.

२) इ. ५वीच्या इंग्रजी पाठ्यपुस्तकाचा आकार हाताळण्यास योग्य आहे.

३) इ. ५वीच्या इंग्रजी पाठ्यपुस्तकतील मुद्रण वयोगटास योग्य आहे.

४) इ. ५वीच्या इंग्रजी पाठ्यपुस्तकासाठी वापरलेला कागद योग्य जाडीचा व शुभ्र आहे.

५) इ. ५वीच्या इंग्रजी पाठ्यपुस्तकाची किंमत सर्व सामान्य विद्यार्थ्यांना परवडणारी नाही.

६) इ. ५वीच्या इंग्रजी पाठ्यपुस्तकाची बांधणी मजबूत असावी.

७) इ. ५वीच्या इंग्रजी पाठ्यपुस्तकातील चित्रे आकर्षक, सुस्पष्ट व विषयाशी सुसंगत आहेत.

## इ. ५वीच्या इंग्रजी पाठ्यपुस्तकाच्या अंतरंगाचे विश्लेषण

### सारणी क्र. ४.३६

### इ. ५वीच्या इंग्रजी पाठ्यपुस्तकातील कथाप्रकारानुसार पाठ्यपुस्तकाचे विश्लेषण

| अ.क्र. | कथाप्रकार | समाविष्ट कथा |
|---|---|---|
| 1) | Stories to think about | 1) The little Red Hen<br>2) True friends<br>3) The Tortise and the Geese.<br>4) Geroge Washington – Carver.<br>5) He knows the workman. |
| 2) | Fun time | 1) The water carrier's Treasure.<br>2) The Runeaway Wheel.<br>3) The Three Cries. |
| 3) | In the world of Imagination | 1) Alyonushka.<br>2) Jack & the Beanstalk.<br>3) The Ugly Duckling |

**निरीक्षण :**

वरील सारणी क्र. ४.३६ नुसार इ. ५वीच्या इंग्रजी पाठ्यपुस्तकातील ४ युनिट अंतर्गत विविध प्रकारच्या ११ कथांचा समावेश केलेला आहे. त्यामध्ये वैचारिक मनोरंजनात्मक व काल्पनिक कथांचा समावेश केलेला दिसून येतो

**अर्थनिर्वचन :**

वरील सारणी क्र. ४.३६ नुसार इ. ५वीच्या इंग्रजी पाठ्यपुस्तकातील एकूण कथांपैकी ४६% कथा वैचारिक, २७% कथा मनोरंजनात्मक तर २७% कथा काल्पनिक आहेत.

**निष्कर्ष :**

यावरून असे दिसून येते की, इ. ५वीच्या इंग्रजी पाठ्यपुस्तकात विविध आशयांच्या कथांचा समावेश केलेला आहे.

## सारणी क्र. ४.३७

## इ. ५वीच्या इंग्रजी पाठ्यपुस्तकातील कथांचे विकसित होणाऱ्या कौशल्यांनुसार विश्लेषण

| अ. क्र. | कथेचे नाव | विकसित होणारी कौशल्ये | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | श्रवण | वाचन | भाषण | लेखन | नाट्यीकरण |
| 1 | The little Red Hen | — | √ | √ | √ | — |
| 2 | True Friends | √ | √ | √ | — | √ |
| 3 | The Water Carrier's Treasure | √ | √ | √ | — | — |
| 4 | In the World of Imagination | √ | √ | √ | √ | — |
| 5 | The Tortoise & the Geese | √ | √ | — | √ | — |
| 6 | George Washington – Carver | √ | √ | — | √ | — |
| 7 | The Runaway Wheel | √ | — | — | √ | — |
| 8 | Jack & The Beanstalk | √ | √ | — | — | — |
| 9 | He Knows the Workman | √ | √ | √ | √ | — |
| 10 | The Three Cries | √ | √ | — | √ | — |
| 11 | The Ugly Ducking | √ | √ | √ | — | — |

**निरीक्षण :**

वरील सारणीक्र. ४.३७ नुसार इ. ५वीच्या इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकात दिलेल्या कथांमधून विविध भाषिक कौशल्यांचा विकास करण्याचे प्रयत्न केलेले आहेत. त्यामध्ये श्रवण, वाचन, लेखन, भाषण, नाट्यीकरण इ. विविध कौशल्ये विकसित करणे, हा या कथांचा मुख्य हेतू आहे.

**अर्थनिर्वचन :**

वरील सारणी क्र. ४.३७ नुसार इ.५वीच्या इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकातील ९०% कथांमधून श्रवण कौशल्य, ९०% कथांमधून वाचन कौशल्य, ५४% कथांमधून भाषण कौशल्य, ६३% कथांमधून लेखन कौशल्य तर ९% कथांमधून नाट्यीकरण कौशल्यांचा विकास करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**निष्कर्ष :**

यावरून असे दिसून येते की, इ. ५वीच्या इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकांतील कथांव्दारे विद्यार्थ्यांच्या भाषिक कौशल्यांचा विकास करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## सारणी क्र. ४.३८

## इ. ५वीच्या इंग्रजी पाठ्यपुस्तकातील कवितांमधून प्रतीत होणाऱ्या कौशल्यांनुसार विश्लेषण

| अ. क्र. | पद्य प्रकार | प्रतीत होणारी कौशल्ये | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | Listen | Repeat | Read Aloud | Sing |
| 1 | What does little Birdie say | √ | √ | — | √ |
| 2 | In the park | √ | — | √ | — |
| 3 | The Kite | √ | — | √ | — |
| 4 | Friends | √ | — | √ | — |
| 5 | Spring Song | √ | √ | — | — |
| 6 | Holi | √ | √ | — | — |
| 7 | Holiday Plans | √ | √ | — | — |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 8 | The Rainbow | √ | √ | √ | √ |
| 9 | One thing at a time | √ | √ | √ | √ |
| 10 | Leader | √ | — | — | √ |
| 11 | Team Tag | √ | — | √ | √ |
| 12 | A Game for a picnic | — | — | — | √ |

## निरीक्षण :

वरील सारणीक्र. ४.३८ नुसार इ. ५वीच्या इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकात दिलेल्या कवितांमधून Listen, Repeat, Read aloud, Sing इ. कौशल्ये विकसित करण्याचा प्रयत्न केलेला आहे. पाठ्यपुस्तकातील प्रत्येक युनिटमध्ये येणाऱ्या कवितांमध्ये (Poems) खूप वैविध्य आहे. जगविख्यात नामांकित कवींच्या कवितांचा समावेश आहे. या कविता प्रामुख्याने पाठांतर आणि मोठ्याने वाचनासाठी आहेत. तसेच काही कविता खेळ—खेळताना म्हणवयाच्या आहेत.

## अर्थनिर्वचन :

वरील सारणी क्र. ४.३८ नुसार इ.५वीच्या इंग्रजी पाठ्यपुस्तकातील १००% कविता या श्रवणसाठी आहेत, ५०% कविता या पाठांतरासाठी, ४२% कविता मोठ्याने वाचण्यासाठी तर ५०% कविता या गाण्यासाठी आहेत.

## निष्कर्ष :

यावरून असे दिसून येते की, इ. ५वीच्या इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकांत विद्यार्थ्यांच्या श्रवण, गायन, पाठांतर कौशल्यांचा विकास व्हावा म्हणून विविध प्रकारच्या कवितांचा समावेश केलेला आहे.

## सारणी क्र. ४.३९

## इ. ५वीच्या इंग्रजी पाठ्यपुस्तकाचे Science Magazine उपक्रमानुसार विश्लेषण

| पृष्ठ.क्र. | 'Science Magazine' शीर्षकाखाली दिलेला आशय |
|---|---|
| 44-46 | Where does all the rainwater go? |
| 65-66 | The Amazing world of plants. |
| 96 | Why does it haileven when it is hot? |
| 110-111 | Up in the Air |
| 120-121 | Plants that Eat animals. |

**निरीक्षण :**

वरील सारणी क्र. ४.३९ नुसार इ. ५वीच्या इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकात विद्यार्थ्यांना वैज्ञानिक जीवनाशी निगडीत गोष्टी ऐकण्याची /वाचण्याची सवय व्हावी यादृष्टीने 'Science Magazine' च्या अंतर्गत प्राणी, वनस्पती, पाणी, हवा इ. पर्यावरणीय घटकांच्या जाणीवजागृतीचे प्रयत्न झालेले आहेत.

**अर्थनिर्वचन :**

वरील सारणी क्र. ४.३९ नुसार इ.५वीच्या इंग्रजी पाठ्यपुस्तकातील १२८ पृष्ठांपैकी ६% पृष्ठांवर 'Science Magazine' उपक्रम दिलेला आहे.

**निष्कर्ष :**

यावरून असे दिसून येते की, इ. ५वीच्या इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकांत विद्यार्थ्यांमध्ये अवांतर वाचनाची सवय व्हावी, यासाठी 'Science Magazine' च्या अंतर्गत वैज्ञानिक व पर्यावरणाशी निगडीत परिच्छेद दिलेले आहेत.

## सारणी क्र. ४.४०

## इ. ५वीच्या इंग्रजी पाठ्यपुस्तकाचे भाषिक खेळानुसार विश्लेषण

| युनिट | पृष्ठ | भाषिक खेळ प्रकार |
|---|---|---|
| Unit 1 | पृष्ठ क्र. २ | 1) Play the game of Simon Says |
| | पृष्ठ क्र. १८ | 2) A Game Hide & Tell |
| | पृष्ठ क्र. २३ | 3) Continue the Game |
| Unit 2 | पृष्ठ क्र. ४२ | 1) Play the game of keeping quite |
| | पृष्ठ क्र. ६७ | 2) Play the guessing game in pairs |
| Unit 3 | पृष्ठ क्र. ९० | 1) Learn the 'Q' word and quiz the teacher |
| | पृष्ठ क्र. १०४ | 2) A Game – Pot Luck |
| Unit 4 | पृष्ठ क्र. १०७ | 1) Play the game of Quiz using sentences from this story |
| | पृष्ठ क्र. ११३ | 2) Listen carefully & play the game |

निरीक्षण :

वरील सारणी क्र. ४.४० नुसार इ. ५वीच्या इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकामध्ये युनिट १,२,३,४ मध्ये विविध भाषिक खेळांचा समावेश केलेला आहे. 'आठवा आणि सांगा', 'शोधा म्हणजे सापडेल', 'भूमिका करा, भूमिका बदला', 'कल्पना करा – आपण अमूक आहोत आणि सांगा', शब्दांच्या जोड्या लावा, 'शब्दांचे अर्थ शोधा' इ. प्रकारच्या भाषिक खेळांचा समावेश केलेला आहे. यामुळे अध्ययन–अध्यापन प्रक्रिया मनोरंजनात्मक व आनंददायी बनविण्याचे प्रयत्न केलेले दिसून येतात.

अर्थनिर्वचन :

वरील सारणी क्र. ४.४० नुसार इ.५वीच्या इंग्रजी पाठ्यपुस्तकामध्ये दिलेल्या एकूण भाषिक खेळांपैकी ३३% खेळ पहिल्या युनिटमध्ये, २२% खेळ दुसऱ्या युनिटमध्ये तसेच तिसऱ्या व चौथ्या युनिटमध्येही प्रत्येकी २२% खेळ दिलेले आहेत.

निष्कर्ष :

यावरून असे दिसून येते की, सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ. ५वीच्या इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकामध्ये अध्ययन–अध्यापन प्रक्रिया आनंददायी व मनोरंजक बनविण्यासाठी विविध प्रकारचे भाषिक खेळ दिलेले आहेत.

## सारणी क्र. ४.४१

## 'Newspaper Cutting' (माहिती तंत्रज्ञान) उपक्रमानुसार इ. ५वीच्या इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकाचे विश्लेषण

| युनिट | पृष्ठ | माहिती तंत्रज्ञानाशी निगडीत आशय |
|---|---|---|
| 1 | — | ——— |
| 2 | पृष्ठ क्र. 43 | Read the headlines & answer the following questions. |
| 3 | पृष्ठ क्र. 74 | Look at the following advertisement carefully. |
| 4 | पृष्ठ क्र. 123 | Look at the following advertisement carefully. |

निरीक्षण :

वरील सारणी क्र. ४.४१ नुसार इ. ५वीच्या इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकामध्ये विद्यार्थ्यांना माहिती तंत्रज्ञानाचा परिचय करून देण्यासाठी या विषयांतर्गत

जाहिराती संदर्भातील वेगवेगळे उपक्रम वृत्तपत्रातील कात्रणे जमविणे इ. उपक्रमांचा समावेश केलेला आहे. यामुळे विद्यार्थी वृत्तपत्रांमधील ठळक बातम्या जाहिराती, महत्वपूर्ण मजकूर इ. वाचण्याचा प्रयत्न करू शकतो.

## अर्थनिर्वचन :

वरील सारणी क्र. ४.४१ नुसार इ.५वीच्या इंग्रजी पाठ्यपुस्तकामध्ये दिलेल्या एकूण युनिटपैकी ७५% युनिटमध्ये माहिती तंत्रज्ञानाशी निगडीत उपक्रम दिलेले आहेत.

## निष्कर्ष :

यावरून असे दिसून येते की, सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ. ५वीच्या इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकामध्ये माहिती तंत्रज्ञानाचा परिचय करून देण्यासाठी 'Newspaper Cutting' व उपक्रम दिलेला आहे.

### सारणी क्र. ४.४२

### इ. ५वीच्या इंग्रजी पाठ्यपुस्तकाचे **'Interview'** (मुलाखत) उपक्रमानुसार विश्लेषण

| युनिट | पृष्ठ | 'Interview' (मुलाखत प्रकार) |
|---|---|---|
| 1 | 32-33 | प्रश्न विचारणे |
| 2 | 54-55 | प्रश्न विचारणे, माहिती नोंदविणे |
| 3 | 91-93 | प्रश्न विचारणे, भूमिका करणे, प्रश्नांची उत्तरे देणे |
| 4 | 116-117 | प्रश्न विचारणे, उत्तरे देणे, माहिती नोंदविणे, भूमिका करणे |

**निरीक्षण :**

वरील सारणी क्र. ४.४२ नुसार इ. ५वीच्या इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकामध्ये विद्यार्थ्यांच्या श्रवण/भाषण–संभाषण या कौशल्यांमध्ये गती यावी, त्यांच्या संभाषणामध्ये सहजता यावी, यासाठी त्यांनी एकमेकांच्या तसेच वर्गाबाहेरील समाजातील वेगवेगळ्या लोकांच्या मुलाखती घेण्यासाठी स्वतंत्र उपक्रम दिलेले आहेत.

त्यासाठी अ– प्रश्न विचारणे, ब–प्रश्नांची उत्तरे देणे,

क– भूमिका करणे/वठविणे, ड–माहिती नोंदविणे

इ. साठी विशिष्ट पद्धती दिलेल्या आहेत.

**अर्थनिर्वचन :**

वरील सारणी क्र. ४.४२ नुसार इ.५वीच्या इंग्रजी पाठ्यपुस्तकामध्ये एकूण पृष्ठांपैकी ७% पृष्ठांवर व १००% युनिटमध्ये Interview हा उपक्रम दिलेला आहे.

**निष्कर्ष :**

यावरून असे दिसून येते की, सन २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ. ५वीच्या इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकामध्ये विद्यार्थ्यांच्या इंग्रजी भाषण–संभाषण कौशल्याचा विकास करण्यासाठी Interview या उपक्रमाचा समावेश केलेला आहे.

## सारणी क्र. ४.४३

## इ. ५वीच्या इंग्रजी पाठ्यपुस्तकाचे 'Ditto' (डिट्टो) उपक्रमानुसार विश्लेषण

| युनिट | पृष्ठ क्र. | उपक्रमाचे स्वरूप |
|---|---|---|
| 1 | ---- | ——— |
| 2 | 69 | शिक्षकांनी वाचलेले काळजीपूर्वक ऐकणे व लिहिणे.<br>(नवीन शब्द कसे लक्षात ठेवावेत यासाठी सूचना) |
| 3 | 75 | शिक्षकांनी वाचलेले काळजीपूर्वक ऐकणे व नंतर लिहिणे<br>(नवीन वाक्ये काळजीपूर्वक वाचणे व न बघता लिहिणे यासाठी सूचना) |
| 4 | 108 | शिक्षकांनी वाचलेले काळजीपूर्वक ऐकणे व नंतर लिहिणे.<br>(नवीन शब्द व अर्थपूर्ण वाक्ये कशी लिहावीत यासाठी सूचना) |

### निरीक्षण :

वरील सारणी क्र. ४.४३ नुसार इ. ५वीच्या इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकामध्ये विद्यार्थ्यांच्या श्रवण व लेखन कौशल्यावर आधारित 'Ditto' (डिट्टो) हा नवीन उपक्रम दिलेला आहे. त्यात लक्षपूर्वक ऐकणे, ऐकलेले न बघता जसेच्या तसे लिहिणे आणि स्वत: लिहिलेले मोठ्याने वाचने, मूळ मजकूर वाचून स्वत:च्या लिहिलेल्या मजकूराचा तंतोतंतपणा पडताळणे अशा टप्प्यांत विद्यार्थी कृती दिलेली आहे.

पारंपारिक पद्धतीने होत असलेल्या श्रुतलेखनापेक्षा 'Ditto' ही कृती वेगळी आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या धारणशक्तीचा व स्मरणशक्तीचा विस्तार वाढविण्यास चालना मिळते. त्याचबरोबर त्यांचा शब्दसंग्रह वाढविण्यास व वाकयरचना ऐकून व लिहून सराव होण्यास मदत होते.

**अर्थनिर्वचन :**

वरील सारणी क्र. ४.४२ नुसार इ.५वीच्या इंग्रजी पाठ्यपुस्तकामध्ये एकूण युनिटपैकी ७५% युनिटमध्ये व एकूण पृष्ठांपैकी २% पृष्ठांवर डिट्टो हा उपक्रम दिलेला आहे.

**निष्कर्ष :**

यावरून असे दिसून येते की, इ. ५वीच्या इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकामध्ये विद्यार्थ्यांच्या शब्दसंग्रहवाढीसाठी स्मरणशक्तीच्या वाढीसाठी, श्रवण व लेखन कौशल्यांच्या विकासासाठी 'Ditto' हा उपक्रम दिलेला आहे.

## सारणी क्र. ४.४४

## इ. ५वीच्या इंग्रजी पाठ्यपुस्तकाचे भाषाविषयक प्रकल्पानुसार उपक्रमानुसार विश्लेषण

| प्रकल्प क्र. | प्रकल्पाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| 1 | Preparing word-cards | 26, 47, 76, 77, 124 |
| 2 | Dictionary / Reference work | 15, 47, 63, 64, 76, 123, 81, 88, 124 |
| 3 | Retelling / Rewriting with the help of Mother Tongue | 40, 52, 53, 66, 74, 80, 107, 121, 123, 128, |
| 4 | News paper Cutting | 43, 74, 123 |
| 5 | Interviews | 32, 33, 54, 55, 91, 92, 93, 116, 117 |
| 6 | Dramatizing Stories | 103, 128 |
| 7 | Collecting Puzzles, Riddles jokes | 22, 53, 77 |
| 8 | Additional Reading | 112 |

निरीक्षण :

वरील सारणी क्र ४.४४ नुसार इ.५वीच्या इंग्रजी पाठ्यपुस्तकांमध्ये विद्यार्थ्यांमधील इंग्रजी भाषेची गोडी व आत्मविश्वास वाढत रहावा म्हणून इ. ५वीच्या My English Book Five या पुस्तकांत काही उपक्रम व प्रकल्प सुचविले आहेत. 'भाषा प्रकल्प' हे या पुस्तकाचे खासवैशिष्ट्य आहे. भाषाविषयक विविध क्षमतांचा विकास व्हावा, तसेच विद्यार्थ्यांना क्रियाशील बनवून आनंददायी अध्ययन अनुभव देण्याचे प्रयत्न या प्रकल्पांतून केलेले आहेत. हे प्रकल्प वर्षभर चालणारे असून वैयक्तिक व सामूहिक अशा दोन्ही पद्धतीचे आहेत.

अर्थनिर्वचन :

वरील सारणी क्र. ४.४४ नुसार इ.५वीच्या इंग्रजी पाठ्यपुस्तकामध्ये ४% पृष्ठांवर प्रकल्प क्र. १ Praeparing Word-Cards (शब्दकोडे तयार करणे) हा प्रकल्प दिलेला आहे. ७% पृष्ठांवर प्रकल्प क्र. २ Dictionary/ Reference work (शब्दकोष व संदर्भकार्य वापर) हा प्रकल्प दिलेला आहे. ८% पृष्ठांवर प्रकल्प क्र.३ Retelling/ writing with the help of mother tongue (मातृभाषेत पुन्हा सांगणे, लिहिणे) हा प्रकल्प दिलेला आहे. २% पृष्ठांवर प्रकल्प क्र.6 Dramatizing Stories (कथांचे नाट्यीकरण) हा प्रकल्प दिलेला आहे. २% पृष्ठांवर Collecting puzzles, Riddles jokes (शब्दकोडी जमा करणे) हा उपक्रम दिलेला आहे. १% पृष्ठांवर प्रकल्प क्र.८ Additional Reading (पूरक वाचन) हा प्रकल्प दिलेला आहे.

निष्कर्ष :

यावरून असे दिसून येते की, इ. ५वीच्या इंग्रजी पाठ्यपुस्तकात विद्यार्थ्यांच्या विविध भाषिक क्षमतांचा विकास व्हावा, विद्यार्थ्यांना क्रियाशील बनवून आनंददायी अध्ययन–अनुभव देण्यासाठी एकूण ८ प्रकारच्या प्रकल्पांचा समावेश केलेला आहे.

### सारणी क्र. ४.४५

### ‘नकाशे, आकृत्या, तक्ते व चित्रवाचन’ यानुसार इ. ५वीच्या इंग्रजी पाठ्यपुस्तकाचे विश्लेषण

| पृष्ठ क्र. | चित्रे | आकृत्या | तक्ते | नकाशे |
|---|---|---|---|---|
| ६ व ७ | In the park या कवितेत Ladder, Seasaw, Meery-go-round, Slide यासारख्या शब्दांच्या स्पष्टीकरणासाठी चित्रे दिलेली आहेत. | — | — | — |
| ८ व ९ | एका शब्दापेक्षा शब्दसमूह व त्यापेक्षा वाक्ये अर्थपूर्ण असतात. या विधानाच्या स्पष्टीकरणासाठी चित्रे दिलेली आहेत | — | — | — |
| १० | Where was the ball या कृतीत चेंडूच्या संभाव्य जागा आणि प्रत्यक्षात तो कोठे होता यासंबधीची चित्रे दिलेली आहेत. | — | — | — |

| पृष्ठ क्र. | चित्रे | आकृत्या | तक्ते | नकाशे |
|---|---|---|---|---|
| १७ | | — | आठवड्याच्या वारांचा तक्ता, शब्दांचा तक्ता | — |
| २८ | विविध कृतीदर्शक चित्रे | — | — | — |
| २९,३०, ३१ | The Little Red Hen या कथेचे आकलन होण्यासाठी विविध चित्रे. | — | — | — |
| ३४ | बाणाच्या सहाय्याने वाक्यातील बदलत्या शब्दांची जाणीव करून देणे | — | — | — |
| ३७ ते ४० | कॉमिक्स पुस्तकांप्रमाणे चित्रांच्या सहाय्याने कथावाचन. | — | — | — |
| ४१ | | — | क्रियापदांचा रूपांचा तक्ता | — |
| ४४, ४५ | Rainwater चित्र | — | Rainwater तक्ता | — |
| ४६ | What is wrong in the pricutre ? हे ओळखण्यासाठी दिलेले चित्र | — | — | — |
| ४७ | | — | शब्दतक्ता | — |

| पृष्ठ क्र. | चित्रे | आकृत्या | तक्ते | नकाशे |
|---|---|---|---|---|
| ४८ ते ५१ | Water carrier's Treasure या कथेवर आधारित चित्रे | — | — | — |
| ६४ | | — | Alphabet Hangers | — |
| ६५ ते ६७ | Science Maganize अंतर्गत माशांची चित्रे | — | — | — |
| ६८ | वाक्यरचनेसाठी दिलेली चित्रे | — | — | — |
| ६९ | Teeskit & Taskit खेळासंबंधी चित्रे | — | — | — |
| ७२,७३ | कथेसबंधी चित्रे | — | — | — |
| ७६ | | — | शब्दांचा तक्ता | — |
| ८१ | | वनस्पतींच्या विविध भागांची ओळख दर्शविणारी आकृती | — | — |
| ८२,८३ | रेडवुडसारख्या वृक्षाची चित्रे | — | — | — |
| ८४,८६, ८७,८८ | The Runaway Wheel कथेवर आधारित चित्रे | — | — | — |

| पृष्ठ क्र. | चित्रे | आकृत्या | तक्ते | नकाशे |
|---|---|---|---|---|
| ९५ | | | | दिशांचे ज्ञान व जाणीव तसेच सोप्या नकाशाच्या आधारे पत्ता सांगण्याचे कौशल्य विकसित करणे |
| १०५ | Spring Song कवितेवर आधारित निसर्गचित्र | | | |
| ११० | Science Magazine अंतर्गत Atmosphere चे चित्र | | | |
| ११२ | | | Atmosphere तक्ता | |
| ११४, ११५ | The three cries कथेवर आधारित चित्रे | | | |
| १२०, १२१ | | Picther plant आकृती | | |
| १२४ | | | शब्दतक्ता | |
| १२५, १२७ | The Ugly Duckling कथेवर आधारित चित्रे | | | |

निरीक्षण :

वरील सारणी क्र. ४.४५ नुसार इ. ५वीच्या इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकामध्ये अध्ययनाची प्रक्रिया जास्तीत–जास्त विविधांगी आणि विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष जीवनाशी निगडीत असावी यासाठी विविध रंगीत, आकर्षक व आशयाशी निगडीत चित्रांचा समावेश केलेला आहे. पाठ्यपुस्तकात ठिकठिकाणी चित्रांचा अत्यंत बोलका सुयोग्य उपयोग केलेला आहे. चित्रांबरोबर नकाशा, तक्ते, आकृत्या इ. कल्पक साधनांचा उपयोग केला आहे. या सर्वांकडे विद्यार्थ्यांचे लक्ष वेधून त्या–त्या ठिकाणी असलेल्या कृतींच्या उद्‌देशाकडे जाणीवपूर्वक पाहिल्यास संपादित ज्ञानाचे उपयोग व जीवनाशी संबंध अशा अधिक प्रगत ध्येयपूर्तीकडे वाटचाल होण्यास मदत होईल.

अर्थनिर्वचन :

वरील सारणी क्र. ४.४५ नुसार इ.५वीच्या इंग्रजी पाठ्यपुस्तकामध्ये ५९% पृष्ठांवर चित्रे दिलेली आहेत. २% पृष्ठांवर आकृत्या, ८% पृष्ठांवर तक्ते तर केवळ १% पृष्ठांवर नकाशे दिलेले आहेत.

निष्कर्ष :

यावरून असे दिसून येते की, इ.५वीच्या इंग्रजी पाठ्यपुस्तकामध्ये अध्ययन–अध्यापन प्रक्रिया विविधांगी व्हावी यासाठी चित्रे, आकृत्या, तक्ते, नकाशे इ. कल्पक साधनांचा उपयोग केला आहे.

## सारणी क्र. ४.४६

## इ.५वीच्या इंग्रजी पाठ्यपुस्तकाचे शब्दसंपत्तीच्या विकासासाठी दिलेल्या कृतीनुसार/उपक्रमानुसार विश्लेषण

| पृष्ठ क्र. | उपक्रम क्र. | उपक्रमाचे / कृतीचे स्वरूप |
|---|---|---|
| ३ | ६ | योग्य अक्षराची निवड करून रिकाम्या जागा भरणे. |
| | ७ | विचार करून जे तुम्हाला आठवतात ते ५ शब्द लिहा |
| ५ | ४ | चेहरे पाहून हावभाव पाहून, योग्य शब्दांची निवड करणे. |
| | ५ | दिलेल्या मुळाक्षरांचा वापर करून एका मिनिटात जेवढे शब्द लिहिता येतील ते लिहा. |
| ९ | ९ | उदाहरण पाहून रिकाम्या जागा योग्य शब्दांनी पूर्ण करा. |
| ११ | ३ | चित्र पाहून योग्य कृतीशब्दांची जोडी लावा. |
| १४ | ८ | २१ ते ९९ पर्यंत इंग्रजी शब्दात संख्या लिहिणे. |
| १५ | ९ | जोडीने येणाऱ्या शब्दांच्या जोड्या जुळविणे |
| २७ | ६ | 'हिरवा' व 'लाल' शब्दगटातून नवीन शब्द तयार करणे |
| ३६ | ४ | विरूध्द अर्थी शब्द लिहिणे व रेखांकित करणे |
| ५१ | १६ | एकवचनी व अनेकवचनी शब्द लिहिणे |
| ६४ | २० | अल्फाबेट हँगर |
| ६९ | २४ | डिट्टो |
| ७७ | ६ | चार्टमध्ये दिलेल्या शब्दांचा उपयोग करून रिकामे चौकोन भरणे. |
| ८८ | १० | वाहनासंबंधी शब्दसूची तयार करणे |
| ११३ | ९ | एका मिनिटात एका शब्दाच्या संबंधात येणारे जास्तीत जास्त शब्द लिहिणे |
| ११९ | १३ | यमक जुळणारे शब्द लिहिणे |
| १२७ | १८ | कथेतील विरूध्दार्थी शब्द शोधा |

निरीक्षण :

वरील सारणी क्र. ४.४७ नुसार इ.५वीच्या इंग्रजी पाठ्यपुस्तकामध्ये विद्यार्थ्यांच्या शब्दसंपत्तीचा विकास व्हावा यासाठी काही कृतींचा समावेश केलेला आहे. आठवणारे शब्द लिहिणे एका शब्दासाठी अनेक शब्द लिहिणे, यमक जुळणारे शब्द लिहिणे, समानार्थी–विरूध्दार्थी शब्द लिहिणे इ. कृतींमुळे विद्यार्थ्यांमध्ये शब्दांचे दृढीकरण होईल व भाषण संभाषणाला वाव मिळेल.

अर्थनिर्वचन :

वरील सारणी क्र. ४.४७ नुसार इ.५वीच्या इंग्रजी पाठ्यपुस्तकामध्ये १२% पृष्ठांवर विद्यार्थ्यांच्या शब्दसंपत्तीच्या विकासासाठी कृतीयुक्त आशय दिलेला आहे.

निष्कर्ष :

यावरून असे दिसून येते की, इ.५वीच्या इंग्रजी पाठ्यपुस्तकामध्ये विद्यार्थ्यांच्या शब्दसंपत्तीच्या विकासासाठी योग्य ते प्रयत्न झालेले आहेत.

## सारणी क्र. ४.४७

## इ.५वीच्या इंग्रजी पाठ्यपुस्तकाचे व्याकरणावर आधारित उपक्रमानुसार विश्लेषण

| पृष्ठ क्र. | उपक्रमाचे / कृतीचे स्वरूप |
|---|---|
| २३ | 'Want' केव्हा वापरायचे व 'Wants' केव्हा वापरायचे हे खेळाच्या माध्यमातून भरपूर सराव देऊन करवून घेणे अपेक्षित आहे. |
| ४१ | सकारात्मक व नकारात्मक क्रियापदांचा परिचय दिलेला आहे. |
| ५३ व ६३ | One Many ची कृती आहे, याठिकाणी सरळ एकवचन व अनेकवचन सांगणे अपेक्षित नसून भरपूर शब्दांच्या सहाय्याने सराव अपेक्षित आहे. |
| ६८ व ९७ | वाक्यरचना व्याकरणदृष्ट्या योग्य आहे किंवा नाही हे शिक्षकांनी पहावे. जास्तीत जास्त सराव व उपयोजनावर भर देणे आवश्यक |
| ८९ | चित्रांच्या सहाय्याने वाक्यरचना सांगितलेली आहे. तशाचप्रकारे ती विद्यार्थ्यांनी करणे अपेक्षित आहे. |
| १२२ | Joining word 'because' दिलेला आहे त्याचा सराव तशाचप्रकारे आणखीन वाक्ये देऊन करवून घेणे अपेक्षित आहे. |

**निरीक्षण :**

वरील सारणी क्र. ४.४७ नुसार इ.५वीच्या इंग्रजी पाठ्यपुस्तकामध्ये नवीन कौशल्याधिष्ठीत अभ्यासक्रमात व्याकरणाचे पारंपारिक अध्यापन अपेक्षित नाही. विद्यार्थ्यांना निरनिराळ्या उदाहरणांतून आवश्यक तो आशय (Content) द्यायचा आहे. व्याकरणातील संकल्पना शब्द वापरून किंवा व्याख्या सांगून व्याकरण शिकवायचे नाही. भरपूर उदाहरणांचा सराव विद्यार्थ्यांना देऊन अपेक्षित बदल विद्यार्थ्यांकडूनचं काढून घेणे अपेक्षित आहे. त्यांना व्याकरणाचे नियम सांगणे व लिहून देणे अपेक्षित नाही.

अर्थनिर्वचन :

वरील सारणी क्र. ४.४७ नुसार इ.५वीच्या इंग्रजी पाठ्यपुस्तकामध्ये एकूण पृष्ठांपैकी ६% पृष्ठांवर व्याकरणावर आधारित उपक्रमांचा समावेश केलेला आहे.

निष्कर्ष :

यावरून असे दिसून येते की, इ.५वीच्या इंग्रजी पाठ्यपुस्तकामध्ये भाषिक कौशल्याबरोबरच व्याकरण घटकांचा समावेश वयोगटानुसार करण्यात आलेला आहे.

## सारणी क्र. ४.४८

## इ.५वीच्या इंग्रजी पाठ्यपुस्तकातील मूल्यमापन

## (कौशल्य निहाय व प्रकल्पानुसार)

| श्रवण कौशल्य | भाषण—संभाषण कौशल्य | वाचन कौशल्य | लेखन कौशल्य | प्रकल्प |
|---|---|---|---|---|
| कृती व उपक्रम | कृती व उपक्रम | कृती व उपक्रम | कृती व उपक्रम | कृती व उपक्रम |
| i) पृष्ठ क्र. २,५, ५३, ६३ ऐका व पुनर्मांडणी करा | i) पृष्ठ क्र.४,११ शिक्षक— विद्यार्थी संभाषण | i) पृष्ठ क्र.१, ६, ८, १२, १८, २२, २८, ३१, ४६, ५६, ६२, ६६, ८३, ८८, १०३, १०७, १११, ११६, १२४, १२७ इ. प्रकटवाचन | i) पृष्ठ क्र. ३ वाचा व योग्य अक्षर शोधा | i) पृष्ठ क्र. २६,७६,१२४ शब्दांची कार्डे तयार करणे |
| ii) पृष्ठ क्र. ७२ ऐका आणि पुनर्मांडणी करा. | ii) पृष्ठ क्र. १९, ३२, ५४, ५५, ६१, ९० विद्यार्थी—विद्यार्थी संभाषण | ii) पृष्ठ क्र. ७२ वाचा आणि सांगा | ii) पृष्ठ क्र. ५,२७,१२४ शब्द मूळाक्षरांच्या क्रमाने मांडा | ii) पृष्ठ क्र.१५, ४७, ६३, ७६, १२३, १२४, १२८ शब्दकोशाचा वापर आणि संदर्भ |
| iii) पृष्ठ क्र.९, २०, ४३, ९०, ६२, १०७ ऐका आणि सांगा | iii) पृष्ठ क्र. ३१, ९३, ११७ मुक्त संभाषण | iii) पृष्ठ क्र.९, २०, ४३, ६२, ९०, १०७ वाचा आणि भूमिकाभिनय करा | iii) पृष्ठ क्र.७, ५, ११, १४, १७, ३६, ७५ पहा विचार करा आणि लिहा | iii) पृष्ठ क्र.१२, ४०, ५२, ५३, ६३, ७४, ८०, ८८, १०७, १२१, १२३, १२८ मातृभाषेचा वापर करून |

| श्रवण कौशल्य | भाषण—संभाषण कौशल्य | वाचन कौशल्य | लेखन कौशल्य | प्रकल्प |
|---|---|---|---|---|
| कृती व उपक्रम | कृती व उपक्रम | कृती व उपक्रम | कृती व उपक्रम | कृती व उपक्रम |
| iv) पृष्ठ क्र.८१ ऐका आणि अनुगान काढा | | iv) पृष्ठ क्र.३१,९३,११७ वाचा आणि सांगा | iv) पृष्ठ क्र.१५, २७, ३५, ३६, ४१, ४७, ७६, ७७, ८०, ८८, ११९, १२४, १२७ उतारावाचून शब्द शोधा | पुर्नलेखन करणे<br>iv) पृष्छ क्र. ४३, ७४, १२३ वृत्तपत्रीय कात्रणे<br>v) पृष्ठ क्र. ३२, ५४, ६६, ९०, ९१, ११६ मुलाखती |
| v) पृष्ठ क्र.१०, २२, ४३, १०३, ११६ ऐका आणि भूमिकाभिनय करा. | | | v) पृष्ठ क्र. ३४ वाक्य बदलणे | vi) पृष्ठ क्र.२२, ४०, ७२, १०३, १२८ कथांचे नाट्यीकरण |
| vi) पृष्ठ क्र.३१,९३,११७ ऐका आणि स्वत:हून बोला | | | vi) पृष्ठ क्र.७२ योग्य क्रमाने परत मांडणी करा. | vii) पृष्ठ क्र. ५३, ७७ कोडी, विनोद, जमा करणे |
| | | | vii) पृष्ठ क्र.४३ वाचा आणि उत्तर द्या | viii) पृष्ठ क्र. २९—३१, ४८—५२, ७२, ७३, ७८—८१, ८४—८८, ९६, ९८—१०३, ११०–११२, ११४—११६, १२०,१२१, १२५,१२७ अवांतर वाचन |
| | | | viii) पृष्ठ क्र १५, ३३, ४६, ६६ ९४, ११२, १२१ माहितीची मांडणी बदलणे | |

| श्रवण कौशल्य | भाषण—संभाषण कौशल्य | वचन कौशल्य | लेखन कौशल्य | प्रकल्प |
|---|---|---|---|---|
| कृती व उपक्रम | कृती व उपक्रम | कृती व उपक्रम | कृती व उपक्रम | कृती व उपक्रम |
| | | | ix) पृष्ठ क्र. ९, १८, २०, ५४, ६३, ६८, ८९, ९४, ९७, १०८, ११८, ११९, १२२, १२४ इ. ऐका, वाचा आणि लिहा | |
| | | | x) पृष्ठ क्र. ६९,७५,१०८ ऐका आणि लिहा | |
| | | | x) पृष्ठ क्र. ७४,८८,१०३,१०८ वाचा आणि अनुमान लिहा | |
| | | | xii) पृष्ठ क्र. ११२, १२८ वाचा आणि वर्गीकरण करा | |
| | | | xiii) पृष्ठ क्र.३, ५, १५, १८, २०, २७, ३१, ३४, ३६, ४३, ५२, ५५, ६७, ७३, ७७, ८९, ९३, १०४, ११३, ११७, ११८, ११९ ऐका, वाचा आणि लिहा, स्वत:हून लिहा | |

## निरीक्षण :

वरील सारणी क्र. ४.४८ नुसार असे दिसून येते की इ.५वी च्या इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकांमध्ये औपचारिक मूल्यमापनास सुरूवात झालेली आहे. परंतु हे मूल्यमापन विद्यार्थ्यांवर दडपण आणणारे, परीक्षा कसोटी या शब्दांबरोबर येणाऱ्या गांभीर्याने नाही. या स्तरावरील मूल्यमापन मुख्यत: भाषिक कौशल्यांना महत्व देणारे आहे. पाठ्यपुस्तकाच्या मलपृष्ठांवर अपेक्षित केल्याप्रमाणे सर्व भाषिक कौशल्यांच्या व प्रकल्पांच्या मूल्यमापनासाठी योग्य कृती व उपक्रमांचा समावेश पाठ्यपुस्तकात दिसून येतो.

## अर्थनिर्वचन :

वरील सारणी क्र. ४.४८ नुसार इ.५वीच्या इंग्रजीच्या पुस्तकात १५% पृष्ठावर श्रवण कौशल्याच्या मूल्यमापनासाठी ९% पृष्ठांवर श्रवण, भाषण, संभाषण कौशल्यांच्या मूल्यमापनासाठी, २३% पृष्ठांवर वाचन कौशल्यांच्या मूल्यमापनासाठी, तर ६२% पृष्ठांवर लेखन कौशल्याच्या मूल्यमापनासाठी व ५९% पृष्ठांवर प्रकल्पांच्या मूल्यमापनासाठी कृती व उपक्रम दिलेले आहेत.

## निष्कर्ष :

यावरून असे दिसून येते की, इ.५वीच्या इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकामध्ये निरंतर मूल्यमापनाचे प्रयत्न झालेले आहेत. तसेच ही मूल्यमापन पध्दती भाषिक कौशल्ये व प्रकल्पांनुसार आहे. यामध्ये इतर कौशल्ये व प्रकल्पांपेक्षा लेखन कौशल्यासाठी दिलेल्या कृती व उपक्रम यांची संख्या कमी आहे.

## 'क' विभाग

सन २००६चा इ. ५वीचा भाषांचा अभ्यासक्रम व त्यानुसार तयार झालेली इ.५वीच्या मराठी, हिंदी व इंग्रजीची पाठ्यपुस्तके यांच्या विश्लेषणासंदर्भातील पडताळासूचीचे विश्लेषण

संशोधिकेने सन २००६च्या इ.५वीच्या भाषांच्या अभ्यासक्रमाचे व त्यानुसार तयार झालेल्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकांचे विश्लेषण करून त्या विश्लेषणाची योग्या–योग्यता पडताळण्यासाठी पडताळासूची तयार केली व ती मराठीचे २५ शिक्षक, हिंदीचे २५ शिक्षक, इंग्रजीचे २५ शिक्षक याप्रमाणे एकूण ७५ शिक्षकांना देऊन भरून घेतली. या पडताळासूचीचे विश्लेषण पुढीलप्रमाणे केलेले आहे.

## सन २००६ च्या इ. ५वी च्या मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेच्या अभ्यासक्रमासंदर्भात पडताळासूचीचे विश्लेषण

### सारणी क्र. ४.४९ उद्दिष्ट पूर्तता

| अ. उद्दिष्टे | अंशत: असहमत | | | पूर्णत: असहमत | | | अंशत: सहमत | | | पूर्णत: सहमत | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मराठी | हिंदी | इंग्रजी | मराठी | हिंदी | इंग्रजी | मराठी | हिंदी | इंग्रजी | मराठी | हिंदी | इंग्रजी |
| १) हा अभ्यासक्रम निर्धारीत उद्दिष्टे साध्य करणारा आहे. | १२% | १२% | ८% | — | १२% | १२% | १२% | ८% | २०% | ७६% | ६८% | ६०% |

**अर्थनिर्वचन :** वरील सारणी क्र ४.४९ वरून असे दिसून येते की, सन २००६ चा इ. ५वी चा मराठी विषयाचा अभ्यासक्रम निर्धारीत उद्दिष्टे साध्य करणारा आहे, या मताशी १२% मराठी शिक्षक अशंत: असहमत, १२% मराठी शिक्षक अशंत: सहमत, तर ७६% मराठी शिक्षक पूर्णत: सहमत आहेत. हिंदी विषयाचा अभ्यासक्रग निर्धारित उद्दिष्टे साध्य करणारा आहे, या मताशी १२% हिंदी शिक्षक अशंत: सहमत, १२% हिंदी शिक्षक पूर्णत: असहमत, ८% हिंदी शिक्षक अंशत: सहमत तर ६८% हिंदी शिक्षक पूर्णत: सहमत आहेत, तसेच इंग्रजी विषयाचा अभ्यासक्रम निर्धारित उद्दिष्टे साध्य करणारा आहे, या मताशी ८% इंग्रजी शिक्षक अंशत: असहमत, १२% इंग्रजी पूर्णत: असहमत, २०% इंग्रजी शिक्षक अंशत: सहमत आणि ६०% इंग्रजी शिक्षक पूर्णत: सहमत आहेत.

**निष्कर्ष :** यावरून असे दिसून येते सन २००६ चा इ.५वीचा मराठी, हिंदी, इंग्रजीचा अभ्यासक्रम निर्धारित उद्दिष्टे साध्य करणारा आहे, या मताशी जास्तीत–जास्त शिक्षक पूर्णत: सहमत आहेत.

## सारणी क्र. ४.५०

## सामाजिक गरजा व बदलांचा विचार

| | अंशत: असहमत | | | पूर्णत: असहमत | | | अंशत: सहमत | | | पूर्णत: सहमत | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मराठी | हिंदी | इंग्रजी | मराठी | हिंदी | इंग्रजी | मराठी | हिंदी | इंग्रजी | मराठी | हिंदी | इंग्रजी |
| उद्दिष्टांची निश्चिती सामाजिक गरजांना व बदलांना अनुसरून झाली आहे. | ४% | ४% | — | — | — | ८% | २८ | ८% | १२% | ६८% | ८८% | ८०% |

**अर्थनिर्वचन :** वरील सारणी क्र ४.५० वरून असे दिसून येते की, सन २००६ च्या इ.५वीच्या मराठी भाषेच्या अभ्यासक्रमामध्ये सामाजिक गरजांना व बदलांना अनुसरून उद्दिष्टांची निश्चिती झाली आहे या विधानाशी ४% मराठी शिक्षक अंशत: असहमत, ८% मराठी शिक्षक अशंत: सहमत तर ६८% मराठी शिक्षक पूर्णत: सहमत आहेत.

हिंदी विषयाच्या अभ्यासक्रमातील उद्दिष्टे सामाजिक गरजांना व बदलांना अनुसरून निश्चित झालेली आहेत या विधानाशी ४% हिंदी शिक्षक अशंत: असहमत, ८% हिंदी शिक्षक अशंत: सहमत, ८८% हिंदी शिक्षक पूर्णत: सहमत आहेत.

इंग्रजी विषयाच्या अभ्यासक्रमाची उदिदष्टांची निश्चिती सामाजिक गरजांना व बदलांना अनुसरून झाली आहे. या विधानाशी ८% इंग्रजी शिक्षक पूर्णत: असहमत, १२% इंग्रजी शिक्षक अशंत: सहमत, तर ८०% इंग्रजी शिक्षक पूर्णत: सहमत आहेत.

**निष्कर्ष :** यावरून असे दिसून येते की, सन २००६ च्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजी विषयाच्या अभ्यासक्रमाच्या उद्दिष्टांची निश्चिती सामाजिक गरजांना व बदलांना अनुसरून झाली आहे. या विधानाशी जास्तीत जास्त शिक्षक सहमत आहेत.

## सारणी क्र. ४.५१

## भविष्यकाळाचा विचार

| हा अभ्यासक्रम नजीकच्या भविष्यकाळातील गरजा लक्षात घेऊन तयार केलेला आहे. | अंशत: असहमत | | | पूर्णत: असहमत | | | अंशत: सहमत | | | पूर्णत: सहमत | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मराठी | हिंदी | इंग्रजी | मराठी | हिंदी | इंग्रजी | मराठी | हिंदी | इंग्रजी | मराठी | हिंदी | इंग्रजी |
| | १२% | १६% | १२% | २०% | — | ८% | — | ४% | ८% | ६८% | ८०% | ७२% |

**अर्थनिर्वचन :** वरील सारणी क्र ४.५१ वरून असे दिसून येते की, सन २००६ चा इ.५वीचा मराठी भाषेच्या अभ्यासक्रम नजीकच्या भविष्यकाळातील गरजा लक्षात घेऊन तयार केलेला आहे, या विधानाशी १२% मराठी शिक्षक अंशत: असहमत, २०% मराठी शिक्षक पूर्णत: असहमत तर ६८% मराठी शिक्षक पूर्णत: सहमत आहेत. हिंदी विषयाचा अभ्यासक्रम नजीकच्या भविष्यकाळातील गरजा लक्षात घेऊन तयार केलेला आहे या विधानाशी १६% हिंदी शिक्षक अशंत: असहमत, ४% हिंदी शिक्षक अशंत: सहमत, ८०% हिंदी शिक्षक पूर्णत: सहमत आहेत. इंग्रजी विषयाच्या अभ्यासक्रम नजीकच्या भविष्यकाळातील गरजा लक्षात घेऊन तयार केलेला आहे. या विधानाशी १२% इंग्रजी शिक्षक अंशत: असहमत, ८% इंग्रजी शिक्षक पूर्णत: असहमत, तर ८% इंग्रजी शिक्षक अंशत: सहमत तर ७२% इंग्रजी शिक्षक पूर्णत: सहमत आहेत.

**निष्कर्ष :** यावरून असे दिसून येते की, सन २००६ च्या इ.५वीचा मराठी, हिंदी, इंग्रजी विषयांचा अभ्यासक्रम नजीकच्या भविष्यकाळातील गरजा लक्षात घेऊन तयार केलेला आहे, या विधानाशी जास्तीत जास्त शिक्षक सहमत आहेत.

## सारणी क्र. ४.५२

## बालकांचा सर्वांगिण विकास

| ही उद्दिष्टे बालकाच्या सर्वांगिण विकासास पूरक आहेत. | अंशतः असहमत | | | पूर्णतः असहमत | | | अंशतः सहमत | | | पूर्णतः सहमत | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मराठी | हिंदी | ठंग्रजी | मराठी | हिंदी | इंग्रजी | मराठी | हिंदी | इंग्रजी | मराठी | हिंदी | इंग्रजी |
| | — | ४% | १२% | ८% | १६% | २८% | ३६% | २०% | ४% | ५६% | ६०% | ५६% |

**अर्थनिर्वचन :** वरील सारणी क्र ४.५२ वरून असे दिसून येते की, सन २००६ च्या इ.५वीच्या मराठी भाषेच्या अभ्यासक्रमाची उद्दिष्टे बालकाच्या सर्वांगिण विकासास पूरक आहेत या विधानाशी ८% मराठी शिक्षक पूर्णतः असहमत, ३६% मराठी शिक्षक अशंतः सहमत तर ५६% मराठी शिक्षक पूर्णतः सहमत आहेत. हिंदी विषयाच्या अभ्यासक्रमातील उद्दिष्टे बालकाच्या सर्वांगिण विकासास पूरक आहेत या विधानाशी १२% हिंदी शिक्षक अशंतः असहमत, १६% हिंदी शिक्षक पूर्णतः असहमत, २०% हिंदी शिक्षक अंशतः सहमत तर ६०% शिक्षक पूर्णतः सहमत आहेत. इंग्रजी विषयाच्या अभ्यासक्रमाची उद्दिष्टे बालकाच्या सर्वांगिण विकासास पूरक आहेत. या विधानाशी १२% इंग्रजी शिक्षक अशंतः असहमत, २८% इंग्रजी शिक्षक पूर्णतः असहमत, तर ४% इंग्रजी शिक्षक अंशतः सहमत तर ५६% पूर्णतः सहमत आहेत.

**निष्कर्ष :** यावरून असे दिसून येते की, सन २००६ च्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजी विषयाच्या अभ्यासक्रमाची उद्दिष्टे बालकाच्या सर्वांगिण विकासास पूरक आहेत या विधानाशी जास्तीत जास्त शिक्षक सहमत आहेत.

## सारणी क्र. ४.५३

## विद्यार्थ्यांच्या मानसिकतेचा विचार

| उद्दिष्टे निश्चित करताना विद्यार्थ्यांच्या मानसिकतेचा विचार केला आहे | अंशत: असहमत | | | पूर्णत: असहमत | | | अंशत: सहमत | | | पूर्णत: सहमत | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मराठी | हिंदी | इंग्रजी | मराठी | हिंदी | इंग्रजी | मराठी | हिंदी | इंग्रजी | मराठी | हिंदी | इंग्रजी |
| | — | ४% | २०% | — | ४% | — | २८% | ३२% | ८% | ७२% | ६०% | ७२% |

**अर्थनिर्वचन** : वरील सारणी क्र ४.५३ वरून असे दिसून येते की, सन २००६ च्या इ.५वीच्या मराठी भाषेच्या अभ्यासक्रमाची उद्दिष्टे निश्चित करताना विद्यार्थ्यांच्या मानसिकतेचा विचार केला आहे. या विधानाशी २८% मराठी शिक्षक अंशत: सहमत, तर ७२% मराठी शिक्षक पूर्णत: सहमत आहेत. हिंदी विषयाचा अभ्यासक्रमाची उद्दिष्टे निश्चित करताना विद्यार्थ्यांच्या मानसिकतेचा विचार केला आहे. या विधानाशी ४% हिंदी शिक्षक पूर्णत: असहमत, ४% हिंदी शिक्षक अशंत: असहमत, ३२% हिंदी शिक्षक अंशत: सहमत आहेत. तर ६०% हिंदी शिक्षक पूर्णत: सहमत आहेत. इंग्रजी विषयाच्या अभ्यासक्रमाची उदिदष्टे निश्चित करताना विद्यार्थ्यांच्या मानसिकतेचा विचार केला आहे. या विधानाशी २०% इंग्रजी शिक्षक अंशत: असहमत, ८% इंग्रजी शिक्षक अशंत: सहमत, तर ७२% इंग्रजी शिक्षक पूर्णत: सहमत आहेत.

**निष्कर्ष** : यावरून असे दिसून येते की, सन २००६ च्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजी विषयाच्या अभ्यासक्रमाच्या उद्दिष्टे निश्चित करताना विद्यार्थ्यांच्या मानसिकतेचा विचार केला आहे. या विधानाशी जास्तीत जास्त शिक्षक सहमत आहेत.

## सारणी क्र. ४.५४

## भाषिक क्षमतांचा विचार

| या अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांच्या भाषिक क्षमतांचा/कौशल्यांचा विकास होण्याच्या दृष्टीने उद्दिष्टांची मांडणी केली आहे. | अंशत: असहमत | | | पूर्णत: असहमत | | | अंशत: सहमत | | | पूर्णत: सहमत | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मराठी | हिंदी | इंग्रजी | मराठी | हिंदी | इंग्रजी | मराठी | थ्हंदी | इंग्रजी | मराठी | हिंदी | इंग्रजी |
| | — | ८% | — | ४% | — | — | ४% | १६% | १६% | ९२% | ७६% | ८४% |

**अर्थनिर्वचन :** वरील सारणी क्र ४.५४ वरून असे दिसून येते की, सन २००६ च्या अभ्यासक्रमानुसार इ.५वीच्या मराठी भाषेच्या अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांच्या भाषिक क्षमतांचा/कौशल्यांचा विकास होण्याच्या दृष्टीने उद्दिष्टांची मांडणी केलेली आहे. या विधानाशी ४% मराठी शिक्षक पूर्णत: असहमत, तर ४% मराठी शिक्षक अंशत: सहमत, आणि ९२% मराठी शिक्षक पूर्णत: सहमत आहेत. हिंदी विषयाचा अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांच्या भाषिक क्षमतांचा/कौशल्यांचा विकास होण्याच्या दृष्टीने उद्दिष्टांची मांडणी केलेली आहे.या विधानाशी ८% हिंदी शिक्षक अंशत: असहमत, १६% हिंदी शिक्षक अशंत: सहमत, ७६% हिंदी शिक्षक पूर्णत: सहमत आहेत. इंग्रजी विषयाच्या अभ्यासक्रमात भाषिक क्षमतांचा/कौशल्यांचा विकास होण्याच्या दृष्टीने उद्दिष्टांची मांडणी केलेली आहे. या विधानाशी १८% इंग्रजी शिक्षक अंशत: सहमत, ८४% इंग्रजी शिक्षक पूर्णत: सहमत आहेत.

**निष्कर्ष :** यावरून असे दिसून येते की, सन २००६ च्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजी विषयाच्या अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांच्या भाषिक क्षमतांचा/कौशल्यांचा विकास होण्याच्या दृष्टीने उद्दिष्टांची मांडणी केलेली आहे. या विधानाशी जास्तीत जास्त शिक्षक सहमत आहेत.

## सारणी क्र. ४.५५

## विद्यार्थी विकास स्तर

| अभ्यासक्रमातील आशय विद्यार्थी विकासस्तरानुसार आहे. | अंशत: असहमत | | | पूर्णत: असहमत | | | अंशत: सहमत | | | पूर्णत: सहमत | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मराठी | हिंदी | इंग्रजी | मराठी | हिंदी | इंग्रजी | मराठी | हिंदी | इंग्रजी | मराठी | हिंदी | इंग्रजी |
| | ४% | ८% | १२% | २४% | ८% | १६% | — | २४% | — | ७२% | ६०% | ७२% |

**अर्थनिर्वचन :** वरील सारणी क्र ४.५५ वरून असे दिसून येते की, सन २००६ च्या इ.५वीच्या मराठीच्या अभ्यासक्रमातील आशय विद्यार्थी विकास्तरानुसार आहे. या विधानाशी ४% मराठी शिक्षक अंशत: असहमत, तर २४% मराठी शिक्षक पूर्णत: असहमत आहेत, तर ७२% शिक्षक पूर्णत: सहमत आहेत. हिंदी विषयाचा अभ्यासक्रमातील आशय विद्यार्थी विकास्तरानुसार आहे. या विधानाशी ८% हिंदी शिक्षक अंशत: असहमत, ८% हिंदी शिक्षक पूर्णत: असहमत, २४% हिंदी शिक्षक अंशत: असहमत तर ६०% हिंदी शिक्षक पूर्णत: सहमत आहेत. तसेच इंग्रजी विषयाच्या अभ्यासक्रमातील आशय विद्यार्थी विकास्तरानुसार आहे. या विधानाशी १२% इंग्रजी शिक्षक अंशत: असहमत, १६% इंग्रजी शिक्षक पूर्णत: असहमत, तर ७२% इंग्रजी शिक्षक पूर्णत: सहमत आहेत.

**निष्कर्ष :** यावरून असे दिसून येते की, सन २००६ च्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजी विषयाच्या अभ्यासक्रमातील आशय विद्यार्थी विकास्तरानुसार आहे. या विधानाशी जास्तीत जास्त शिक्षक पूर्णत: सहमत आहेत.

## सारणी क्र. ४.५६

## विविधता व लवचिकता

| या अभ्यासक्रमातील आशयामध्ये विविधता व लवचिकता आहे. | अंशतः असहमत | | | पूर्णतः असहमत | | | अंशतः सहमत | | | पूर्णतः सहमत | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मराठी | हिंदी | इंग्रजी | मराठी | हिंदी | इंग्रजी | मराठी | हिंदी | इंग्रजी | मराठी | हिंदी | इंग्रजी |
| | — | — | — | ४% | ४% | — | १६% | २०% | १६% | ८०% | ७६% | ८४% |

**अर्थनिर्वचन :** वरील सारणी क्र ४.५६ वरून असे दिसून येते की, सन २००६ च्या इ.५वीच्या मराठीच्या अभ्यासक्रमातील आशयमध्ये विविधता व लवचिकता आहे. या विधानाशी ४% मराठी शिक्षक पूर्णतः असहमत, तर १६% मराठी शिक्षक अंशतः सहमत, तर ८०% मराठी शिक्षक पूर्णतः सहमत आहेत. हिंदी विषयाच्या अभ्यासक्रमातील आशयमध्ये विविधता व लवचिकता आहे. या विधानाशी ४% हिंदी शिक्षक पूर्णतः असहमत, २०% हिंदी शिक्षक अंशतः सहमत, ७६% हिंदी शिक्षक पूर्णतः सहमत आहेत. तसेच इंग्रजी विषयाच्या अभ्यासक्रमातील आशयामध्ये विविधता व लवचिकता आहे. या विधानाशी १६% इंग्रजी शिक्षक अंशतः सहमत, तर ८४% इंग्रजी शिक्षक पूर्णतः सहमत आहेत.

**निष्कर्ष :** यावरून असे दिसून येते की, सन २००६ च्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजी विषयाच्या अभ्यासक्रमातील आशयामध्ये विविधता व लवचिकता आहे. या विधानाशी जास्तीत जास्त शिक्षक पूर्णतः सहमत आहेत.

## सारणी क्र. ४.५७

## गुणवत्तेवर भर

| हा अभ्यासक्रम संख्येपेक्षा गुणवत्तेवर भर देणारा आहे. | अंशत: असहमत | | | पूर्णत: असहमत | | | अंशत: सहमत | | | पूर्णत: सहमत | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मराठी | हिंदी | इंग्रजी | मराठी | हिंदी | इंग्रजी | मराठी | हिंदी | इंग्रजी | मराठी | हिंदी | इंग्रजी |
| | — | — | १२% | ४% | ६४% | ४% | २४% | २०% | १६% | ७२% | ४% | ६८% |

**अर्थनिर्वचन :** वरील सारणी क्र ४.५७ वरून असे दिसून येते की, सन २००६ च्या इ.५वीचा मराठीचा अभ्यासक्रम संख्येपेक्षा गुणवत्तेवर आधारित आहे.या विधानाशी ४% मराठी शिक्षक पूर्णत: असहमत, तर २४% मराठी शिक्षक अंशत: सहमत, तर ७२% मराठी शिक्षक पूर्णत: सहमत आहेत. हिंदी विषयाचा अभ्यासक्रम संख्येपेक्षा गुणवत्तेवर आधारित आहे. या विधानाशी ६४% हिंदी शिक्षक पूर्णत: असहमत, २०% हिंदी शिक्षक अंशत: सहमत, तर ४% हिंदी शिक्षक पूर्णत: सहमत आहेत. तसेच इंग्रजी विषयाचा अभ्यासक्रम संख्येपेक्षा गुणवत्तेवर आधारित आहे. या विधानाशी १२% इंग्रजी शिक्षक अंशत: असहमत, ४% इंग्रजी शिक्षक पूर्णत: असहमत, १६% इंग्रजी शिक्षक अशंत: सहमत आहेत तर ६८% इंग्रजी शिक्षक पूर्णत: सहमत आहेत .

**निष्कर्ष :** यावरून असे दिसून येते की, सन २००६ च्या इ.५वीच्या मराठी, इंग्रजी विषयांचा अभ्यासक्रम संख्येपेक्षा गुणवत्तेवर आधारित आहे. या विधानाशी जास्तीत जास्त शिक्षक पूर्णत: सहमत आहेत. तर हिंदीचा अभ्यासक्रम हा संख्येवर आधारित आहे, घटकांची संख्या कमी करून गुणवत्ता वाढवण्यास वाव आहे, असे मत जास्तीत—जास्त शिक्षकांनी व्यक्त केले आहे.

## सारणी क्र. ४.५८

## राष्ट्रीयमूल्ये व गाभाभूत घटक

| अभ्यासक्रमामध्ये राष्ट्रीय मूल्ये व गाभाभूत घटकांवर आधारित आशयाचा समावेश केलेला आहे. | अंशतः असहमत | | | पूर्णतः असहमत | | | अंशतः सहमत | | | पूर्णतः सहमत | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मराठी | हिंदी | इंग्रजी | मराठी | हिंदी | इंग्रजी | मराठी | हिंदी | इंग्रजी | मराठी | हिंदी | इंग्रजी |
| | — | ८% | १२% | १६% | ४% | १२% | ३६% | २८% | २४% | ४८% | ६०% | ५२% |

### अर्थनिर्वचन :

वरील सारणी क्र ४.५८ वरून असे दिसून येते की, सन २००६ च्या इ.५वीच्या मराठीच्या अभ्यासक्रमामध्ये राष्ट्रीयमूल्ये व गाभाभूत घटकांवर आधारित आशयाचा समावेश केलेला आहे. या विधानाशी १६% मराठी शिक्षक पूर्णतः असहमत, ३६% मराठी शिक्षक अंशतः असहमत, तर ४८% मराठी शिक्षक पूर्णतः सहमत आहेत.

हिंदी विषयाच्या अभ्यासक्रमामध्ये राष्ट्रीयमूल्ये व गाभाभूत घटकांवर आधारित आशयाचा समावेश केलेला आहे. या विधानाशी ८% हिंदी शिक्षक अंशतः असहमत, ४% हिंदी शिक्षक पूर्णतः असहमत, २८% हिंदी शिक्षक अंशतः सहमत तर ६०% हिंदी शिक्षक पूर्णतः सहमत आहेत.

तसेच इंग्रजी विषयाच्या अभ्यासक्रमामध्ये राष्ट्रीयमूल्ये व गाभाभूत घटकांवर आधारित आशयाचा समावेश केलेला आहे. या विधानाशी १२% इंग्रजी शिक्षक अंशतः असहमत, १२% इंग्रजी शिक्षक पूर्णतः असहमत, २४% इंग्रजी शिक्षक अंशतः सहमत, ५२% इंग्रजी शिक्षक पूर्णतः सहमत आहेत.

**निष्कर्ष :**

यावरून असे दिसून येते की, सन २००६ च्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजी विषयांच्या अभ्यासक्रमामध्ये राष्ट्रीयमूल्ये व गाभाभूत घटकांवर आधारित आशयाचा समावेश केलेला आहे. या विधानाशी जास्तीत जास्त शिक्षक पूर्णतः सहमत आहेत.

## सारणी क्र. ४.५९

## व्यावसायिक शिक्षण

| अभ्यासक्रम व्यावसायिक शिक्षणावर आधारित आशयाचा समावेश केलेला आहे | अंशतः असहमत | | | पूर्णतः असहमत | | | अंशतः सहमत | | | पूर्णतः सहमत | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मराठी | हिंदी | इंग्रजी | मराठी | हिंदी | इंग्रजी | मराठी | हिंदी | इंग्रजी | मराठी | हिंदी | इंग्रजी |
| | १६% | — | ८% | ४८% | ५६% | ४४% | २०% | १२% | १२% | १६% | ३२% | ३६% |

अर्थनिर्वचन :

वरील सारणी क्र ४.५९ वरून असे दिसून येते की, सन २००६ च्या इ.५वीच्या मराठीच्या अभ्यासक्रमामध्ये व्यावसायिक शिक्षणावर आधारित आशयाचा समावेश केलेला आहे. या विधानाशी १६% मराठी शिक्षक अंशतः असहमत, ४८% मराठी शिक्षक पूर्णतः असहमत, २०% मराठी शिक्षक अंशतः सहमत तर १६% मराठी शिक्षक पूर्णतः सहमत आहेत.

हिंदी विषयाच्या अभ्यासक्रमामध्ये व्यावसायिक शिक्षणावर आधारित आशयाचा समावेश केलेला आहे. या विधानाशी १२% हिंदी शिक्षक अंशतः सहमत, ३२% हिंदी शिक्षक पूर्णतः सहमत, तर ५६% हिंदी शिक्षक पूर्णतः असहमत आहेत.

इंग्रजी विषयाच्या अभ्यासक्रमामध्ये व्यावसायिक शिक्षणावर आधारित आशयाचा समावेश केलेला आहे. या विधानाशी ८% इंग्रजी शिक्षक अंशतः असहमत, ४४% इंग्रजी शिक्षक पूर्णतः असहमत, १२% इंग्रजी शिक्षक अशंतः सहमत, तर ३६% इंग्रजी शिक्षक पूर्णतः सहमत आहेत .

निष्कर्ष :

यावरून असे दिसून येते की, सन २००६ च्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजी विषयाच्या अभ्यासक्रमामध्ये व्यावसायिक शिक्षणावर आधारित आशयाचा समावेश केलेला आहे. या विधानाशी जास्तीत जास्त शिक्षक पूर्णतः असहमत आहेत.

## सारणी क्र. ४.६०

## क्रमबद्धतेचा विचार

| अभ्यासक्रमातील आशयामध्ये क्रमबद्धतेचा विचार केलेला आहे. | अंशतः असहमत | | | पूर्णतः असहमत | | | अंशतः सहमत | | | पूर्णतः सहमत | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मराठी | हिंदी | इंग्रजी | मराठी | हिंदी | इंग्रजी | मराठी | हिंदी | इंग्रजी | मराठी | हिंदी | इंग्रजी |
| | १२% | — | १२% | ८% | १६% | १२% | २८% | २०% | २८% | ५२% | ६४% | ४८% |

**अर्थनिर्वचन :** वरील सारणी क्र ४.६० वरून असे दिसून येते की, सन २००६ च्या इ.५वीच्या मराठीच्या अभ्यासक्रमामध्ये आशयामध्ये क्रमबद्धेतेचा विचार केलेला आहे. या विधानाशी १२% मराठी शिक्षक अंशतः असहमत, तर ८% मराठी शिक्षक पूर्णतः असहमत, २८% मराठी शिक्षक अंशतः सहमत तर ५२% मराठी शिक्षक पूर्णतः सहमत आहेत. हिंदी विषयाच्या अभ्यासक्रमामध्ये आशयामध्ये क्रमबद्धेतेचा विचार केलेला आहे. या विधानाशी १६% हिंदी शिक्षक पूर्णतः असहमत, २०% हिंदी शिक्षक अंशतः सहमत, तर ६४% हिंदी शिक्षक पूर्णतः सहमत आहेत. तसेच इंग्रजी विषयाच्या अभ्यासक्रमामध्ये आशयामध्ये क्रमबद्धेतेचा विचार केलेला आहे. या विधानाशी १२% इंग्रजी शिक्षक अंशतः असहमत, १२% इंग्रजी शिक्षक पूर्णतः असहमत, २८% इंग्रजी शिक्षक अशंतः सहमत आहेत तर ४८% इंग्रजी शिक्षक पूर्णतः सहमत आहेत .

**निष्कर्ष :** यावरून असे दिसून येते की, सन २००६ च्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजी विषयांच्या अभ्यासक्रमामध्ये आशयामध्ये क्रमबद्धेतेचा विचार केलेला आहे. या विधानाशी जास्तीत जास्त शिक्षक पूर्णतः सहमत आहेत.

## सारणी क्र. ४.६१

## संस्कृतीचे संरक्षण, संवर्धन व सुधारणांना प्रोत्साहन

| हा अभ्यासक्रम संस्कृतीचे संरक्षण, संवर्धन व सुधारणांना प्रोत्साहन देणारा आहे. | अंशत: असहमत | | | पूर्णत: असहमत | | | अंशत: सहमत | | | पूर्णत: सहमत | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मराठी | हिंदी | इंग्रजी | मराठी | हिंदी | इंग्रजी | मराठी | हिंदी | इंग्रजी | मराठी | हिंदी | इंग्रजी |
| | — | ४% | — | — | १६% | — | १६% | १२% | २८% | ८४% | ६८% | ७२% |

**अर्थनिर्वचन :** वरील सारणी क्र ४.६१ वरून असे दिसून येते की, सन २००६ च्या इ.५वीच्या मराठीच्या अभ्यासक्रमामध्ये भारतीय संस्कृतीचे संरक्षण, सवंर्धन व सुधारणांना प्रोत्साहन देणारा आशय आहे. या विधानाशी १६% मराठी शिक्षक अंशत: सहमत, तर ८४% मराठी शिक्षक पूर्णत: सहमत आहेत. हिंदी विषयाच्या अभ्यासक्रमामध्ये भारतीय संस्कृतीचे संरक्षण, सवंर्धन व सुधारणांना प्रोत्साहन देणारा आशय आहे. या विधानाशी ४% हिंदी शिक्षक अंशत: असहमत, १६% हिंदी शिक्षक पूर्णत: असहमत, १२% हिंदी शिक्षक अंशत: सहमत, तर ६८% हिंदी शिक्षक पूर्णत: सहमत आहेत. तसेच इंग्रजी विषयाच्या अभ्यासक्रमामध्ये भारतीय संस्कृतीचे संरक्षण, सवंर्धन व सुधारणांना प्रोत्साहन देणारा आशय आहे. या विधानाशी २८% इंग्रजी शिक्षक अंशत: सहमत, ७२% इंग्रजी शिक्षक पूर्णत: सहमत आहेत .

**निष्कर्ष :** यावरून असे दिसून येते की, सन २००६ च्या अभ्यासक्रमानुसार इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजी विषयांच्या अभ्यासक्रमामध्ये भारतीय संस्कृतीचे संरक्षण, सवंर्धन व सुधारणांना प्रोत्साहन देणारा आशय आहे. या विधानाशी जास्तीत जास्त शिक्षक पूर्णत: सहमत आहेत.

## सारणी क्र. ४.६२

## माहिती तंत्रज्ञान

| या अभ्यासक्रमामध्ये माहिती तंत्रज्ञानावर आधारित आशयाचा समावेश केलेला आहे. | अंशतः असहमत | | | पूर्णतः असहमत | | | अंशतः सहमत | | | पूर्णतः सहमत | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मराठी | हिंदी | इंग्रजी | मराठी | हिंदी | इंग्रजी | मराठी | हिंदी | इंग्रजी | मराठी | हिंदी | इंग्रजी |
| | ८% | २०% | ८% | १२% | — | — | २०% | — | १६% | ५६% | ८०% | ७६% |

**अर्थनिर्वचन :** वरील सारणी क्र ४.६२ वरून असे दिसून येते की, सन २००६ च्या अभ्यासक्रमानुसार इ.५वीच्या मराठीच्या अभ्यासक्रमामध्ये माहिती तंत्रज्ञानावर आधारित आशयाचा समावेश केलेला आहे. या विधानाशी ८% मराठी शिक्षक अंशतः असहमत, १२% मराठी शिक्षक पूर्णतः असहमत, २०% मराठी शिक्षक अंशतः सहमत, ५६% मराठी शिक्षक पूर्णतः सहमत आहेत. हिंदी विषयाच्या अभ्यासक्रमामध्ये माहिती तंत्रज्ञानावर आधारित आशयाचा समावेश केलेला आहे. या विधानाशी २०% हिंदी शिक्षक अंशतः असहमत, ८०% हिंदी शिक्षक पूर्णतः सहमत आहेत. तसेच इंग्रजी विषयाच्या अभ्यासक्रमामध्ये माहिती तंत्रज्ञानावर आधारित आशयाचा समावेश केलेला आहे.या विधानाशी ८% इंग्रजी शिक्षक अंशतः असहमत, १६% इंग्रजी शिक्षक अंशतः सहमत, ७६% इंग्रजी शिक्षक पूर्णतः सहमत आहेत

**निष्कर्ष :** यावरून असे दिसून येते की, सन २००६ च्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजी विषयांच्या अभ्यासक्रमामध्ये माहिती तंत्रज्ञानावर आधारित आशयाचा समावेश केलेला आहे. या विधानाशी जास्तीत जास्त शिक्षक पूर्णतः सहमत आहेत.

## सारणी क्र. ४.६३

## उपयुक्तता

| या अभ्यासक्रमामध्ये व्यक्ती, कुटुंब, समाज व राष्ट्र यांना उपयोगी पडणारा आशय दिलेला आहे | अंशतः असहमत | | | पूर्णतः असहमत | | | अंशतः सहमत | | | पूर्णतः सहमत | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मराठी | हिंदी | इंग्रजी | मराठी | हिंदी | इंग्रजी | मराठी | हिंदी | इंग्रजी | मराठी | हिंदी | इंग्रजी |
| | ८% | ४% | — | — | ४% | — | १२% | २०% | ३२% | ८०% | ७२% | ६८% |

**अर्थनिर्वचन :**

वरील सारणी क्र ४.६३ वरून असे दिसून येते की, सन २००६ च्या इ.५वीच्या मराठीच्या अभ्यासक्रमामध्ये व्यक्ती, कुटुंब, समाज व राष्ट्र यांना उपयोगी पडणारा आशय दिलेला आहे. या विधानाशी ८% मराठी शिक्षक अंशतः असहमत, १२% मराठी शिक्षक अंशतः सहमत, ८०% मराठी शिक्षक पूर्णतः सहमत आहेत.

हिंदी विषयाच्या अभ्यासक्रमामध्ये व्यक्ती, कुटुंब, समाज व राष्ट्र यांना उपयोगी पडणारा आशय दिलेला आहे. या विधानाशी ४% हिंदी शिक्षक अंशतः असहमत, ४% हिंदी शिक्षक पूर्णतः असहमत, २०% अशंतः सहमत, ७२% हिंदी शिक्षक

पूर्णतः सहमत आहेत. तसेच इंग्रजी विषयाच्या अभ्यासक्रमामध्ये व्यक्ती, कुटुंब, समाज व राष्ट्र यांना उपयोगी पडणारा आशय दिलेला आहे.या विधानाशी ३२% इंग्रजी शिक्षक अंशतः सहमत, ६८% इंग्रजी शिक्षक पूर्णतः सहमत आहेत.

**निष्कर्ष :**

यावरून असे दिसून येते की, सन २००६ च्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजी विषयांच्या अभ्यासक्रमामध्ये यक्ती, कुटुंब, समाज व राष्ट्र यांना उपयोगी पडणारा आशय दिलेला आहे. या विधानाशी जास्तीत जास्त शिक्षक पूर्णतः सहमत आहेत.

## सारणी क्र. ४.६४

## जागतिकीकरण, खाजगीकरण व उदारीकरण

| या अभ्यासक्रमामध्ये तागतिकीकरण, खाजगीकरण व उदारीकरणावर भर देणारा आशय आहे. | अंशतः असहमत | | | पूर्णतः असहमत | | | अंशतः सहमत | | | पूर्णतः सहमत | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मराठी | हिंदी | इंग्रजी | मराठी | हिंदी | इंग्रजी | मराठी | हिंदी | इंग्रजी | मराठी | हिंदी | इंग्रजी |
| | १२% | — | ८% | २०% | ४८% | ८% | ४०% | १६% | १२% | २८% | ३६% | ७२% |

### अर्थनिर्वचन :

वरील सारणी क्र ४.६४ वरून असे दिसून येते की, सन २००६ च्या अभ्यासक्रमानुसार इ.५वीच्या मराठीच्या अभ्यासक्रमामध्ये जागतिकीकरण, खाजगीकरण व उदारीकरणावर भर देणारा आशय आहे. या विधानाशी १२% मराठी शिक्षक अंशतः असहमत, २०% मराठी शिक्षक पूर्णतः असहमत, ४०% मराठी शिक्षक अंशतः सहमत, तर २८% मराठी शिक्षक पूर्णतः सहमत आहेत.

हिंदी विषयाच्या अभ्यासक्रमामध्ये जागतिकीकरण, खाजगीकरण व उदारीकरणावर भर देणारा आशय आहे. या विधानाशी ४८% हिंदी शिक्षक पूर्णतः असहमत, १६% हिंदी शिक्षक अंशतः सहमत, तर ३३% हिंदी शिक्षक पूर्णतः सहमत आहेत.

तसेच इंग्रजी विषयाच्या अभ्यासक्रमामध्ये जागतिकीकरण, खाजगीकरण व उदारीकरणावर भर देणारा आशय आहे. या विधानाशी ८% इंग्रजी शिक्षक अंशतः असहमत, ८% इंग्रजी शिक्षक पूर्णतः असहमत, १२% इंग्रजी शिक्षक अंशतः सहमत, ७२% इंग्रजी शिक्षक पूर्णतः सहमत आहेत

### निष्कर्ष :

यावरून असे दिसून येते की, सन २००६ च्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजी विषयांच्या अभ्यासक्रमामध्ये जागतिकीकरण, खाजगीकरण व उदारीकरणावर भर देणारा आशय आहे. या विधानाशी जास्तीत जास्त शिक्षक पूर्णतः असहमत आहेत. हिंदी बाबतीत जास्त शिक्षक पूर्णतः असहमत, तर इंग्रजी बाबबीत जास्त शिक्षक पूर्णतः सहमत आहेत.

## क) उपक्रम :— सारणी क्र. ४.६५

## सर्जनशीलता व कृतीशिलतेला वाव देणारे उपक्रम

| विद्यार्थ्यांच्या कृतीशिलतेला वाव देणाऱ्या उपक्रमांचा समावेश या अभ्यासक्रमात आहे | अंशतः असहमत | | | पूर्णतः असहमत | | | अंशतः सहमत | | | पूर्णतः सहमत | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मराठी | हिंदी | इंग्रजी | मराठी | हिंदी | इंग्रजी | मराठी | हिंदी | इंग्रजी | मराठी | हिंदी | इंग्रजी |
| | — | — | — | — | — | — | — | — | — | १००% | १००% | १००% |

अर्थनिर्वचन :

| या पाठ्यपुस्तकांमध्ये आरोग्य शिक्षणाचा विचार झालेला आहे. | अंशतः असहमत | | | पूर्णतः असहमत | | | अंशतः सहमत | | | पूर्णतः सहमत | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मराठी | हिंदी | इंग्रजी | मराठी | हिंदी | इंग्रजी | मराठी | हिंदी | इंग्रजी | मराठी | हिंदी | इंग्रजी |
| | १२% | १२% | — | ४८% | १२% | २४% | — | १२% | — | ४०% | ६४% | ७६% |

**अर्थनिर्वचन :** वरील सारणी क्र ४.१०५ नुसार सन २००६ च्या इ.५वीच्या मराठीच्या पाठ्यपुस्तकामध्ये आरोग्यशिक्षणाचा विचार केलेला आहे. या विधानाशी १२% मराठी शिक्षक अंशतः असहमत, ४८% मराठी शिक्षक पूर्णतः असहमत तर ४०% मराठी शिक्षक पूर्णतः सहमत आहेत. तसेच इ.५वीच्या हिंदीच्या पाठ्यपुस्तकामंध्ये आरोग्यशिक्षणाचा विचार केलेला आहे. या विधानाशी १२% हिंदी शिक्षक अंशतः असहमत, १२% हिंदी शिक्षक पूर्णतः असहमत, ६४% हिंदी शिक्षक पूर्णतः सहमत आहेत. तसेच इ. ५वीच्या इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकामध्ये आरोग्यशिक्षणाचा विचार केलेला आहे. या विधानाशी २४% इंग्रजी शिक्षक पूर्णतः असहमत तर ७६% इंग्रजी शिक्षक पूर्णतः सहमत आहेत.

**निष्कर्ष :** यावरून असे दिसून येते की सन २००६ च्या इ.५वीच्या मराठी पाठ्यपुस्तकामध्ये आरोग्यशिक्षणाचा विचार केलेला आहे. या विधानाशी जास्तीत जास्त शिक्षक पूर्णतः असहमत आहेत. तर हिंदी व इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकातील आरोग्य शिक्षणाबाबत अधिक शिक्षक पूर्णतः सहमत आहेत. असे असले तरी बऱ्याच शिक्षकांच्या मते या पाठ्यपुस्तकांमध्ये आरोग्य शिक्षणाचा विचार होणे आवश्यक आहे.

## सारणी क्र. ४.१०६

## पर्यावरण शिक्षण

| या पाठ्यपुस्तकांमध्ये पर्यावरण शिक्षणाचा विचार झालेला आहे. | अंशत: असहमत | | | पूर्णत: असहमत | | | अंशत: सहमत | | | पूर्णत: सहमत | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मराठी | हिंदी | ठंग्रजी | मराठी | हिंदी | इंग्रजी | मराठी | हिंदी | इंग्रजी | मराठी | हिंदी | इंग्रजी |
| | — | — | — | — | — | — | — | — | — | १००% | १००% | १००% |

**अर्थनिर्वचन :** वरील सारणी क्र ४.१०६ नुसार सन २००६ च्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकांमध्ये पर्यावरण शिक्षणाचा विचार झालेला आहे. या विधानाशी अनुक्रमे १००% मराठी शिक्षक, १००% हिंदी शिक्षक व १००% इंग्रजी शिक्षक पूर्णत: सहमत आहेत.

**निष्कर्ष :** यावरून असे दिसून येते की सन २००६ च्या इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकामध्ये पर्यावरण शिक्षणाचा विचार झालेला आहे. या विधानाशी जास्तीत जास्त शिक्षक पूर्णत: सहमत आहेत

## विभाग ड

### सन २००६चा प्राथमिक स्तरावरील अभ्यासक्रम व त्यानुसार तयार झालेले इ. ५वीचे मराठी भाषेचे पाठ्यपुस्तक यांच्यातील सहसंबंध

संशोधिकेने सन २००६च्या पुनर्रचित अभ्यासक्रमानुसार भाषा विषयांच्या (पाठ्यक्रमामध्ये) मांडलेल्या उदिदष्टांचे प्रतिबिंब पाठ्यपुस्तकांमध्ये आहे का यांचा शोध घेतला. त्याचे विवेचन पुढीलप्रमाणे केले आहे.

१) सन २००६ चा इ. ५वीचा अभ्यासक्रम व त्यानुसार तयार झालेले इ.५वीचे मराठी चे पाठ्यपुस्तक यांच्यातील सहसंबंध.(उद्दिष्टांनुसार)

सारणी क्र. ४.१०७

| क्षेत्र – १ श्रवण उद्दिष्टे | पाठ्यपुस्तकातील समाविष्ट भाग |
|---|---|
| १. एकाग्रतेने भाषण–संभाषण, संवाद इ. ऐकता येणे.<br>२. समजपूर्वक ऐकता येणे.<br>३. पाठ्यमजकूर समजपूर्वक ऐकता येणे. | या उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी पाठ्यपुस्तकात जाणीवपूर्वकगद्य व पद्य मजकूर दिलेला आहे. पृष्ठ क्र. १, २, ४, ५, ७, ९, १०, २५, ४६, ४७, ७१, ९४, ९५, ११९, १२०, १२३, १२४, १२५ इ. पृष्ठांवर गाणी व मजकूर दिलेला आहे. या बरोबरच या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी सर्व गद्यपाठांचा उपयोग करता येईल. विद्यार्थ्यांची श्रवण कौशल्याची क्षमता वाढविण्यासाठी, विकास करण्यासाठी या गोष्टी करणे आवश्यक आहे. विकासाच्या दिशेने आपण बरोबर जातो की नाही हे अजमावून पाहणे ही आवश्यक आहे. त्यासाठी अधून–मधून विद्यार्थ्यांना प्रश्न विचारणे अपेक्षित आहे. |

निरीक्षण :

वरील सारणी क्र. ४.१०७ नुसार इ.५वीच्या मराठी भाषेच्या अभ्यासक्रमामध्ये श्रवण कौशल्याच्या अंतर्गत दिलेल्या उद्दिष्टांची पुर्तता व्हावी, यादृष्टीने पाठ्यपुस्तकात विविध गद्य–पद्य पाठांचा समावेश केलेला आहे.

अर्थनिर्वचन :

वरील सारणी क्र. ४.१०७ नुसार इ.५वीच्या मराठी भाषेच्या अभ्यासक्रमामध्ये श्रवण कौशल्याअंतर्गत दिलेल्या उद्दिष्टांची पूर्तता व्हावी म्हणून १४% पृष्ठांवर विविध प्रकारच्या गाणी व पद्यपाठांचा समावेश केलेला आहे. तसेच १००% गद्यपाठांमधूनही या कौशल्याचा विकास करणे अपेक्षित आहे.

निष्कर्ष :

यावरून असे दिसून येते की, इ.५वीच्या मराठी भाषेच्या अभ्यासक्रमातील श्रवण कौशल्यांतर्गत येणाऱ्या उद्दिष्टांची पूर्तता व्हावी यासाठी पाठ्यपुस्तकामध्ये विविध गद्य–पद्य पाठांचा समावेश केलेला आहे.

## सारणी क्र. ४.१०८

| क्षेत्र – २ भाषण संभाषण उद्दिष्टे | पाठ्यपुस्तकातील समाविष्ट भाग |
|---|---|
| १. कविता, समूहगीते/स्फूर्तिगीते म्हणता येणे.<br>२. ऐकलेली/वाचलेली माहिती सांगता येणे.<br>३. ऐकलेल्या/वाचलेल्या मजकुरातील सर्वसाधारण आशय सांगता येणे.<br>४. न अडखळता, सहजपणे, आत्मविश्वासपूर्वक व मुद्देसूद बोलता येणे.<br>५. विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देणे.<br>६. स्वत:हुन प्रश्न विचारणे.<br>७. लहान, मोठ्या वडीलधारी व्यक्तींशी बोलताना उचित शब्दांचा वापर करणे. | पृष्ठ क्र. ६ वर भाषण–संभाषणासाठी एक मजकूर दिलेला आहे. तो पाठ्यपुस्तकात दिलेल्या सूचनेनुसार विद्यार्थ्यांकडून करवून घेणे अपेक्षित आहे. अशाचप्रकारे इतरही आणखी काही उतारे, मजकूर देऊन वर्गामध्ये भाषण–संभाषण घडवून आणणे अपेक्षित आहे. त्याचप्रमाणे या कौशल्याचा विकास व्हावा याकडे शिक्षकांनी लक्ष देणे, मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. ज्याठिकाणी विद्यार्थ्यांची चूक होते, तिथे त्याचवेळी दुरूस्त करावे, समजावून सांगावे हे कौशल्य वाढविण्यासाठी काही गद्यपाठांचाही उपयोग करता येईल. |

### निरीक्षण :

वरील सारणी क्र. ४.१०८ नुसार इ. ५वीच्या मराठीच्या अभ्यासक्रमातील भाषण–संभाषण या क्षेत्रांतर्गत दिलेल्या उद्दिष्टांची पूर्तता व्हावी म्हणून पाठ्यपुस्तकात फारसे प्रयत्न दिसून येत नाहीत. काही गद्यपाठांचा आधार घेऊन शिक्षकांनी स्वत:च्या प्रयत्नांनी या कौशल्याचा विकास करणे अपेक्षित आहे.

### अर्थनिर्वचन :

वरील सारणी क्र. ४.१०८ नुसार इ. ५वीच्या मराठीच्या अभ्यासक्रमातील भाषण–संभाषण कौशल्यांच्या अंतर्गत दिलेली उद्दिष्टे साध्य व्हावीत यासाठी फक्त ४% पृष्ठांवर स्वतंत्र मजकूर दिलेले आहेत.

निष्कर्ष :

यावरून असे दिसून येते की, इ. ५वीच्या मराठीच्या अभ्यासक्रमातील भाषण–संभाषण कौशल्यांतर्गत येणारी उद्दिष्टे साध्य करण्यासाठी पाठ्यपुस्तकातून अतिशय कमी मजकूर दिलेला आहे. तसेच शिक्षकांनी अशाचप्रकारचे मजकूर तयार करून विद्यार्थ्यांच्या भाषण–संभाषण कौशल्यांचा विकास करावा असे अपेक्षित आहे.

सारणी क्र. ४.१०९

| क्षेत्र – ३ वाचन उद्दिष्टे | पाठ्यपुस्तकातील समाविष्ट भाग |
|---|---|
| १. परिसरातील मजकूर समजपूर्वक वाचता येणे.<br>२. छापील हस्तलिखित मजकूराचे प्रकट वाचन प्रभावीपणे करता येणे.<br>३. नवीन शब्दांचा अर्थ समजून वाचन करता येणे.<br>४. समजपूर्वक व एकाग्रतेने मूक वाचन करता येणे. | विद्यार्थ्यांचे वाचन कौशल्य विकसित व्हा तसेच वाचन कौशल्याच्या अंतर्गत येणा उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी पाठ्यपुस्तकात पृ क्र. ३, ७, १३, ८३, १०८ वर जाणीवपूर्व मजकूर दिलेला आहे. व मजकूराखा विद्यार्थ्यांकडून हे कौशल्य शिक्षकांनी क विकसित करावे यासाठी काही सूचना दिलेल आहेत. याबरोबरच शिक्षकांनी असेच का मजकूर तयार करावेत, त्याचे वर्गात प्रकटवाच मूकवाचन करावे, पाठ्यपुस्तकातील सूचनेप्रमा हे कौशल्य विकसित करण्याचा प्रयत्न करा असे अपेक्षित आहे. |

निरीक्षण :

वरील सारणी क्र. ४.१०९ नुसार इ.५वीच्या मराठीच्या अभ्यासक्रमातील ‘वाचन’ या क्षेत्रांतर्गत दिलेल्या उद्दिष्टांची पूर्तता व्हावी म्हणून पाठ्यपुस्तकात

पुरेसे प्रयत्न झालेले आहेत. त्यासाठी काही मजकूर स्वतंत्रपणे दिलेले आहेत. याशिवाय सर्व गद्यपाठांचा उपयोग करून या कौशल्यांचा विकास करता येतो.

अर्थनिर्वचन :

वरील सारणी क्र. ४.१०९ नुसार इ.५वीच्या मराठीच्या अभ्यासक्रमातील 'वाचन' कौशल्याच्या अंतर्गत येणारी उद्दिष्टे साध्य व्हावीत, यासाठी पाठ्यपुस्तकातील ५% पृष्ठांवर जाणीवपूर्वक कांही मजकूर दिलेले आहेत.

निष्कर्ष :

यावरून असे दिसून येते की, इ.५वीच्या मराठीच्या अभ्यासक्रमातील 'वाचन' या कौशल्यांतर्गत येणारी उद्दिष्टे पूर्ण व्हावीत यासाठी पाठ्यपुस्तकातून पुरेसे प्रयत्न झालेले आहेत.

सारणी क्र. ४.११०

| क्षेत्र – ४ लेखन उद्दिष्टे | पाठ्यपुस्तकातील समाविष्ट भाग |
|---|---|
| १. अचूक अनुलेखन करता येणे.<br>२. शब्द व वाक्ये यांचे श्रुतलेखन करता येणे.<br>३. ऐकून/वाचून प्रश्नांची उत्तरे लिहिता येणे.<br>४. शब्द, वाक्य, वाक्प्रचार, म्हणी, कविता आठवून लिहिता येणे.<br>५. स्वत:हून लेखन करता येणे. | विद्यार्थ्यांच्या लेखन कौशल्याच्या विकासासाठी पाठ्यपुस्तकामध्ये पृष्ठ क्र. ८, २८, ३७, ८७, ६१, ७४, ९७ वर काही नमुने दिलेले आहेत. शिवाय त्या पृष्ठांवर शिक्षंकासाठी सूचनाही पुस्तकात दिल्या आहेत. दोन अक्षरांतील, दोन शब्दांतील अंतर व वळणदार अक्षर असणे आवश्यक आहे. लेखन विषयक नियमांप्रमाणे लेखनाचा सराव द्यावा असे अपेक्षित आहे. |

**निरीक्षण :** वरील सारणी क्र. ४.११० नुसार इ. ५वीच्या मराठीच्या अभ्यासक्रमातील लेखन क्षेत्रांतर्गत दिलेल्या उद्दिष्टांची पूर्तता व्हावी म्हणून पाठ्यपुस्तकात पुरेसे प्रयत्न झालेले आहेत. यासाठी काही नमुने पाठ्यपुस्तकांत दिलेले आहेत. तसेच शिक्षकांनी सुद्धा लेखनविषयक नियमांप्रमाणे लेखनाचा सराव द्यावा असे अपेक्षित आहे.

**अर्थनिर्वचन :** वरील सारणी क्र. ४.११० नुसार इ. ५वीच्या मराठीच्या अभ्यासक्रमातील लेखन क्षेत्रांमध्ये दिलेली उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी पाठ्यपुस्तकामध्ये ५% पृष्ठांवर काही नमुने दिलेले आहेत.

**निष्कर्ष :** यावरून असे दिसून येते की, इ.५वीच्या मराठीच्या अभ्यासक्रमातील 'लेखन' क्षेत्रामध्ये दिलेली उद्दिष्टे पूर्ण व्हावीत, यासाठी पाठ्यपुस्तकात पुरेसे प्रयत्न झाले आहेत.

### सारणी क्र. ४.१११

| क्षेत्र – ५ कार्यात्मक व्याकरण | पाठ्यपुस्तकातील समाविष्ट भाग |
|---|---|
| १. शब्दांच्या जाती ओळखता येणे.<br>२. एका जातीच्या शब्दापासून इतर जातीचे शब्द बनविणे.<br>३. वाक्याचा काळ ओळखता येणे.<br>४. लेखनविषयक नियमानुसार लिहिता येणे. | इ.५वीच्या मराठीच्या अभ्यासक्रमात 'कार्यात्मक व्याकरण' या क्षेत्रात समाविष्ट केलेल्या उद्दिष्टांप्रमाणे पाठ्यपुस्तकात गद्य–पद्य पाठांखाली पृष्ठ क्र. २१, २२, २३, ३४, ३५, ३६, ४३, ४४, ४५, ५८, ५९, ६०, ६७, ६८, ६९, ७०, ८१, ८२, ९०, ९१, ९२, ९३, १०६, १०७, ११४, ११५ वर व्याकरण दिलेले आहे. |

निरीक्षण :

वरील सारणी क्र. ४.१११ नुसार इ. ५वीच्या मराठीच्या अभ्यासक्रमातील क्षेत्र क्र. ५ मध्ये दिलेल्या उद्दिष्टांनुसार इ.५वीच्या मराठीच्या पाठ्यपुस्तकामध्ये कार्यात्मक व्याकरणाचा भाग समाविष्ट केलेला आहे. या पाठ्यपुस्तकामध्ये अभ्यासक्रमामध्ये सुचविल्याप्रमाणे नाम, लिंग, वचन, विशेषण, क्रियापद, काळ, क्रियाविशेषण, अव्यये इ. व्याकरण घटकांचा समावेश केलेला आहे.

अर्थनिर्वचन :

वरील सारणी क्र. ४.१११ नुसार इ. ५वीच्या मराठीच्या अभ्यासक्रमातील कार्यात्मक व्याकरण या क्षेत्रात दिलेल्या उद्दिष्टांनुसार इ.५वीच्या मराठीच्या पाठ्यपुस्तकामध्ये १९% पृष्ठांवर कार्यात्मक व्याकरणाचा भाग समाविष्ट केलेला आहे. व्याकरण देताना पुस्तकातील उदाहरणांचा वापर केलेला आहे. तसेच दैनंदिन जीवनात घडणाऱ्या घटना–प्रसंगातील उदाहरणांचाही उपयोग केलेला आहे. तसेच मुलांना स्वत:ही पाठातील उदाहरणे शोधण्यास प्रवृत्त करणे अपेक्षित आहे.

निष्कर्ष :

यावरून असे दिसून येते की, इ.५वीच्या मराठीच्या अभ्यासक्रमातील ‘कार्यात्मक व्याकरण’ क्षेत्रात दिलेल्या उद्दिष्टांनुसार पाठ्यपुस्तकामध्ये कार्यात्मक व्याकरणाचा समावेश केलेला आहे.

सन २००६चा प्राथमिक स्तरावरील अभ्यासक्रम व त्यानुसार तयार झालेले इ. ५वीचे हिंदी सुलभभारती पाठ्यपुस्तक यांच्यातील संबंध

सारणी क्र. ४.११२

| क्षेत्र – १ श्रवण | पाठ्यपुस्तकातील समाविष्ट भाग |
|---|---|
| १. रूचि एवं आनंदपूर्वक सुनना,<br>२. समझपूर्वक सुनना,<br>३. स्वर और व्यंजन के उच्चारण को ध्यानपूर्वक सुनना,<br>४. विशेष ध्वनि के शुध्द उच्चारण को समझकर सुनना,<br>५. आशय समझते हुए परिचित एवं अपरिचित पाठ्यांश सुनना, | इ.५वीच्या हिंदीच्या अभ्यासक्रमात श्रवण क्षेत्राच्या अंतर्गत समाविष्ट केलेली उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी पाठ्यपुस्तकामध्ये पृष्ठ क्र. २, ३, ४, १०, १५, १६, २२, २४, २६, २९, ३०, ३२, ३५, ३८, ४२, ४१, ४५, ४९, ५२, ५३, ५५, ६७, ७०, ७५, ७६, ७८, ९२, वर योग्य पाठ्यांशाचा समावेश केलेला आहे. |

निरीक्षण : वरील सारणी क्र. ४.११२ नुसार इ. ५वीच्या हिंदीच्या अभ्यासक्रमातील श्रवणक्षेत्रांच्या अंतर्गत दिलेली उद्दिष्टे पूर्ण होण्यासाठी इ. ५वीच्या 'हिंदी सुलभभारती' या पाठ्यपुस्तकात गद्य–पद्य व व्याकरणावर आधारीत पाठ्यांशाचा समावेश केलेला आहे. श्रवण कौशल्याचा विकास करण्यासाठी पाठ्यपुस्तकामध्ये पुरेसे प्रयत्न झालेले आहेत.

अर्थनिर्वचन : वरील सारणी क्र. ४.११३ नुसार इ. ५वीच्या हिंदीच्या अभ्यासक्रमातील श्रवण क्षेत्राच्या अंतर्गत दिलेल्या उद्दिष्टांनुसार इ.५वीच्या हिंदीच्या पाठ्यपुस्तकामध्ये २६% पृष्ठांवर आशयाचा समावेश केलेला आहे.

निष्कर्ष : यावरून असे दिसून येते की, इ.५वीच्या हिंदीच्या अभ्यासक्रमातील 'श्रवण' क्षेत्राच्या अंतर्गत दिलेल्या उद्दिष्टांचे प्रतिबिंब पाठ्यपुस्तकात पडलेले दिसून येते.

सारणी क्र. ४.११३

| क्षेत्र – २ संभाषण | पाठ्यपुस्तकातील समाविष्ट भाग |
|---|---|
| १. गीत, कविता गाना और कंठस्थ करना,<br>२. सुनी हुई पाठ्यसामग्री पुन: कहना,<br>३. जानकारी हेतु प्रश्न पूछना,<br>४. पाठ्याशांवर मौखिक उत्तर देना,<br>५. छोटे, समवयस्क, आदरणीय व्यक्तियों के साथ उचित भाषा मे बोलना,<br>६. अपने साथियो या अध्यापकोंसे सहज ढंग से बातचीत करना, | इ.५वीच्या हिंदीच्या अभ्यासक्रमात भाषण–संभाषण क्षेत्रामध्ये समाविष्ट केलेल्या उद्दिष्टांनुसार इ. ५वीच्या हिंदी पाठ्यपुस्तकात पृष्ठ क्र. १, ६, २९, ३०,३२, ३४, ३५, ५२, ५३, ६१, ७५, ७६, ८१, ८२ वर भाषण संभाषणवर आधारित पाठ्यांशाचा समावेश केलेला आहे. |

निरीक्षण : वरील सारणी क्र. ४.११३ नुसार इ. ५वीच्या हिंदीच्या अभ्यासक्रमामध्ये भाषण–संभाषण कौशल्याच्याअंतर्गत समाविष्ट केलेल्या उद्दिष्टानुसार इ.५वीच्या 'हिंदी सुलभभारती' या पाठ्यपुस्तकात विविध गद्य–पद्य पाठांच्या अनुषंगाने भाषण–संभाषण कौशल्याचा विकास करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

अर्थनिर्वचन : वरील सारणी क्र. ४.११३ नुसार इ. ५वीच्या हिंदीच्या अभ्यासक्रमामध्ये भाषण–संभाषण कौशल्याच्या अंतर्गत समाविष्ट केलेल्या उद्दिष्टानुसार इ.५वीच्या हिंदीच्या पाठ्यपुस्तकात १४% पृष्ठांवर भाषण–संभाषण कौशल्यावर आधारित पाठ्यांशाचा समावेश केलेला आहे.

निष्कर्ष : यावरून असे दिसून येते की, इ.५वीच्या हिंदीच्या अभ्यासक्रमातील 'भाषण–संभाषण' कौशल्याच्या अंतर्गत समाविष्ट उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी पाठ्यपुस्तकातून पुरेसे प्रयत्न केलेले दिसून येतात.

सारणी क्र. ४.११४

| क्षेत्र – २ वाचन (पठन) | पाठ्यपुस्तकातील समाविष्ट भाग |
|---|---|
| १. लिखित छपे हुए शब्द पढना,<br>२. एक ही दृष्टीक्षेप मे अधिक से अधिक शब्दोंको पढना,<br>३. समझपूर्वक मुखवाचन करना,<br>४. समझपूर्वक मौनवाचन करना,<br>५. वाचन मे रूचि निर्माण करना, | इ.५वीच्या हिंदीच्या अभ्यासक्रमात वाचन क्षेत्राच्या अंतर्गत समाविष्ट केलेल्या उद्दिष्टानुसार इ. ५वीच्या हिंदीच्या पाठ्यपुस्तकामध्ये पृष्ठ क्र. २१, २८, ३८, ४२, ४४, ४७, ४९, ५१, ५९, ६२, ६३, ६८, ७०, ७२, ७४, ८२, ८५, ८६, ८७, ९०, ९२, ९४, ९६ वर वाचन कौशल्यावर आधारित गद्य–पद्य पाठ्यांशाचा समावेश केलेला आहे. |

**निरीक्षण :** वरील सारणी क्र. ४.११४ नुसार इ. ५वीच्या हिंदीच्या सन २००६ च्या हिंदीच्या अभ्यासक्रमातील वाचन क्षेत्राच्या अंतर्गत समाविष्ट केलेल्या उद्दिष्टांनुसार 'हिंदी सुलभभारती' या पाठ्यपुस्तकात गद्य–पद्य पाठांच्या सहाय्याने वाचन कौशल्याचा विकास करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**अर्थनिर्वचन :** वरील सारणी क्र. ४.११४ नुसार इ. ५वीच्या हिंदीच्या अभ्यासक्रमातील 'वाचन' क्षेत्रातील उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी हिंदीच्या पाठ्यपुस्तकात २३% पृष्ठांवर वाचन कौशल्यावर आधारित पाठ्यांशाचा समावेश केलेला आहे.

**निष्कर्ष :** यावरून असे दिसून येते की, सन २००६च्या इ.५वीच्या हिंदीच्या अभ्यासक्रमातील 'वाचन' कौशल्यांतर्गत समाविष्ट उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी पाठ्यपुस्तकातून पुरेसे प्रयत्न केलेले दिसून येतात.

सारणी क्र. ४.११५

| क्षेत्र – ४ लेखन | पाठ्यपुस्तकातील समाविष्ट भाग |
|---|---|
| १. अनुलेखन करना,<br>२. श्रुतलेखन करना,<br>३. स्वयंप्रेरणा से लेखन करना,<br>४. पाठ्यांशपर आधारित लेखन,<br>५. निंबध लेखन, | इ.५वीच्या हिंदीच्या अभ्यासक्रमात लेंखन क्षेत्रांतर्गत समाविष्ट केलेल्या उद्‌दिष्टांनुसार इ. ५वीच्या हिंदी पाठ्यपुस्तकात पृष्ठ क्र. ३२, ३८, ४२, ५८, ६३, ६७, ६८, ८५, ९०, ९४, वर गद्य–पद्य पाठांमध्ये लेखन कौशल्यावर आधारित उपक्रमांचा समावेश केलेला आहे. |

**निरीक्षण :** वरील सारणी क्र. ४.११५ नुसार इ. ५वीच्या हिंदीच्या अभ्यासक्रमामध्ये लेखन कौशल्याच्याअंतर्गत समाविष्ट केलेल्या उद्‌दिष्टानुसार इ.५वीच्या हिंदीच्या सुलभभारती या पाठ्यपुस्तकात गद्य–पद्य पाठांचा समावेश केलेला आहे.

**अर्थनिर्वचन :** वरील सारणी क्र. ४.११५ नुसार इ. ५वीच्या हिंदीच्या अभ्यासक्रमामध्ये लेखन क्षेत्राच्या अंतर्गत येणाऱ्या उद्‌दिष्टांच्या पूर्ततेसाठी इ.५वीच्या हिंदीच्या पाठ्यपुस्तकात १०% पृष्ठांवर लेखन कौशल्यावर आधारित गद्य पद्य पाठ्यांशाचा समावेश केलेला आहे.

**निष्कर्ष :** यावरून असे दिसून येते की, इ.५वीच्या हिंदीच्या अभ्यासक्रमातील ‘लेखन’ कौशल्याच्या अंतर्गत समाविष्ट उद्‌दिष्टे पूर्ण करण्यासाठी पाठ्यपुस्तकातून पुरेसे प्रयत्न केलेले दिसून येतात.

सारणी क्र. ४.११६

| क्षेत्र – ५ भाषा–प्रयोग | पाठ्यपुस्तकातील समाविष्ट भाग |
|---|---|
| १. वर्णपरिचय,<br>२. शब्द परिचय,<br>३. विरामचिन्ह,<br>४. ध्यान देने योग्य आवश्यक बाते, | इ.५वीच्या हिंदीच्या अभ्यासक्रमात भाषा–प्रयोग य क्षेत्रामध्ये समाविष्ट केलेल्या उद्दिष्टांनुसार इ ५वीच्या हिंदी पाठ्यपुस्तकात पृष्ठ क्र. १०, १६ ३८,४२, ४६, ५७, ६२, ६५, ७१, ७३, ७८ ८०, ८२, ८४, ९७, ९३ वर भाषाप्रयोगाच्या माध्यमाने व्याकरण समजावून सांगणे अपेक्षि आहे. पाठ्यपुस्तकात स्वतंत्र रूपात व्याकरणाव भर दिलेला दिसून येत नाही. |

निरीक्षण : वरील सारणी क्र. ४.११६ नुसार इ. ५वीच्या हिंदीच्या अभ्यासक्रमामध्ये भाषाप्रयोग क्षेत्राच्या अंतर्गत समाविष्ट केलेल्या उद्दिष्टानुसार इ.५वीच्या हिंदीच्या सुलभभारती या पाठ्यपुस्तकात सुरूवातीपासून संपूर्ण पुस्तकात विरामचिन्हे, अनुस्वार व चंद्रबिंदु, समानार्थी शब्द, वचन, लिंग इ. चा समावेश केलेला आहे. पाठ्यपुस्तकात कोठेही व्याकरणाचा स्वतंत्र रूपात समावेश नाही.

अर्थनिर्वचन : वरील सारणी क्र. ४.११६ नुसार इ. ५वीच्या हिंदीच्या अभ्यासक्रमामध्ये भाषाप्रयोग क्षेत्राच्या अंतर्गत समाविष्ट केलेल्या उद्दिष्टानुसार इ.५वीच्या हिंदीच्या पाठ्यपुस्तकात १७% पृष्ठांवर भाषाप्रयोगाच्या माध्यमात व्याकरणाचा समावेश केलेला आहे.

निष्कर्ष : यावरून असे दिसून येते की, इ.५वीच्या हिंदीच्या अभ्यासक्रमातील 'भाषा–प्रयोग' क्षेत्राच्या अंतर्गत दिलेल्या उद्दिष्टांनुसार इ. ५वीच्या हिंदीच्या पाठ्यपुस्तकात व्याकरणाचा समावेश केलेला आहे.

III) सन २००६चा इ. ५वीचा इंग्रजीचा अभ्यासक्रम व त्यानुसार तयार झालेले इ. ५वीचे इंग्रजी पाठ्यपुस्तक यांच्यातील सहसंबंध

उद्दिष्टानुसार

सारणी क्र. ४.११७

| क्षेत्र – १ Listening | पाठ्यपुस्तकातील समाविष्ट भाग |
|---|---|
| 1. Enjoy the rhythm & understand the gist of songs & poems.<br>2. Enjoy & understand stories.<br>3. Show an awareness of stress patterns.<br>4. Listen and write words.<br>5. Distinguish between simple introduction pattern.<br>6. Understand simple statements, questions, requests & commands & act accordingly.<br>7. Understand conversation connected with familier topics.<br>8. Listen with concentration for 5-7 minutes.<br>9. Understand simple English spoken by various persons.<br>10. Enjoy skits/plays and notice sequene of incidents. | इ.५वीच्या इंग्रजी अभ्यासक्रमात Listening क्षेत्राच्या अंतर्गत समाविष्ट केलेली उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी पाठ्यपुस्तकामध्ये पृष्ठ क्र. १, ५, ६, १०, १२, १९, २१, ३४, ३७ ते ४०, ४१, ४२, ४४, ४५, ४८, ५३, ५६, ५७, ६३, ६५, ६९, ७०, ७२, ७५, ७८, ८२, ९६, ९८, ९९, १००, १०१, १०२, १०३, १०५, १०६, १०७, १०८, १०९, ११३, ११४, ११५, ११६, ११९, १२०, १२५ वर विद्यार्थ्यांना ऐकण्यासाठी छोट्या–छोट्या कविता, कथा, स्वाध्यायामधून विविध कृतींचा समावेश केलेला आहे. |

निरीक्षण :

वरील सारणी क्र. ४.११७ नुसार इ. ५वीच्या इंग्रजीच्या अभ्यासक्रमातील श्रवणक्षेत्रातील उद्दिष्टे पूर्ण होण्यासाठी पाठ्यपुस्तकात योग्य कृती व उपक्रम

यांचा समावेश केलेला आहे, हे उपक्रम विविध गद्य–पद्य तसेच स्वाध्याय इ. मधून दिलेले आहेत.

**अर्थनिर्वचन :** वरील सारणी क्र. ४.११७ नुसार इ. ५वीच्या इंग्रजीच्या अभ्यासक्रमातील Listening (श्रवण) क्षेत्राच्या अंतर्गत दिलेल्या उद्दिष्टांनुसार इ.५वीच्या इंग्रजी पाठ्यपुस्तकामध्ये ३९% पृष्ठांवर विविध कृतींचा समावेश केलेला आहे.

**निष्कर्ष :** यावरून असे दिसून येते की, सन २००६च्या इ.५वीच्या इंग्रजी अभ्यासक्रमातील 'श्रवण' क्षेत्राच्या कौशल्याचा विकास करण्यासाठी पाठ्यपुस्तकात पुरेसे प्रयत्न केलेले आहे.

## सारणी क्र. ४.११८

| क्षेत्र – २ **Speaking** | पाठ्यपुस्तकातील समाविष्ट भाग |
|---|---|
| To enable the student to<br>1) Learn to speak with proper pronunciation.<br>2) Understand and reproduce contrastive sounds.<br>3) Recite with enjoyment poems / songs with proper rhythm.<br>4) Learn to interact appropriętly according other roles.<br>5) Learn to give short/long responces in various contexts.<br>6) Describe objects, pictures & processes.<br>7) Attempt to narrate stories/ events/ incidents .<br>8) Learn to open a conversation.<br>9) Learn to use appropriate expressions. | इ.५वीच्या इंग्रजी अभ्यासक्रमात संभाषण क्षेत्राच्या अंतर्गत समाविष्ट केलेली उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी पाठ्यपुस्तकामध्ये पृष्ठ क्र. १, २, ४, ५, ६, ७, ११, १२, १३, २१, २३, ३१, ३२, ४३, ५२, ५३, ५४, ९०, ९१, ९३, ९४, ११६, १२८ वर विविध कृती दिलेल्या आहेत. यामध्ये विविध शब्दांवर जोर देऊन मोठ्याने म्हणणे, विविध कविता मोठ्याने म्हणणे, मुलाखत संभाषण, कथेचे/घटनेचे सारांश सांगणे इ. कृतींचा समावेश केला आहे. |

**निरीक्षण :** वरील सारणी क्र. ४.११८ नुसार इ. ५वीच्या इंग्रजीच्या अभ्यासक्रमातील संभाषण (speaking) क्षेत्रांतर्गत समाविष्ट केलेल्या उद्दिष्टांनुसार इंग्रजी पाठ्यपुस्तकात भाषण कौशल्य विकसित होण्यासाठी विविध कृतींचा समावेश आहे.

**अर्थनिर्वचन :** वरील सारणी क्र. ४.११८ नुसार इ. ५वीच्या इंग्रजीच्या अभ्यासक्रमातील संभाषण (speaking) क्षेत्राच्या अंतर्गत दिलेल्या उद्दिष्टांनुसार इंग्रजी पाठ्यपुस्तकामध्ये १८% पृष्ठांवर विविध कृतींचा समावेश केलेला आहे.

**निष्कर्ष :** यावरून असे दिसून येते की, इ.५वीच्या इंग्रजी अभ्यासक्रमातील 'संभाषण'(speaking) क्षेत्राच्या अंतर्गत दिलेल्या उद्दिष्टांनुसार इंग्रजी पाठ्यपुस्तकामध्ये विविध कृतींचा समावेश केलेला आहे.

## सारणी क्र. ४.११९

| क्षेत्र – ३ **Reading** | पाठ्यपुस्तकातील समाविष्ट भाग |
|---|---|
| To enable the student to<br>1) identify commonly used words at sight.<br>2) Make intelligent guesses about the pronunciation of new words.<br>3) Read a loud from the textbook/ the black board & other sources.<br>4) Show an understaind of punctuation marks in his/ her reading.<br>5) Read & act accordingly.<br>6) Read a loud taking proper pauses.<br>7) Read his/her part in a dialogue with understanding.<br>8) Read poems in rhythm.<br>9) Learn to read silently.<br>10) Guess meaning of new words from contexts.<br>11) Acquire 'skimming' & 'scanning' skills.<br>12) Read with concentration & interest.<br>13) Read maps, charts, numbers etc.<br>14) Use dictionarires, directories etc. | इ.५वीच्या इंग्रजी अभ्यासक्रमात वाच क्षेत्राच्या अंतर्गत समाविष्ट केलेल्या उद्दि पूर्ण करण्यासाठी पाठ्यपुस्तकामध्ये पृष्ठ क्र १, ६, ८, ११, १२, १५, १६, २२, २ ३४, ३५, ३६, ४१, ४३, ४४, ४५, ४ ४८, ४९, ५०, ५१, ५२, ५३, ५६, ६ ६६, ६८, ७८, ७९, ८०, ८४, ८५, ८ ८७, ८८, ९६, ९७, १०६, १०७, ११ १११, ११४, ११५, ११६, १२०, १२ १२२, १२५, १२६, १२७, १२८ विविध गाणी, कथा, स्वाध्याय, उपक्र यांचा समावेश केला आहे. |

**निरीक्षण :** वरील सारणी क्र. ४.११९ नुसार इ. ५वीच्या इंग्रजीच्या अभ्यासक्रमातील वाचन (reading) क्षेत्रांतर्गत दिलेली उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी पाठ्यपुस्तकात विविध कविता, कथा, स्वाध्याय, प्रकल्प व उपक्रमांचा समावेश केलेला आहे.

**अर्थनिर्वचन :** वरील सारणी क्र. ४.११९ नुसार इ. ५वीच्या इंग्रजीच्या अभ्यासक्रमानुसार वाचन (reading) क्षेत्रातील उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी इंग्रजी

पाठ्यपुस्तकामध्ये ४१% पृष्ठांवर विविध गद्य, पद्य, उपक्रम व स्वाध्यायांचा समावेश केलेला आहे.

**निष्कर्ष :** यावरून असे दिसून येते की, इ.५वीच्या इंग्रजी अभ्यासक्रमातील 'वाचन' (reading) क्षेत्राच्या अंतर्गत दिलेल्या उद्‌दिष्टे साध्य करण्यासाठी योग्य अशा आशयाचा समावेश केलेला आहे.

## सारणी क्र. ४.१२०

| क्षेत्र — ४ **Writing** | पाठ्यपुस्तकातील समाविष्ट भाग |
|---|---|
| To enable the student to<br>1) Develop the habit of writing neatly & legibly (Size, Shape, Proportion, Direction, Distance etc.)<br>2) Write on one line.<br>3) Copy the letters, words & sentences.<br>4) Complete sentences.<br>5) Take the dictation of familier words & short sentences.<br>6) Enrich vocabulary by taking part in language games.<br>7) Write words on given clues.<br>8) Write words on a given topic.<br>9) Complete the known story with missing words.<br>10) Enjoy writing independently.<br>11) Rearrange story events.<br>12) Write answer of questions.<br>13) Write numbers in figures as well as in words.<br>14) Write compositions using provided guidlines. | इ.५वीच्या इंग्रजी अभ्यासक्रमात लेखन क्षेत्राच्या अंतर्गत समाविष्ट केलेल्या उद्‌दिष्टे पूर्ण करण्यासाठी पाठ्यपुस्तकामध्ये पृष्ठ क्र. २, ३, ५, ७, ९, ११, १४, १५, १८, २०, २७, ३१, ३३, ३४, ३५, ३६, ४१, ४३, ४६, ४७, ५२, ५५, ६३, ६४, ६५, ६६, ६८, ६९, ७२, ७३, ७४, ७५, ७६, ७७, ८०, ९३, ९४, १०३, १०८, ११२, ११३, ११७, ११८, ११९, १२१, १२१, १२२, १२५, १२६, १२७, १२८ वर विविध १३ प्रकारचे स्वाध्याय दिलेले आहेत, यामध्ये Read & choose the correct letter, look, think & write, changing sentences, listen, read & write इ. कृतींचा समावेश केला आहे. |

## निरीक्षण :

वरील सारणी क्र. ४.१२० नुसार इ. ५वीच्या इंग्रजीच्या अभ्यासक्रमातील लेखन (writing) क्षेत्रांतर्गत दिलेली १४ उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी पाठ्यपुस्तकात १३ प्रकारच्या स्वाध्यायांचा व उपक्रमाचा समावेश केलेला आहे.

## अर्थनिर्वचन :

वरील सारणी क्र. ४.१२० नुसार इ. ५वीच्या इंग्रजीच्या अभ्यासक्रमानुसार लेखन क्षेत्रातील उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी इंग्रजी पाठ्यपुस्तकामध्ये ४०% पृष्ठांवर लेखन कौशल्याच्या विकासासाठी उपक्रम व स्वाध्याय दिलेले आहे.

## निष्कर्ष :

यावरून असे दिसून येते की, सन २००६च्या इ.५वीच्या इंग्रजी अभ्यासक्रमातील 'लेखन' क्षेत्राच्या अंतर्गत दिलेल्या उद्दिष्टानुसार इ. ५वीच्या इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकात योग्य स्वाध्याय व उपक्रमांचा समावेश केलेला आहे.

## सारणी क्र. ४. १२१
## सन २००६ च्या इ. ५वीच्या मराठी पाठ्यक्रमातील उपक्रम व पाठ्यपुस्तक यांचा संबंध

| अभ्यासक्रम | पाठ्यपुस्तक |
|---|---|
| १) श्रवण<br>१. भाषण–संभाषण, गोष्टी, माहिती, गाणी इ. ऐकविणे.<br>२. बालसभेतील कार्यक्रमात भाषणे ऐकविणे.<br>३. कथा, गोष्टी, गाणी, भाषणे यांच्या ध्वनिफिती ऐकविणे.<br>४. कथा, कविता, नाट्यप्रवेश यांचे प्रभावी वाचन करणे.<br>५. आकाशवाणी, दूरदर्शन यावरील बातम्या, माहिती, संवाद–संभाषण, चर्चा व विचार प्रवर्तक छोटी भाषणे इ. ऐकविणे.<br>६. ऐकलेल्या भागावर सोपे प्रश्न विचारून चर्चा घडविणे.<br>७. पाठ्यमजकूरातील आशय स्पष्ट करण्यासाठी कथन, स्पष्टीकरण आणि चर्चा करणे.<br>८. पाठ्यांशाचा निवडक भाग वाचून दाखविणे व त्यावर प्रश्न विचारणे.<br>९. शिकवून झालेल्या भागावर प्रश्न विचारणे.<br>१०.विविध उपक्रम व भाषिक खेळ. | पाठ्यपुस्तकात श्रवणासाठी जाणीवपूर्वक गद्य व पद्य, १, २, ४, ५, ७ या पृष्ठांवर गाणी व मजकूर दिलेला आहे. त्याचप्रमाणे पाठ्यपुस्तकातील सर्व गद्य–पद्य पाठांचाही उपयोग करता येईल. या पाठ्यांशावर चर्चा घडवून आणूण व प्रश्न विचारून श्रवण कौशल्याचा विकास करता येतो. |

| अभ्यासक्रम | पाठ्यपुस्तक |
| --- | --- |
| २) भाषण—संभाषण<br>१. तालासुरात अभिनय.<br>२. सामूहिक/वैयक्तिक गीत वाचन.<br>३. सूचना, निरोप इ.<br>४. मजकूरांचे कथन.<br>५. मजकूरातील महत्वाचे मुद्दे, कल्पना, भावना, मध्यवर्ती कल्पना, कार्यकारणभाव, घटनाक्रम इ. बाबी.<br>६. पाहिलेल्याचे वर्णन.<br>७. अनुभवलेल्याचे कथन.<br>८. दिलेल्या विषयावर भाषण.<br>९. वैयक्तिक माहितीवर आधारित प्रश्न.<br>१०.ऐनवेळी विचारलेले प्रश्न – उत्तरे ४/५ वाक्ये.<br>११. प्रश्नमंजूषा. | भाषण संभाषणासाठी पाठ्यपुस्तकात पृष्ठ क्र ६२ वर मजकूर आहे. इतर गद्यपाठाचाही यासाठी उपयोग करता येईल. शिक्षकांनी असेच वेगळे उतारे देऊन वर्गात भाषण—संभाषण घडवून आणणे आवश्यक आहे. |

| अभ्यासक्रम | पाठ्यपुस्तक |
| --- | --- |
| ३) वाचन<br>१. परिसरातील मजकूर वाचन<br>२. पाठ्यपुस्तकातील छापील व हस्तलिखित मजकूराचे योग्य गती, योग्य लय, स्पष्ट उच्चार, योग्य विराम, आवाजातील चढ–उतारासह वाचन.<br>३. वैयक्तिक/सामूहिक प्रकटवाचन.<br>४. पाठ्यपुस्तकातील शब्द/समूह वाचन.<br>५. नियोजित वेळेत अधिकाधिक मजकूर वाचून प्रश्नांची उत्तरे देणे.<br>६. सर्वसाधारण आशय, मध्यवर्ती कल्पना याबाबत चर्चा. | विद्यार्थ्यांचे कौशल्य विकसित होण्यासाठी पाठ्यपुस्तकात गद्य–पद्य पाठांशिवाय ३, ७, १३, २८, ८३, १०८ इ. पानांवर जाणीवपूर्वक मजकूर दिलेला आहे व मजकूराखाली विद्यार्थ्यांकडून हे कौशल्य शिक्षकांनी कसे विकसित करावे यासाठी खाली सूचना दिलेल्या आहेत. शिक्षकांनी आणखी काही मजकूर तयार करून त्याचे वर्गात मूकवाचन, प्रकटवाचन करावे व या कौशल्याचा विकास करावा असे अपेक्षित आहे. |

| अभ्यासक्रम | पाठ्यपुस्तक |
|---|---|
| ४) लेखन<br>१. छापील व हस्तलिखित मजकूर उपलब्ध करून देऊन अनुलेखन करणे.<br>२. लेखनाचे नियम स्पष्ट करून मुलांना आवडलेल्या व पाठ्यपुस्तकातील निवडक मजकूराचे अनुलेखन करणे.<br>३. नवीन शब्द, विरामचिन्हयुक्त वाक्ये, छोटे परिच्छेद, मजकूर यांचे श्रुतलेखन.<br>४. पाठ्यांशावरील मजकूराचे लेखन.<br>५. दिलेल्या सूचनेनुसार शब्द, वाक्य, वाक्यप्रचार, म्हणी, कविता, आठवून लिहिणे.<br>६. स्वत:चा परिचय स्वानुभवलेखन, दैनंदिनी लेखन, विषय आणि मुद्द्यांच्या आधारे लेखन यासारख्या स्वलेखनावर भर द्यावा. | विद्यार्थ्यांचे लेखन कौशल्य विकसित होण्यासाठी पाठ्यपुस्तकात ८, २८, ३७, ४९, ७४, ९७ वर नमुने दिलेले आहेत शिवाय या पृष्ठांवर शिक्षकांसाठी काही सूचनाही पुस्तकात दिल्या आहेत. दोन अक्षरांतील, दोन शब्दांतील अंतर व वळणदार अक्षर असणे आवश्यक आहे. म्हणून लेखन विषयक नियमांप्रमाणे लेखनाचा सराव द्यावा. पाठाखालील स्वाध्याय व उपक्रम यातून लेखन विषयक कौशल्य करण्याचा प्रयत्न करावा. |

**विश्लेषण व अर्थनिर्वचन :**

वरील सारणी क्र. ४.१२१ नुसार २००६च्या अभ्यासक्रमानुसार तयार झालेल्या इ. ५वीच्या मराठी पाठ्यपुस्तकात विद्यार्थ्यांच्या भाषिक कौशल्यांच्या विकासासाठी कौशल्यनिहाय विविध उपक्रम दिलेले आहेत. हे उपक्रम कसे राबवावेत यासदंर्भात योग्य त्या सूचना व मार्गदर्शन केलेले आहे.

**निष्कर्ष :**

सन २००६ च्या इ. ५वीच्या मराठी अभ्यासक्रमामध्ये भाषिक कौशल्यांतर्गत दिलेल्या क्षमता विकसित करण्यासाठी पाठ्यपुस्तकांमध्ये विविध उपक्रम दिलेले आहेत. मात्र भाषण कौशल्यासाठी दिलेल्या उपक्रमांची संख्या कमी आहे. हे उपक्रम पुरेशा प्रमाणात असावेत.

## सारणी क्र. ४.१२२

## सन २००६ च्या इ. ५वीच्या मराठी अभ्यासक्रमातील कार्यात्मक व्याकरण व पाठ्यपुस्तक यांचा संबंध

| अभ्यासक्रम | पाठ्यपुस्तक |
|---|---|
| १. नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियापद, क्रियाविशेषण अव्यय, शब्दयोगी अव्यय, उभयान्वयी अव्यय, केवलप्रयोगी अव्यय इ. घटक विविध उदाहरणे, भाषिक खेळ/उपक्रम माध्यमातून शिकवावेत.<br>२. विशेषणाची विविध वाक्ये, वर्तमानकाळ, भूतकाळ व भविष्यकाळासंबंधी विविध वाक्ये द्यावीत, त्यावर आधारित स्वाध्याय द्यावेत.<br>३. लिंग व वचन ओळखण्यासाठी विविध स्वाध्याय<br>४. लेखनविषयक नियम विद्यार्थ्यांना सांगावेत व सराव करून घ्यावे. | अभ्यासक्रमात नमूद केल्याप्रमाणे पाठ्यपुस्तकात गद्य–पद्य पाठाखाली पृष्ठ क्र. २१, २२, २३, ३३, ४२, ४४, ५६, ५७, ६५, ६६, ६७, ७८, ८६, ८९, १०२, १०९, ११०, ११२ वर व्याकरण दिलेले आहे. यासाठी पाठ्यपुस्तकातील उदाहरणांबरोबरच दैनंदिन जीवनातील इतर उदाहरणे दिलेली आहेत. |

विश्लेषण व अर्थनिवर्चन :

वरील सारणी क्र. ४.१२२ नुसार इ. ५वीच्या मराठीच्या अभ्यासक्रमामध्ये दिल्याप्रमाणे मराठीच्या पाठ्यपुस्तकात विविध व्याकरण घटकांचा समावेश केलेला आहे. यासाठी पाठ्यपुस्तकातील व पाठ्यपुस्तकाव्यतिरिक्त उदाहरणांचाही समावेश करून व्याकरण शिकविण्यावर भर दिलेला आहे.

निष्कर्ष :

सन २००६च्या इ. ५वीच्या अभ्यासक्रमामध्ये सांगितल्याप्रमाणे इ. ५वीच्या मराठी पाठ्यपुस्तकात व्याकरणविषयक उपक्रम दिलेले आहेत.

### सारणी क्र. ४. १२३

### सन २००६ च्या इ. ५वीच्या मराठी अभ्यासक्रमातील उपक्रम व इ. ५वीचे हिंदी पाठ्यपुस्तक यांचा संबंध

| अभ्यासक्रम | पाठ्यपुस्तक |
|---|---|
| १) श्रवण<br>१. छोट्या व सोप्या बालगीते, अभिनय गीते, कविता, कहाण्या, विनोद, संवाद ऐकविणे.<br>२. ध्वनिफिते, आकाशवाणी, दूरदर्शन, सीडी वरील मुलांचे कार्यक्रम ऐकविणे.<br>३. भाषिक खेळ<br>४. वेगवेगळे शब्द, दिन, महिने, रंग, फळे, फूले, भाज्या,खाद्यान्न, यांच्या नावांचे तक्ते लावणे.<br>५. भावपूर्ण गीत, छोट्या नाटिका, एंकाकीका यांच्या ध्वनिफिती ऐकविणे.<br>६. पाठ्यपुस्तक व पाठ्यपुस्तकाव्यतिरिक्त आशय ऐकविणे. | पाठ्यपुस्तकामध्ये विविध गीते, कहाण्या, कविता, विनोद, कोडी, संवाद यांचा समावेश केला आहे.<br>विविध प्रकारचे भाषिक खेळही दिलेले आहेत. गद्य व पद्य पाठातील पाठ्यांशाचे उपयोग या कौशल्याच्या विकासासाठी होऊ शकतो. याबरोबरच वेगवेगळे शब्द, दिन, महिने, फळे, खाद्यान्न यांचे तक्ते पाठ्यपुस्तकात आहेत. |

| अभ्यासक्रम | पाठ्यपुस्तक |
| --- | --- |
| २) भाषण—संभाषण<br>१. विविध गीते, हास्यविनोद सांगणे, दैनंदिन जीवनाशी संबंधित विषयावर बोलणे, आकाशवाणी, दूरदर्शनवर प्रसारित होणारे कार्यक्रमाचे वर्णन करणे.<br>२. स्वर, व्यंजन, मात्रा यांच्या शुद्ध उच्चारणावर भर, प्रश्नोत्तरांचे खेळ, वेगवेगळ्या व्यक्तिबद्दल बोलण्यास सांगणे, चित्र/चित्रमालिकेचे वर्णन करण्यास सांगणे.<br>३. दै. व्यवहार, घटना, वर्गातील विषयावर चर्चाकरणे. | पाठ्यपुस्तकामध्ये विविध गीते, चुटकुले, दैनंदिन विषयावर आधारित प्रसंग, घटना, वस्तू, व्यक्ति इ. वर आधारित पाठ्यांश दिलेला आहे.<br>गद्य—पद्य पाठाखाली स्वाध्याय, दिलेला आहे, याबरोबरच या कौशल्यांचा विकास व्हावा म्हणून शिक्षकांसाठी सूचना व मार्गदर्शन केलेले आहे. |
| ३) वाचन<br>१. स्वर, व्यंजन, मात्रा, जोडाक्षरे यांचे वाचन.<br>२. परिचित/अपरिचित शब्दांचे वाचन.<br>३. मौनवाचन, प्रकटवाचन, १ ते १०० आकड्यांचे वाचन.<br>४. भाषिक खेळ, बालमासिके, बालसाहित्य त्याचे वाचन | वाचन कौशल्याच्या विकासासाठी पाठ्यपुस्तकातील सर्व गद्य—पद्य पाठांचा उपयोग होतो, याशिवाय स्वर, व्यंजन, जोडाक्षरे, विविधप्रकारचे शब्द, १ ते १०० आकडे, विविध भाषिक खेळ दिलेले आहेत. याबरोबरच शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकाव्यतिरिक्त बालमासिके, बालसाहित्य वाचनासाठी उपलब्ध करून देणे अपेक्षित आहे. |

| अभ्यासक्रम | पाठ्यपुस्तक |
|---|---|
| ४) लेंखन<br>१. शुद्‌ध व सुडौल अनुलेखन.<br>२. शब्द और वाक्ये यांचे श्रुतलेखन.<br>३. अलग—अलग विषयोंपर स्वयंप्रेरणेने लेखन.<br>४. निबंधलेखन | लेखन कौशल्याच्या विकासासाठी पाठ्यपुस्तकामध्ये वर्णमाला, बाराखडी, विरामचिन्हे, १ ते १०० अंक, वेगवेगळे शब्द, वाक्यसमूह, दैनंदिन जीवनाशी निगडीत आशय, समानार्थी शब्द, विरूध्दार्थी शब्द, वाक्‌प्रचार, म्हणी, सुवचन इ. दिलेले आहे. या व्यतिरिक्त शिक्षकांनी दैनंदिन जीवनातील विविध विषय देऊन लेखन करण्यास सांगावे, तसेच निबंधाचे विषय देऊन निंबधलेखन करण्यास सांगावे, याचबरोबर पाठ्यांशावर आधारित प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास प्रेरित करावे. |
| ५) भाषा—प्रयोग<br>१. संपूर्ण वर्णमालेचा अभ्यास.<br>२. स्वर, व्यंजन वर्ण यांचा अभ्यास शब्दकार्डाच्या सहाय्याने करणे.<br>३. वेगवेगळ्या प्रकारचे शब्द शिकविण्यासाठी भाषिक खेळ.<br>४. समानार्थी, विरूध्दार्थी, शब्दसमूहासाठी एक शब्द, एकवचनी—अनेकवचनी शब्द, स्त्रीवाचक, पुरूषवाचक शब्द | पाठ्यपुस्तकामध्ये व्याकरणविषयक सर्व घटकांचा समावेश प्रत्यक्ष/अप्रत्यक्षरित्या केलेला आहे. यासाठी विविध चित्र, तक्ते पाठ्यपुस्तकात दिलेले आहेत, उदाहरणे दिलेली आहेत. याव्यतिरिक्त शिक्षकांनी उदाहरणे, शब्द परिच्छेद यांच्या सहाय्याने व्याकरणाचे अध्यापन करावे. |

विश्लेषण व अर्थनिर्वचन :

सारणी क्र. ४.१२३ नुसार इ.५वीच्या हिंदीच्या पाठ्यपुस्तकामध्ये अभ्यासक्रमामध्ये सांगितलेल्याप्रमाणे विविध भाषिक कौशल्यांच्या विकासासाठी विविध उपक्रम दिलेले आहेत. तसेच व्याकरणासाठीही विविध उपक्रम दिलेले आहेत. याव्यतिरिक्त अन्यकाही उपक्रम शिक्षकांनी राबवून अध्ययन–अध्यापन प्रक्रिया प्रभावी करणे आवश्यक आहे.

निष्कर्ष :

यावरून असे दिसून येते की, सन २००६च्या इ.५वीच्या हिंदीच्या अभ्यासक्रमामध्ये दिलेले उपक्रम पाठ्यपुस्तकात समाविष्ट केलेले आहेत.

## सारणी क्र. ४.१२४

### सन २००६च्या इ. ५वीच्या इंग्रजी अभ्यासक्रमातील उपक्रम व इ. ५वीचे इंग्रजी पाठ्यपुस्तक यांचा संबंध

| अभ्यासक्रम | पाठ्यपुस्तक |
|---|---|
| १) श्रवण<br>१. वेगवेळी गीते, कविता, छोट्या गोष्टी, नवीन शब्द, सूचनांची श्रृंखला, संभाषण/संवाद, मोठ्या गोष्टींचे सारांश, एकांकी, विनोद इ. ऐकविणे.<br>२. रेडिओ, दूरदर्शनवरील इंग्रजी कार्यक्रम ऐकविणे. | अभ्यासक्रमानुसार इ. ५वीच्या पाठ्यपुस्तकात 'keeping quite' (एका विद्यार्थ्याने प्रश्न विचारणे व दुसऱ्या विद्यार्थ्याने न बोलता केवळ हावभाव हास्य किंवा खाणाखुणाव्दारे प्रश्नांची उत्तरे देणे) Ditto, ऐका व जसेच्या तसे आठवून लिहा. हे उपक्रम आहेत.<br>याचबरोबर काही कथा, गीते, कविता यापुस्तकात दिलेली आहेत. 'Science Magazine' अंतर्गत काही काल्पनिक, वैज्ञानिक, विचारप्रवर्तक गोष्टींचाही समावेश केला आहे. |
| २) भाषण—संभाषण<br>१. विविध गाणी/कविता तालासुरात म्हणण्यास प्रवृत्त म्हणण्यास प्रवृत्त करणे. | पाठ्यपुस्तकात भाषण कौशल्याच्या विकासासाठी कवितांचे गायन विविध शब्दांचे, ध्वनींचे उच्चारण यांचा सराव देण्यात आला आहे. दैनंदिन जीवनातील शाळा, कुटुंब, सहकारी |

| अभ्यासक्रम | पाठ्यपुस्तक |
| --- | --- |
| २) भाषण/संभाषण<br>२. वर्गात विविध इंग्रजी संभाषणे, लहान मोठ्या प्रतिसादाच्या कृती<br>३. वेगवेगळ्या गोष्टी/घटना/प्रसंग सांगण्यास विद्यार्थ्यांना प्रवृत्त करणे, संभाषणे सादर करणे, विविध शब्दांचे व ध्वनींचे उच्चारण यांचा सराव देणे. | यांचेविषयी संवादाचे माध्यमातून बोलण्याचा सराव देण्यात आला आहे. विविध कथांमधूनही भूमिका सादरीकरणातून विद्यार्थ्यांच्या भाषण कौशल्याचा विकास करता येईल. |
| ३) वाचन<br>१. फलकावरील, पुस्तकातील, फ्लॅशकार्ड वरील शब्दांचे वाचन करवून घेणे.<br>२. पाठ्यपुस्तकातील छोटे व साधे संवाद, कथा, कविता, उतारे तसेच बोर्डवरील सूचनांचे वाचन करवून घेणे.<br>३. भाषिक खेळ.<br>४. प्रकटवाचन स्पर्धा.<br>५. एकांकी, नाटिका, इ. स्पर्धा<br>६. पाठ्यपुस्तकातील कविता तालासुरात म्हणवून घेणे.<br>७. मौन वाचन—वाचनाचे नियमासंदर्भात मार्गदर्शन करणे. | पाठ्यपुस्तकात वाचन कौशल्याच्या विकासासाठी खालील उपक्रम दिलेले आहेत.<br>१. शब्दाशब्दाने कमी होणारी वाक्ये/वाढत जाणारी वाक्ये.<br>२. शब्दांच्या जोड्या लावणे.<br>३. A Garden of words मधील शब्दांचे वाचन.<br>४. संभाषणाचे वाचन.<br>५. वर्तमानपत्रातील जाहिरातीने वाचन.<br>६. तालिकापासून तयार होणाऱ्या वाक्यांचे वाचन<br>७. कथांचे वाचन.<br>८. Science Magazine मधील उताऱ्यांचे वाचन |

| अभ्यासक्रम | पाठ्यपुस्तक |
|---|---|
| ८. शब्दसमूहाचे, वाक्यांचे वाचन करवून घेणे.<br>९. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या विविध तक्ते, टेबल्स, नकाशे, आकृत्या, मासिके, ग्रिटिंग कार्डस्, निमंत्रण, कार्डस् इ. चे प्रदर्शन भरविणे.<br>१०.संख्यात्मक माहिती नकाशे, तक्ते, आकृत्यांचे वाचन कसे करावे याचे मार्गदर्शन करावे.<br>११.शब्दकोशाचा वापर कसा करावा, याचे मार्गदर्शन करावे. | |
| ४) लेखन<br>१. बोर्डवरील शब्दांचे अनुलेखन करणे.<br>२. परिचित शब्द व वाक्ये सांगणे.<br>३. भाषिक खेळ, शब्दकोडी.<br>४. परिचित शब्दांच्या लेखनाचा सराव.<br>५. १ ते १०० आकडे लिहिणे.<br>६. वेगवेगळ्या प्रसंगाशी निगडीत शब्द लिहण्यास सांगणे.<br>७. वेगवेगळी चित्रे दाखवून त्यापासून तयार होणारे शब्दांचे लेखन. | लेखन कौशल्याच्या विकासासाठी पाठ्यपुस्तकात खालील उपक्रम दिलेले आहेत.<br>१. शब्दपट्ट्या तयार करणे.<br>२. दिलेल्या शब्दांच्या / शब्दसमूहांच्या सहाय्याने वाचलेली / अभ्यासलेली कथा पूर्ण करणे.<br>३. आवडत्या वस्तू/प्राणी/व्यक्ति बद्दल माहिती लिहिणे.<br>४. तालिकेच्या सहाय्याने अर्थपूर्ण वाक्ये तयार करून लिहिणे. |

| अभ्यासक्रम | पाठ्यपुस्तक |
|---|---|
| ४) लेखन<br>८. मुद्द्यांच्या आधारे गोष्टींचे लेखन.<br>९. महत्वाची माहिती फळ्यावर लिहिण्यास सांगणे.<br>१०.प्रश्नोत्तरलेखन इ. | ५. परिसरातील घडामोडी संदर्भात बातमीवजा मजकूर लिहिणे.<br>६. चित्रांचे वर्णन करणे व लिहिणे.<br>७. मित्र/नातेवाईकांना पत्र लिहिणे.<br>८. स्वत:विषयी/ मित्राविषयी माहिती लिहिणे.<br>९. विविध विषयासंदर्भात घोषवाक्ये लिहिणे.<br>१०.दिलेल्या विषयानुसार स्वतंत्रपणे लेखन करणे इ. उपक्रम पाठ्यपुस्तकात दिलेले आहेत. |

**विश्लेषण व अर्थनिर्वचन :** वरील सारणी क्र. ४.१२४ नुसार इ. ५वीच्या इंग्रजीच्या अभ्यासक्रमात दिल्याप्रमाणे भाषिक कौशल्यांच्या विकासासाठी इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकात विविध उपक्रम दिलेले आहेत. हे उपक्रम विद्यार्थ्यांच्या स्वयंअध्ययनावर, कृतीशीलतेवर भर देणारे आहेत.

**निष्कर्ष :** सन २००६च्या इ.५वीच्या इंग्रजीच्या अभ्यासक्रमानुसार इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकात विविध उपक्रमांचा समावेश केलेला आहे.

## सारणी क्र. ४.१२५

## मूल्यमापन

### सन २००६च्या इ. ५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजी पाठ्यक्रमातील मूल्यमापन व पाठ्यपुस्तके यांचा सहसंबंध

### मूल्यमापन योजना इ. ५वी.

| अ.क्र. | विषय | प्रथमसत्र(अ) | | | | व्दितीय सत्र (ब) | | | | वर्षभरातील काम (क) | | | गृहपाठ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रात्यक्षिक | तोंडी | लेखी | एकूण | प्रात्यक्षिक | तोंडी | लेखी | एकूण | संख्या | गुण | एकूण गुण | |
| १ | मराठी | — | २० | ८० | १०० | — | २० | ८० | १०० | ४ | २० | ८० | गृहपाठ १०निबंध/निबंध वजा लेखन १० |
| २ | हिंदी | — | २० | ८० | १०० | — | २० | ८० | १०० | ४ | २० | ८० | गृहपाठ १०निबंध/निबंध वजा लेखन १० |
| ३ | इंग्रजी | — | २० | ८० | १०० | — | २० | ८० | १०० | ४ | २० | ८० | गृहपाठ १०निबंध/निबंध वजा लेखन १० |
| ४ | प्रकल्प | प्रत्येक विद्यार्थ्याने प्रत्येक सत्रात एक प्रकल्प याप्रमाणे वर्षभरात दोन प्रकल्प पूर्ण करावेत. प्रत्येक सत्रातील प्रकल्प विद्यार्थ्यांनी गटामध्ये पूर्ण करावा. व्दितीय सत्रातील प्रकल्प विद्यार्थ्याने वैयक्तिकरित्या पूर्ण करावा. | | | | | | | | | | | १०० गुण |

पाठ्यपुस्तकांशी [illegible]संबंध :

१. सन २००६च्या इ.५वीच्या मराठी अभ्यासक्रमामाध्ये सांगितल्याप्रमाणे इ. ५वीच्या मराठीच्या पाठ्यपुस्तकात मूल्यमापनासाठी गद्य–पद्य पाठांखाली विविध कौशल्यांच्या विकासासाठी वस्तुनिष्ठ, लघुत्तरी, व दीर्घोत्तरी प्रश्न दिलेले आहेत. त्याचप्रमाणे पाठ्यपुस्तकात शेवटी नमुना प्रश्नांचा संच दिलेला आहे. तसेच हे मूल्यमापन करवून घेण्यासाठी शिक्षकांना योग्य त्यासूचना व मार्गदर्शन केलेले आहे. काही ठिकाणी छोटे उपक्रम व प्रकल्प दिलेले आहेत.

२. सन २००६च्या इ.५वीच्या हिंदीच्या अभ्यासक्रमातील मूल्यमापन योजनेनुसार इ.५वीच्या हिंदीच्या पाठ्यपुस्तकात विविध गद्य व पद्य पाठाखाली लघुत्तरी, दीर्घोत्तरी व वस्तुनिष्ट प्रश्न दिलेले आहेत. तसेच विविध कौशल्यांवर आधारित उपक्रम व प्रकल्प दिलेले आहेत.

३. सन २००६च्या इ.५वीच्या इंग्रजीच्या अभ्यासक्रमातील विशद केल्याप्रमाणे मूल्यमापनाच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी इ.५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकात कौशल्यनिहाय मूल्यमापन दिलेले आहे. जास्तीत जास्त सरावप्रश्न, उपक्रम व प्रकल्प यांचा समावेश केलेला आहे. याबरोबर सर्वंकष व सातत्यपूर्ण मूल्यमापनासाठी शिक्षकांना कृती व सुचना दिलेल्या आहेत व योग्य मार्गदर्शन केले आहे.

निष्कर्ष :

सन २००६च्या इ.५वीच्या अभ्यासक्रमानुसर इ. ५वीच्या मराठी, हिंदी, इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकात मूल्यमापनाचा अवलंब केला आहे.